सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १० मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १२२ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


### विनम्र अभिवादन



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची आज पुण्यतिथी

# राज्याचा आज अर्थसंकल्प

## अजित पवार करणार सादर

### शेतकरी, उद्योजक, व्यापाऱ्यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष

◆ **मुंबई, ९ मार्च**



उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजनमंत्री अजित पवार सोमवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. नव्याने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प आहे. अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांचा हा अकरावा अर्थसंकल्प असणार आहे. या अर्थसंकल्पाकडे शेतकरी, उद्योजक, व्यापाऱ्यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागलं आहे.

अजित पवार हे कठोर आर्थिक शिस्तीचे प्रशासक म्हणून ओळखले जातात. जनमताची नाडी ओळखून अर्थसंकल्पात लोकाभिमुख निर्णय जाहीर करताना राज्याच्या विकासप्रक्रियेला धक्का बसणार नाही याची काळजी ते घेत असतात. विकासयोजनांना निधी उपलब्ध करून देण्यात तसेच पायाभूत विकासाची प्रक्रिया गतिमान ठेवण्यात ते सातत्याने यशस्वी ठरले आहेत. कोरोनाच्या काळातही अजित पवार यांनी राज्याची आर्थिक शिस्त बिघडू दिली नव्हती. त्याबद्दल त्यांच्या कार्याचा केंद्रीय पातळीवर गौरव झाला आहे. शेतकरी, कष्टकरी, महिला, दलित, आदिवासी, विद्यार्थी, युवक हे घटक त्यांच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. २०२१ चा अर्थसंकल्प महिला शक तीला , तर २०२२ चा अर्थसंकल्प स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांना समर्पित होता. ◂ (वृत्तसंस्था)

### विक्रमाच्या वाटेवर

अजित पवार सोमवारी अकरावा अर्थसंकल्प सादर करतील. त्यानंतर ते शेषराव वानखेडे यांच्यानंतर दुसरे सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री ठरतील. शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा, अजित पवार यांनी उद्याचा अर्थसंकल्प धरून ११ वेळा, त्यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान जयंत पाटील (१० वेळा) आणि सुशीलकुमार शिंदे (९ वेळा) यांना जातो.

# भारतच 'चॅम्पियन'

## रोहित शर्माची ७६ धावांची दमदार खेळी



दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात विजयासाठी २५२ धावांचा पाठलाग करताना भारताचा सलामीवीर रोहित शर्माने कर्णधारपदाला साजेशी कामगिरी करत ८३ चेंडूंत ७६ धावांची खेळी केली, यात त्याने ७ चौकार व ३ षट्कार खेचले

◆ **दुबई, ९ मार्च**

आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी रंगलेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यात कर्णधार रोहित शर्माचे (७६) दमदार अर्धशतक, श्रेयस अय्यर (४८) व केएल राहुलच्या (नाबाद ३४) झुंजार खेळीच्या जोरावर भारताने न्यूझीलंडवर ६ चेंडू शिल्लक ठेवत ४ गड्यांनी दणदणीत विजय संपादन केला आणि तिसऱ्यांदा आयसीसी चॅम्पियन्स चषकावर आपले नाव कोरले.

रविवारी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडने मर्यादित ५० षटकांत ७ बाद २५१ धावा उभारल्या आणि भारतासमोर २५२ धावा काढण्याचे आव्हान ठेवले. भारताने ४९ षटकांत ६ बाद २५४ धावा काढून आपला विजय साकार केला. श्रेयस अय्यर आणि केएल राहुलने विजयात महत्त्वाची भूमिका पार पाडली. ◂ (वृत्तसंस्था)

# संसदेच्या अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून

## वक्फ विधेयकाला सरकार देणार सर्वोच्च प्राधान्य

◆ **नवी दिल्ली, ९ मार्च**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सोमवारपासून सुरू होत आहे. या सत्रात वक्फ विधेयकाला सरकार सर्वोच्च प्राधान्य देण्याची शक्यता आहे, तर मतदार यादीतील कथित फेरफार, मणिपुरात नव्याने झालेला हिंसाचार आणि भारताने ट्रम्प प्रशासनाला कसे हाताळले या मुद्यावर विरोधक सरकारला घेरू शकतात.

अनुदानाच्या मागण्यांसाठी संसदेची मान्यता मिळवणे, अर्थसंकल्पीय प्रक्रिया पूर्ण करणे, मणिपूरच्या अर्थसंकल्पाला मान्यता मिळवणे, वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर करणे यावर सरकारचे लक्ष असेल.

गृहमंत्री अमित शाह मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी संसदेची मंजुरी मिळवण्यासाठी एक वैधानिक ठराव मांडण्याची शक्यता आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् सोमवारी मणिपूरचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. मुख्यमंत्री एन. बिरेनसिंह यांच्या राजीनाम्यानंतर १३ फेब्रुवारीपासून मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. डुप्लिकेट इलेक्टोरल फोटो आयडेंटिटी कार्ड (इपिक) नंबरच्या मुद्यावरून सरकारला घेरण्याच्या तयारीत असल्याचे विरोधी पक्षाने म्हटले आहे.

तृणमूल काँग्रेसने हा मुद्दा उपस्थित करण्यात पुढाकार घेतला आहे. त्यानंतर निवडणूक आयोगाने पुढील दोन-तीन महिन्यांत सुधारणात्मक उपाययोजना केल्या जातील, असे जाहीर केले आहे. पश्चिम बंगालमध्ये इतर राज्यांतील मतदानाचा अधिकार बजावता यावा, यासाठी मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्यात आल्याचा तृणमूल काँग्रेसचा दावा निवडणूक आयोगाने फेटाळून लावला होता.

काही मतदारांचे इपिक नंबर सारखे असू शकतात. परंतु, लोकसंख्याशास्त्रीय माहिती विधानसभा मतदारसंघ आणि मतदान केंद्र यासारखे इतर तपशील वेगळे आहेत.

तृणमूल काँग्रेसचे नेते या मुद्यावर सोमवारी निवडणूक आयोगाची भेट घेणार आहेत आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या भागात संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये हा मुद्दा उपस्थित करण्यासाठी काँग्रेस, द्रमुक, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटासह इतर पक्षांना एकत्र आणले आहे. वक्फ सुधारित विधेयक लवकरात लवकर पारित करण्याला सरकार प्राधान्य देईल. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी मागील आठवड्यात एका कार्यक्रमात सांगितले की, सरकार वक्फ दुरुस्ती विधेयक लवकर मंजूर करण्यास उत्सुक आहे. कारण, यामुळे मुस्लिम समुदायाचे प्रश्न सुटतील. ◂ (वृत्तसंस्था)

# जाधवांच्या अपहरणकर्त्याचा खात्मा

## अज्ञातांनी घातल्या गोळ्या

◆ **कराची, ९ मार्च**

भारतीय नौदलाचे माजी अधिकारी कुलभूषण जाधव यांच्या अपहरणात सहभागी असलेल्या आयएस ायच्या हस्तकाची बलुचिस्तान प्रांतात गोळ्या घालून हत्या करण्यात आली.

मुफ्ती शहा मीर असे या आयएस ायच्या हस्तकाचे नाव आहे. तो धार्मिक नेता म्हणून वावरायचा. केच येथील तुरबत शहरात शुक्रवारी रात्री नमाज झाल्यावर तो मशिदीतून बाहेर पडत असताना दुचाकीवर आलेल्या अज्ञात मारेकऱ्यांनी त्याच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. यात मुफ्ती शहा गंभीर जखमी झाला. उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. ◂ (वृत्तसंस्था)

### महत्त्वाचे

## गुगल प्ले स्टोअरवरून हटवले १८० ॲप्स

**नवी दिल्ली :** गुगलने आपल्या प्ले स्टोअरवरून १८० पेक्षा अधिक ॲप्स हटवले आहेत. या ॲप्सला ५६ मिलियनहून अधिक वेळा डाऊनलोड करण्यात आले आहे. ॲड-फ्रॉड स्कीम सामान्य मालवे रपेक्षा वेगळी असते. हे डेटा चोरी करणे किंवा मोबाईलला नुकसान पोहोचव याऐवजी जाहिरात दारांना बनावट युजर एंगेजम ेंटसाठी पैसे देत आहेत. या ॲप्सद्वारे करण्यात आलेले बनावट इंटरॅक शन्सवरून दिसते की, जाहिरात खऱ्या युजर्सला दाखवली जात आहेत, परंतु तसे केले जात नव्हते. काही वेळा ते युजर्सला जाहिरात दाखवत होते.

## उपराष्ट्रपती जगदीप धनकड रुग्णालयात

**नवी दिल्ली :** छातीत वेदना आणि अस्वस्थपणा जाणवत असल्याची तक्रार केल्यानंतर उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांना रविवारी पहाटे दोन वाजताच्या सुमारास दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती सूत्रांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रुग्णालयाला भेट देत त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती जाणून घेतली. त्यांना रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले असून, कार्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. राजीव नारंग यांच्या नेतृत्वात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असून, डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी रुग्णालयात भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली.

## महाराष्ट्रात जीबीएसचा कहर सुरूच; १२ जणांचा मृत्यू

**मुंबई :** ९ मार्च महाराष्ट्रात गिलेन-बॅरे सिंड्रोमचा कहर थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. अहवालानुसार, महाराष्ट्रात गिलेन-बॅरे सिंड्रोमचे (जीबीएस) २२५ रुग्ण आढळले आहेत, त्यापैकी १९७ रुग्णांना जीबीएसची लागण झाल्याचे स्पष्ट झाले, तर २८ संशयित रुग्ण आहेत. या रोगामुळे १२ जणांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. नोंदवलेल्या प्रकरणांपैकी १७९ रुग्ण बरे झाले आहेत. तथापि, २४ जणांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे, त्यापैकी १५ जणांना व्हेंटिलेटर सपोर्टची आवश्यकता आहे. हे रुग्ण पुणे महानगरपालिका, अलिकडेच समाविष्ट झालेली गावे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे ग्रामीण आणि इतर जिल्ह्यांसह अनेक भागांत आहेत. आरोग्य अधिकारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत आणि वैद्यकीय सुविधांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.




# महाकुंभाच्या प्रवेशद्वाराजवळील गुहेत राहत होता दहशतवादी

◆ **प्रयागराज, ९ मार्च**

महाकुंभावर दहशतवादी हल्ला घडवण्याचा कट रचण्यात आला होता. पहिल्या अमृत स्नानाच्या एक दिवस आधी (१४ फेब्रुवारी), बब्बर खालसा दहशतवादी लाजर मसीह महाकुंभाच्या प्रवेशद्वारापासून फक्त १ किमी अंतरावर होता. तो मातीच्या ढिगाऱ्यात बनवलेल्या गुहेत राहत होता.

येथूनच त्याने महाकुंभात स्फोट घडवून आणण्याची योजना आखली होती. तो ढाब्यावर जेवताना मोबाईल चार्ज करीत असे. तो दररोज ग्रेनेड घेऊन बाहेर पडत असे, पण महाकुंभाच्या प्रवेशद्वारावर कडक सुरक्षा व्यवस्था असल्यामुळे तो यशस्वी होऊ शकला नाही. ही बाब स्वतः लाजर मसीहने मान्य केली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# चीनने आणला नवा 'माणूस'





## पहिला ऑटोमॅटिक एआय एजंट

**बीजिंग, ९ मार्च**

चीनने तयार केलेला मॅनस हा एक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) एजंट आहे, जो अत्यंत अवघड कामे झटपट पार करू शकतो. मॅनसच्या जबरदस्त क्षमतांमुळे तो एआय मार्केटमध्ये चर्चे चा विषय बनला आहे आणि त्याच्या कार्यक्षम तेमुळे त्याला जास्त प्रतिसाद मिळत आहे. मॅनस इतर कोणत्याही साधारण एआय चॅटबॉट्स किंवा सहाय्यकांपेक्षा वेगळा आहे. तो फक्त विचार करणारा नाही, तर तो काम करण्याची क्षमता असलेला स्वायत्त एजंट आहे. मॅनस स्वतःच अनेक अवघड कामे सहज पार पाडतो, जसे की प्रवास नियोजन, स्टॉक विश्लेषण आणि शैक्षणिक माहिती तयार करणे. मॅनसच्या डेव्हलपर्सनुसार, तो एक साधा सहाय्यक किंवा चॅटबॉट नाही. मॅनस हे एक पूर्णपणे स्वायत्त एआय एजंट आहे, जो विचारांची अंमलबजावणी करण्यास सक्षम आहे. मॅनसला प्रवास नियोजन, स्टॉक विश्लेषण, शैक्षणिक माहिती तसेच बीटूबी सप्लायर सोर्सिंगमध्ये चांगले काम करणारे एआय एजंट म्हणून ओळखले जात आहे. प्रवासी नियोजनाच्या बाबतीत, मॅनस विविध माहिती एकत्र करून, वापरकर्त्यांसाठी तुमच्या गरजेनुसार ट्रिप प्लॅन तयार करतो. तसेच आवश्यकतेनुसार कस्टम हँडबुक्स तयार करतो. त्याच्या स्टॉक विश्लेषणाच्या क्षमतांमध्ये मॅनस खोल वित्तीय डेटा विश्लेषण करून, शेअर्सबद्दल उपयुक्त माहिती देतो. शिक्षण क्षेत्रात, तो व्हिडीओ प्रेझेंटेशन आणि शैक्षणिक माहिती देतो, जसे की 'मॉमेन्टम थिओरम' या अवघड संकल्पनेचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण देणे.

### मॅनसची अत्याधुनिक कार्यक्षमता

मॅनसने जीएआयए बेंचमार्कच्या चाचणीम ध्ये उत्कृष्ट काम केले आहे, जी कृत्रिम बुद्धिमत्ता सहाय्यकांसाठी एक महत्वाची चाचणी आहे. या चाचणीमध्ये मॅनसने इतर प्रणालींना मागे टाकले आहे आणि त्याने स्टेट-ऑफ-द-आर्ट (सोटा) कामगिरी दर्शविली आहे. त्याच्या कामामुळे हे स्पष्ट आहे की मॅनस एआय क्षेत्रात एक नवा मानक सेट करीत आहे.

# शर्यतीतील बैलगाडा प्रेक्षकांत घुसून तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च -**

बैलगाडा शर्यतीत वेगाने धावणारा बैलगाडा प्रेक्षकांच्या गर्दीत घुसल्याने घडलेल्या दुर्घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला. सांगोला तालुक्यातील महूदजवळ ही दुर्घटना घडली.सुरेश हरिअप्पा सरगर (वय ४०, रा. महूद) असे या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. महूद-महिम परिसरात अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या सहकार्याने बैलगाडा शर्यत भरविण्यात आली होती. या शर्यतीत सोलापूरसह आसपासच्या जिल्ह्यातील सुमारे २५० बैलगाडे उतरले होते. ठरल्याप्रमाणे बैलगाडा शर्यतीला उत्साहात सुरुवात झाली.

हजारो प्रेक्षक शर्यत पाहण्यासाठी हजर होते. त्याच वेळी दोन बैलगाडे वेगाने धावत असताना अचानकपणे त्यातील एक बैलगाडा नियंत्रण सुटल्याने प्रेक्षकांच्या गर्दीत घुसला. तेव्हा गोंधळ उडाला. बैलगाड्याची सुरेश सरगर यास जोरदार धडक बसली. त्याच्या छातीला जोरात मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यास तातडीने रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. सांगोला पोलीस ठाण्यात या दुर्घटनेची नोंद झाली आहे.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# विविध संस्थाकडून कर्तृत्ववान महिलांचा गौरव



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.९ मार्च-**

**जागितक महिला दिनानिमित्त शहरातील विविध राजकीय संघटना, सामाजिक व शैक्षणिक संस्थांनी शहरातील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना गौरविले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात हास्य सम्राट दीपक देशपांडे व आबा पाटील यांनी विनोदी सादरीकरण केले. शुक्रवार पेठेतील आजोबा गणपतीला महिलांनी महाआरती केली. संभाजी ब्रिगेडने संसाराचा गाडा स्वाभिमानाने हाकणाऱ्या महिलांचा सन्मान केला.**

## जिल्हाधिकारी कार्यालय

जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक महिला दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर या होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, प्रांत अधिकारी सदाशिव पडदुने, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, डॉ. स्मिता चाकोते, हास्य सम्राट दीपक देशपांडे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविक करताना सदाशिव पडदुणे म्हणाले की, ८ मार्च १८५७ रोजी अमेरिकेतील महिलांनी उठाव करून कामावर सुट्टी मिळावी यासाठी मागणी केली. तर ८ मार्च १९१७ रोजी रशिया येथे महिलांनी विविध हक्कासाठी आंदोलन केले, मोठ्या प्रमाणात महिला एकत्र आल्या होत्या म्हणून ८ मार्च हा दिवस महिला दिन म्हणून साजरा केला जातो अशी माहिती दिली.

यावेळी बोलताना उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर म्हणाले, महिलांना व्यक्ती स्वातंत्र्य आहे. महात्मा गांधी यांच्या इंग्रजा विरुद्धच्या चलेजाव या आंदोलनात महिलांचा सहभाग मोठा होता. आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. महिला दिनाची थीम म्हणून स्वाक्षरी बोर्डावर सर्व महिलांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी नाटेकर यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे पत्र वाचून दाखवले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी महिलांना शुभ संदेश पाठवून दिला व महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. डॉ. स्मिता चाकोते यांनी महिलांच्या आरोग्य विषय काही टिप्स दिल्या व जास्तीत जास्त निरोगी व आनंदी आयुष्य कसे जगता येईल याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, आरडीसी मनीषा कुंभार यांनीही मनोगत व्यक्त करून महिला दिनाच्या शुभेच्छा देणारे गीत सादर केले.

## संभाजी ब्रिगेडतर्फे कार्यकर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**सोलापूर, दि. ९ मार्च -** जागतिक महिला दिनानिमित्त संभाजी ब्रिगेडच्यावतीने गेल्या चाळीस वर्षापासून सिद्धेश्वर मंदिरासमोरील फुटपाथ वरील सेवाभावी वृत्तीने गोरगरिबांसाठी अत्यल्प कमी दरामध्ये भोजन उपलब्ध करून देऊन आपल्या संसाराचा गाडा स्वाभिमानाने हाकणाऱ्या महिलांचा मानाचा फेटा सन्मानचिन्ह व मिठाई देऊन त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करण्यात आला. यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, शहराध्यक्ष जगदाळे, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम, सिद्धाराम सवयगी, सतीश वावरे, दिलीप निंबाळकर, गजानन शिंदे, संतोष सुरवसे, यशवंत लोंढे, गौरीशंकर वरपे, रमेश भंडारे, सुमित मंदृपकर मल्लिकार्जुन शेवगार, श्रवण साळुंके बबन डीगणे प्रेम भोसले, महिला जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, माधुरी चव्हाण, संजीवनी सलबत्ते, जयश्री जाधव, अश्विनी पाटील, सुनिता घंटे आदी उपस्थित होते.



**सोलापूर : जागतिक महिला दिनानिमित्त शुक्रवार पेठेतील आजोबा गणपतीला महाआरतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात सहभागी झालेल्या सर्व महिला. (छायाचित्र : केवल तिवारी)**

## अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका व मदतनीसांचा सन्मान



**सोलापूर, दि. ९ मार्च-** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद महिला व बालविकास विभागामार्फत आदर्श अंगणवाडी सेविका, मदतनीस व पर्यवेक्षिका पुरस्काराचे वितरण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालविकास प्रसाद मिरकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे तसेच सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचेसह जिल्हयातील बालविकास प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रसाद मिरकले म्हणाले कि, सोलापूर जिल्हयामध्ये ग्रामीण क्षेत्रात ४०७६ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून सदर अंगणवाडी केंद्रांव्दारे योजनांच्या सेवा देणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या कामाचे कौतूक करणेसाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हयातील १६ प्रकल्पातील प्रति प्रकल्प ३ याप्रमाणे एकूण ४८ अंगणवाडी सेविका, ४८ अंगणवाडी मदतनीस प्रति प्रकल्प १ याप्रमाणे १६ अंगणवाडी पर्यवेक्षिकांना आदर्श पुरस्काराने गौरविण्यात आल्याचे सांगितले. यावेळी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कला गुणांना वाव मिळणेच्या उददेशाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी सेविकांनी गीत गायन, सामुहिक नृत्य तसेच एकपात्री असे विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले. त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

## स्त्री-पुरुष समानतेचे तत्व रुजवणे ही काळाची गरज

### महिला दिनानिमित्त कॉ. आडम यांचे प्रतिपादन

**सोलापूर दि. ९ मार्च-** कामगार वर्गातील आणि अगदी सामाजिक कार्यकर्त्यांच्या घरात देखील पुरुषांना या सामाजिक वर्चस्वाचा मोह सोडवत नाही. ते देखील घरकामात समान वाटा उचलत नाहीत आणि प्रसंगी पत्नी किंवा मुलीला ताब्यात ठेवण्यासाठी हिंसाचाराचा देखील वापर करताना दिसतात. आपल्याला कामगार वर्गात विषमतेची संस्कृती झुगारून स्त्री-पुरुष समानतेची तत्वे रुजवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी व्यक्त केले.



आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दत्त नगर लाल बावटा सिटू कार्यालय येथे संघटनेचे जिल्हा अध्यक्ष माजी नगरसेविका शेवंता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महिलांविषयक कायद्यांचे चित्र प्रदर्शन आणि व्याख्यान पार पडले. त्याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, संयुक्त राष्ट्रीय संघाच्या अहवालानुसार स्त्रियांसाठी सर्वात असुरक्षित ठिकाण आहे, त्यांचे घर आपल्या देशात दर रोज १४० स्त्रियांचा जीव त्यांच्या जोडीदारांकडून किंवा कुटुंबातील सदस्यांकडून हिरावून घेतला जातो. एकूण बलात्कारांपैकी ८९ टक्के बलात्कार जवळच्या, ओळखीच्या व्यक्तींकडून होतात. दर सहा तासाला एका नवविवाहित तरुणीची हत्या केली जाते. इतकेच नाही तर दर वर्षी ५ लाख मुलींना जन्माजाधी गर्भातच मारून टाकले जाते. पितृसत्ताक व्यवस्था आणि नवउदार उपभोगवादी संस्कृती यांच्या युतीमुळे महिला व मुलींसाठी कुटुंबात व समाजात अत्यंत प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आहे.

यावेळी प्रजा नाट्य मंडळ कलापथक शाहिरांनी क्रांतिगीते सादर केली. चित्र प्रदर्शनात महिलांवरील लैंगिक अत्याचार व शारीरिक हल्ले, महिलांविषयक कायदे, महिलांच्या समस्या, वाढती महागाई, बेरोजगारी, धर्मांधता, सामाजिक गुलामी, शिक्षणाचा अधिकार, स्त्री-पुरुष समनता, सामाजिक ऐक्य आणि जातीय सलोखा याची माहिती व संदेश देणारे चित्र प्रदर्शन आकर्षित ठरले. या प्रसंगी व्यासपीठावर सिटूचे राज्य महासचिव एम.एच.शेख, जनवादी महिला संघटनेच्या राज्य अध्यक्षा नसीमा शेख, माकपाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर), माजी नगरसेविका कामिनिताई आडम, सिटूचे सुनंदा बल्ला, शकुंतला पाणीभाते, फातिमा बेग, लिंगव्वा सोलापूरे, ॲड कॉ.अनिल वासम, कॉ.दत्ता चव्हाण, आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविकात नसीमा शेख यांनी केले. महाराष्ट्रात महिलांवर होणाऱ्या बलात्काराची व लैंगिक अत्याचाराची मालिका सुरु आहे. याचा धिक्कार सिटूचे राज्य महासचिव कॉ.एम.एच.शेख यांना केला.



## एस.व्ही.सी.एस. हायस्कूल होटगी

**सोलापूर, दि. ९ मार्च-** होटगी येथील एस. व्ही. सी.एस. प्रशालेत महिला दिन अतिशय उत्साहात साजरा करण्या आला. याप्रसंगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने, तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे, शिक्षिका शिंपी, देगावकर, वाघमोडे, कुंभार, हिरेमठ, बंडगर, ढोले आदी मान्यवर उपस्थित होते. प्रथमत वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी,तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तद्नंतर व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्व महिला भगिनींचा प्राचार्य नंदकुमार धाये पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे आदी मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प व लेखणी घेऊन यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख भानुदास राठोड यांनी केला

## ब्रह्मदेवदादा माने बँकेच्या वतीने महिला खातेदारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

केवळ जागतिक महिला दिन आहे म्हणून महिलांचा आदर सन्मान न करता स्त्रियांचा दररोज आदर केला पाहिजे. आज महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून अर्थकारण, बजेट, बचत हे महिलांकडून आपण शिकले पाहिजे असे मत माजी आमदार दिलीप माने यांनी सांगितले.



जागतिक महिला दिनानिमित्त ब्रह्मदेवदादा माने बँकेच्या वतीने सोलापूर शहरातील १३ शाखेमधील खातेदार महिलांचा सन्मान बी.एम.आय.टी. शिक्षण संकुलच्या सचिवा जयश्री माने व माजी आमदार दिलीपराव माने यांचा हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी बँकेचे चेअरमन सोमनाथ गायकवाड, महिला संचालिका रुक्मिणी केंगार, प्रिया पाटील, संचालक सचिन चौधरी, श्रीकांत बंडगर, आनंदराव देठे, शावरप्पा वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जयश्री माने यांनी महिलांना कणखर, खंबीर आणि स्वावलंबी व्हा, पुरुषांनी आपल्या पत्नीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन करीत माझे पती माझ्या सोबत आहेत असे सांगतानाच त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. सचिन चौधरी यांनी महिलांच्या कलागुणांचे कौतुक केले. मी २७ वर्षापासून बँकेची खातेदार असून बँकेच्या कर्मचाऱ्याकडून अतिशय चांगले व तत्पर सेवा मिळते. बँकेने ग्राहकाची विश्वासार्हता जपले असून अन्य ठिकाणी थोडेफार जादा व्याजदर असेल तरी ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक अधिक सरस असल्याचे खातेदार यल्लमा माढेकर यांनी सांगितले. प्रास्ताविक बँकेचे व्यवस्थापक विनोद कुलकर्णी यांनी केले. आभार संचालिका प्रिया पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रशासन विभागाचे सुनील माळकदकर यांनी केले.

### या महिला खातेदारांचा झाला गौरव

यलम्मा हणमंतु माढेकर (सिध्देश्वर पेठ), छाया लक्ष्मण हुच्चे (अशोक चौक), विनया विलासराव कार्यकर्ते (पार्क चौक), सुवर्णा चंद्रकांत कांबळे (दमाणी नगर), सविता राजराम देठे (एस.पी.एम.कॅम्पस् कुमठे), रुपाली विनोद कुलकर्णी (विजापूर रोड), परिणिता विजयसिंह शिंदे (कोंडी), लक्ष्मी ब्रह्मनाथ माळी (श्री.सिध्देश्वर मार्केट यार्ड), लिनाश्री मालाजी पाटील (बीएमआयटी कॅम्पस् बेलाटी), सोनाली मिलिंद शेटे (सुमित्रा पार्क), सविता गणपती पाटील (होटगी रोड), लक्ष्मी कृष्णप्पा सालोटगी (एस.आर.पी.कॅम्प), रेश्मा किरण डोंगरे (अंत्रोळीकर नगर)

## महिला दिन उत्साहात



### बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन

**सोलापूर, दि. ९ मार्च**

बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन तर्फे महिला दिन साजरा डॉक्टर अस्मिता बालगावकर यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. अध्यक्ष म्हणून कॉम्रेड सरिता कुलकर्णी ह्या होत्या. त्याचबरोबर वुमन्स कौन्सिलच्या कॉम्रेड शिल्पा कुलकर्णी व ऑर्गनायझिक सेक्रेटरी म्हणून कॉम्रेड संतोष चित्त्याळकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉम्रेड सुजाता होंडरे तर आभार प्रदर्शन कॉम्रेड श्रीदेवी मेनगुळे यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र त्याचबरोबर इतर सर्व बँकेच्या कर्मचारी अधिकारी वर्गातील महिला या बहुसंख्येने उपस्थित होत्या त्याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या नातलगातील मुली आणि महिला कर्मचारी यांचे मनोरंजनाचे कार्यक्रम देखील सादरीकरण करण्यात आले व त्यांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यात आले व त्यांच्या सत्कार सन्मान ही करण्यात आला.



### अहिल्याबाई प्रशालेत एकल माता पालकांचा गौरव

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

श्री उषा:काल दलित शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अहिल्याबाई प्रशालेत महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या अध्यक्षा सी.बी शेख, मुख्याध्यापक इस्माईल शेख, उर्दू विभागाच्या मुख्याध्यापिका मेहजबिन शेख आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाच्या सुरुवातीस दीप प्रज्वलन करून सावित्रीबाई फुले व अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेच्या वतीने एकल महिला पालकांचा फेटा बांधून व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. महिला पालकांसाठी मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. खेळामधील विजय महिलांना इस्माईल उर्दू स्कूलच्या मुख्याध्यापिका मेजबिन शेख यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.परीक्षक म्हणून शिक्षिका मंदाकिनी बसाटे,प्रा.शितल राठोड यांनी काम पहिले. विद्यार्थ्यांनी महिला सन्मान आणि स्त्रीशक्तीच्या महत्त्वावर आधारित भाषणे आणि एकपात्री प्रयोग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनाजी धेंडे यांनी केले, तर अल्पना जाधव यांनी आभार प्रदर्शन केले.



### लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला पुरस्कार आणि प्रांतपाल यांची क्लबला भेट दिली. सुरूवातीला क्लबचे अध्यक्ष लायन मोहन भुमकर घंटानाद केले. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रांतपाल एम.जे.एफ ॲड. मल्लीनाथ पाटील, प्रथम महिला महादेवी पाटील, भारती भुमकर, मुरलीधर अरकाल, प्रकाश हत्ती, गणेश शालगार, नमिता थिटे, विद्याधर शाबादी, अंबादास इंदापुरे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांची ओळख आणि सत्कार लायन मोहन भुमकर यांनी केले. यावेळी यशस्वी महिला पुरस्कार प्राप्त शारदा नोरा , राजश्री तडकासे, शशिकला श्रावण, रेश्मा मेटगिरी, गंगाबाई गुडूर, शिल्पा बल्ला यांना मान्यवरांच्या हस्ते शाल, स्मृती चिन्ह बुके देऊन गौरविण्यात आला. ॲड. रामचंद्र मेत्रस यांनी कायदे विषयक माहिती दिली. सोमशेखर भोगडे यांनी आभार मानले. सुत्रसंचलन श्रीदेवी यळमेली यांनी केले.



### आस्था संस्थेने विविध क्षेत्रातील महिलांना गौरविले

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शैक्षणिक,क्रीडा व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना गुणगौरव पुरस्कार नगरेश्वर देवस्थान तुळजापूर वेस चौक या ठिकाणी संपन्न झाला. यावेळी हळदी कुंकवाचा कार्यक्रम झाला. त्यांना भेटवस्तू देण्यात आले. सूत्रसंचालन सुहास छंचुरे यांनी केले तर देविदास चेळेकर यांनी आभार मानले

#### विविध क्षेत्रातील या महिलांचा झाला गौरव

रेखा पेंबर्ती ( मुख्याध्यापिका दमाणी प्रशाला), गिता सादूल (मुख्याध्यापिका भु.म.पुल्ली कन्या प्रशाला),संरोजना मुलिंटी. (मुख्याध्यापिका गांधी नाथा रंगजी प्राथमिक प्रशाला), डॉ शिल्पा फडकुले(कन्सल्टिंग रिडॉलॉजिस्ट अँड सोनॉलॉजिस्ट), प्रा.प्रतिभा कंगळे (उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय), आरती मलजी (शारीरिक शिक्षण संचालक सेवासदन ज्यु. कॉलेज), सुवर्णा कटारे (ज्ञानसागर प्राथमिक प्रशाला), सुवर्णा कट्टीमनी (सहशिक्षिका चतुराबाई श्राविका प्रा.), रामेश्वरी क्षिरसागर, सपना कांबळे (पत्रकार), प्रा. सुवर्णा कांबळे (सोनी कॉलेज), अर्चना गव्हाणे (सहशिक्षिका सुशील मराठी प्रशाला), अनुराधा थोरात (कराटे प्रशिक्षिका)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अमेरिकेत स्वामी नारायण मंदिराची तोडफोड

## भारताने व्यक्त केला तीव्र निषेध, कारवाईची मागणी

**न्यू यॉर्क, ९ मार्च**

अमेरिकेच्या कॅलिफोर्नियातील चिनो हिल्स येथील बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनाराण संस्थेच्या (बीएपीएस) मंदिरात रविवारी अज्ञात समाजकंटकाने तोडफोड करीत मंदिराच्या भिंतीवर चित्रातून आक्षेपार्ह संदेश लिहिला. या घटनेचा परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करीत जबाबदार व्यक्तींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

मंदिराच्या तोडफोडीची माहिती बीएपीएसने समाज माध्यम खात्यावरून दिली. त्यात म्हटले की, गेल्या काही दिवसांत कॅलिफोर्नियात दुसऱ्यांदा हिंदू मंदिरात तोडफोडीची घटना घडली. हिंदू समुदाय द्वेषाविरोधात ठाम उभा आहे, आम्ही द्वेषाला कधीही थारा देणार नाही. मानवता, श्रद्धा, शांती आणि करुणा यावर आमचा विश्वास असून, त्यासाठी कायम प्रयत्नरत राहणार आहे. याचवेळी उत्तर अमेरिकेतील हिंदू धर्मासाठी काम करणारा वकिली गट 'कोएलिशन ऑफ हिंदूज नॉर्थ अमेरिका' (सीओएचएनए) या संस्थेने एक्सवर पोस्ट लिहून घटनेचा निषेध व्यक्त करीत मागील काही वर्षांत अशाच प्रकारे घडलेल्या घटनांकडे लक्ष वेधले आणि सखोल चौकशीची मागणी केली. हिंदूफोबिया ही केवळ कल्पकतेची निर्मिती आहे. हिंदू समुदाय कदापि द्वेषाला थारा देत नाही. संस्थेने गेल्या काही वर्षांत तोडफोड करण्यात आलेल्या १० मंदिराची माहिती दिली आहे. मागील वर्षी सप्टेंबरमध्ये कॅलिफोर्नियातील सॅक्रामेंटोमधील स्वामीनाराण संस्थेच्या मंदिरात भित्तीचित्र लावून विटंबना करण्यात आली होती, तर तत्पूर्वी न्यू यॉर्कच्या मेलव्हिल येथील मंदिरातही आक्षेपार्ह संदेश लिहिण्यात आला. परंतु समाजकंटकावर अद्याप कारवाई करण्यात आली नसल्याचे 'सीओएचएनए'ने म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)

### हिंदू समुदायाच्या मंदिरांची सुरक्षा सुनिश्चित करा

न्यू यॉर्कमधील भारतीय वाणिज्य दूतावासाने या घटनेचा तीव्र निषेध केला. त्यांनी 'एक्स'वर लिहिले की, मंदिराची तोडफोड आणि विद्रूपीकरण करण्याची घटना दुर्दैवी आहे. यासंदर्भात अमेरिकेच्या स्थानिक प्रशासनाकडे संबंधितांवर कारवाई आणि हिंदू समुदायाच्या पूजा स्थळांवर सुरक्षा सुनिश्चित करण्याची मागणी केली आहे. अमेरिकेसारख्या देशात अशा प्रकारची घटना होणे चिंतेचा विषय आहे.

### स्थानिक प्रशासनाने दखल घ्यावी : रणधीर जयस्वाल

भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, शनिवारी कॅलिफोर्नियातील हिंदू मंदिरात झालेल्या तोडफोडीचा आम्ही निषेध करीत आहोत. ही घटना अतिशय निंदनीय आहे. स्थानिक प्रशासनाने याची दखल घेऊन जबाबदार असलेल्या आरोपींविरोधात कठोर कारवाई करावी. आम्ही चिनो हिल्स येथील हिंदू मंदिरात झालेल्या घटनेची माहिती अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाला दिली आहे.



पाटणा येथे रविवारी काढण्यात आलेल्या श्री श्याम फागून होली ध्वज शोभायात्रेत सहभागी श्रीकृष्ण व राधेच्या वेशभूषेतील कलाकार

# अंतिम सामन्यावर पाच हजार कोटींचा सट्टा

## दाऊद कनेक्शन उघड; दिल्लीत मोठी कारवाई

**नवी दिल्ली, ९ मार्च**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यावर फक्त क्रिकेटप्रेमीच नाही, तर सट्टाबाजाराचेही लक्ष होते. यादरम्यान दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करीत पाच सट्टेबाजांना अटक केली आहे. या सर्वांनी उपान्त्य सामन्यावर सट्टा लावला होता. त्यांची चौकशी केली असता धागेदोरे दुबईपर्यंत जाऊन पोहोचले आहेत. त्यातूनच अंतिम सामन्यावर तब्बल पाच हजार कोटींचा सट्टा लावण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. इतकेच नाही, दाऊद इब्राहिमची टोळी दुबईत झालेल्या मोठ्या सामन्यांमधील सट्ट्यात सहभागी आहे.

एका प्रकरणात दोन सट्टेबाजांची ओळख प्रवीण कोच्चर आणि संजय कुमार अशी पटली आहे. दोघांनीही उपान्त्य सामन्यावर सट्टा लावल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. दोघांनाही लॅपटॉप आणि मोबाईल फोनच्या आधारे सट्टा लावताना रंगेहाथ पकडण्यात आले. (वृत्तसंस्था)

# बोगद्यातील कामगारांना शोधण्यासाठी रोबोट

**हैदराबाद, ९ मार्च**

तेलंगणातील नागरकुरनूल येथील श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनाल (एसएलबीसी) बोगद्याचे छत कोसळल्याने २२ फेब्रुवारीपासून आत अडकलेल्या आठ कामगारांच्या बचावासाठी लष्कर आणि एनडीआरएफचे जवान कार्यरत आहे. कामगारांना बाहेर काढण्यात अद्याप यश आले नसून, आता तेलंगणा सरकार रोबोटची मदत घेणार आहे.

राज्याचे पाटबंधारे मंत्री एन उत्तम कुमार रेड्डी यांनी रविवारी माहिती दिली की, श्वान पथकांनी दोन ठिकाणे ओळखली, जिथे कामगार असण्याची शक्यता आहे. बचाव पथकाकडून श्वानांनी ओळखलेल्या ठिकाणचा चिखल हटविण्यास सुरुवात केली आहे. छत कोसळलेल्या बोगद्यातील परिस्थिती पाहता बचाव कार्यात रोबोटची मदत घेण्यात येणार आहे. यासाठी चार कोटींचा खर्च केला जाईल. (वृत्तसंस्था)

# युद्धबंदीच्या दुसऱ्या टप्प्यावर पुढील आठवड्यात चर्चा

## इस्रायल कतारला पाठवणार शिष्टमंडळ

**तेल अवीव, ९ मार्च**

अमेरिकेच्या मध्यस्थीने इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी वाटाघाटीचा दुसरा टप्पा पुढील आठवड्यात सुरू होणार आहे. करारावरील चर्चा पुढे नेण्यासाठी इस्रायलचे शिष्टमंडळ कतारला जाणार आहे.

इस्रायलच्या पंतप्रधान कार्यालयाने निवेदनात म्हटले, की हमासने इजिप्त आणि कतारमधील मध्यस्थांसोबत युद्धबंदी करारावरील चर्चेसाठी सकारात्मक संकेत दिले आहे. त्यांनी अमेरिकेने घालून दिलेल्या अटी आणि शर्तींचे पालन करून दुसऱ्या टप्प्यातील युद्धबंदीच्या वाटाघाटीसाठी तयारी दर्शवली आहे. आम्ही अमेरिकेच्या मध्यस्थीने चर्चेचे निमंत्रण स्वीकारले आहे. पुढील आठवड्यात आमचे शिष्टमंडळ वाटाघाटीवर चर्चा करण्यासाठी कतार येथे जाणार आहे. गेल्या आठवड्यात, इस्रायलने हमासवर युद्धबंदी करार वाढवण्यासाठी आणि उर्वरित ओलिसांना मुक्त करण्यासाठी दबाव वाढविला होता. अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही हमासला युद्धबंदीच्या दुसऱ्या टप्प्यावर चर्चा करा, अन्यथा गंभीर परिणामासाठी तयार राहण्याचा इशारा दिला होता. मागील आठवड्यात यासंदर्भात चर्चा होणार होती, मात्र हमासने अटी, शर्ती मान्य करण्यास नकार दिला होता. जवळपास तीन वर्षे झालेल्या हमास-इस्रायल युद्धात हजारो लोकांचे प्राण गेले आहेत तसेच संपत्तीचेही नुकसान झाले.

(वृत्तसंस्था)

### हमासच्या ताब्यात २४ ओलिस, ३५ मृतदेह

इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी कराराचा पहिला टप्पा मार्चच्या सुरुवातीला संपला. हमासकडे अद्याप २४ ओलिस आणि ३५ मृतदेह आहेत. हमासवर दबाव आणण्यासाठी इस्रायलने गेल्या आठवड्यात गाझापट्टीला जाणारा सर्व पुरवठा रोखला. इस्रायल आणि हमास यांच्यातील कराराच्या पहिल्या टप्प्यात २५ जिवंत ओलिसांची सुटका करण्यात आली आणि आठ मृतदेह सुपूर्द करण्यात आले. त्या बदल्यात, इस्रायलने सुमारे दोन हजार पॅलेस्टिनी कैद्यांना मुक्त केले.

# माधव राष्ट्रीय उद्यान देशातील ५८ वा व्याघ्रप्रकल्प

**भोपाळ, ९ मार्च**

मध्यप्रदेशच्या शिवपुरी जिल्ह्यातील माधव राष्ट्रीय उद्यानाला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळाला आहे. राज्यातील हा नववा, तर देशातील ५८ व्याघ्र प्रकल्प आहे. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने मान्यता दिल्यानंतर मध्यप्रदेश सरकारने यासंदर्भात शनिवारी अधिसूचना प्रसिद्ध केली. गेल्या तीन महिन्यात सलग दुसरा व्याघ्रप्रकल्प या राज्याला मिळाला आहे.

१९५६ मध्ये माधव राष्ट्रीय उद्यानाची स्थापना झाली होती. दोन वर्षांपूर्वी माधव राष्ट्रीय उद्यानात दोन मादी आणि एक नर वाघ सोडण्यात आला होता. मादी वाघिणीने दोन बछड्यांना जन्म दिला. वाघासोबतच, बिबट्या, लांडगा, कोल्हा, साळू, अजगर, चिंकारा आदी वन्यप्राणीही माधव राष्ट्रीय उद्यानात आहे. यासंदर्भात 'एक्स'वरील पोस्टमध्ये मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले, सलग तिसऱ्या महिन्यांत राज्यातील दुसऱ्या व्याघ्र प्रकल्पाला मान्यता मिळणे ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे.

(वृत्तसंस्था)

# महाकुंभामुळे बँक खाती झाली रिकामी!

## बँकांकडे कर्ज वाटपासाठीही पैसे नाहीत

**महाकुंभामुळे** बँक खाती रिकामी झाली आहेत. हे थोडे विचित्र वाटेल, पण महाकुंभाला जाण्यासाठी कोट्यवधी लोकांनी बँकांमधून मोठ्या प्रमाणात पैसे काढले. आता तर बँकांकडे कर्ज वाटपासाठीही पैसे नाहीत, अशी परिस्थिती आहे. बँकांची स्थिती सुधारण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक आता मोठे पाऊल उचलणार आहे. बँकिंग क्षेत्रातील भांडवली तरलता वाढवण्यासाठी रिझर्व्ह बँकेला लवकरच काहीतरी करावे लागेल, असे एका अहवालातून समोर आले आहे.

भारतीय स्टेट बँकेच्या अहवालानुसार, रिझर्व्ह बँकेला बँकांचे भांडवल वाढवण्यासाठी रोख राखीव प्रमाण (सीआरआर) कमी करावे लागेल. भारतीय बँकिंग व्यवस्थेतील हे सर्वांत वाईट संकट म्हणून याकडे पाहिले जात आहे. बँकांची तरलता नोव्हेंबरमधील १.३५ लाख कोटी रुपयांपासून डिसेंबरमध्ये ०.६५ लाख कोटी रुपयांच्या तुटीपर्यंत घसरली. जानेवारीमध्ये ही तूट वाढून २.०७ लाख कोटी रुपये होती आणि फेब्रुवारीमध्ये ही तूट १.५९ लाख कोटी रुपये होती.

स्टेट बँकेच्या अहवालात असे म्हटले आहे की, महाकुंभासारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमांमुळे बँकांमध्ये रोख रकमेचा तुटवडा निर्माण झाला आहे. महाकुंभाच्या काळात किरकोळ ठेवीदारांनी बँकांमधून मोठ्या प्रमाणात पैसे काढून महाकुंभात खर्च केले. या कालावधीत बँकांना रोखीचा तुटवडा सतत जाणवत आहे. याचा परिणाम असा होतो की, काढण्यात आलेल्या चलनाचा मोठा भाग अद्याप बँकिंग व्यवस्थेत परत आलेला नाही.

### रिझर्व्ह बँकेला उचलावी लागतील पावले

देशातील सर्वांत मोठी बँक एसबीआयच्या या अहवालावर विश्वास ठेवला, तर आता तरलतेशी संबंधित समस्यांवर मात करण्यासाठी रिझर्व्ह बँकेला सीआरआर कमी करावा लागेल. फेब्रुवारीच्या एमपीसी बैठकीतही, रिझर्व्ह बँकेने सीआरआर ०.५० टक्क्यांनी कमी केला होता, ज्यामुळे बँकिंग प्रणालीमध्ये १.१० लाख कोटी रुपयांचे भांडवल आले. ही रक्कम तरलता वाढवण्यासाठी अपुरी आहे आणि लवकरच सीआरआरमध्ये आणखी कपात करावी लागेल.

# ट्रम्पचे 'डोळ्याच्या बदल्यात डोळा'धोरण

## भारताचे मोठे नुकसान होणार

**अमेरिका** २ एप्रिलपासून 'डोळ्याच्या बदल्यात डोळा' या धोरणानुसार भारतावर परस्पर शुल्क लादणार आहे. याचा अर्थ असा की, अमेरिकन कंपन्यांकडून येणाऱ्या वस्तूंवर भारत जे काही शुल्क लावेल, तेच शुल्क अमेरिका भारतीय कंपन्यांकडून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तूंवर देखील लावेल. भारतीय वेळेनुसार सकाळी अमेरिकन संसदेच्या संयुक्त अधिवेशनात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ही घोषणा केली.

### १. टॅरिफ म्हणजे काय?

टॅरिफ म्हणजे दुसऱ्या देशातून येणाऱ्या वस्तूंवर लादलेला कर. ज्या कंपन्या परदेशी वस्तू देशात आणतात, त्या सरकारला हा कर भरतात. हे एका उदाहरणाने समजून घेऊ. टेस्लाचा सायबर ट्रक अमेरिकन बाजारात सुमारे ९० लाख रुपयांना विकला जातो. जर टॅरिफ १०० टक्के असेल, तर भारतात त्याची किंमत सुमारे २ कोटी रुपये असेल.



### २. परस्पर शुल्क म्हणजे काय?

परस्पर म्हणजे स्केलच्या दोन्ही बाजू समान करणे. म्हणजेच, जर एका बाजूला १ किलो वजन असेल तर दुसऱ्या बाजूलाही १ किलो वजन ठेवा जेणेकरून ते समान होईल. ट्रम्प फक्त हे वाढवण्याबद्दल बोलत आहेत. याचा अर्थ जर भारताने निवडक वस्तूंवर १०० टक्के कर लादला तर अमेरिकाही तत्सम उत्पादनांवर १०० टक्के कर लादेल.

ट्रम्प यांच्या आर्थिक योजनांमध्ये टॅरिफ हा एक भाग आहे. ते म्हणतात की टॅरिफमुळे अमेरिकन उत्पादन वाढेल आणि रोजगार वाढेल. कर महसूल वाढेल आणि अर्थव्यवस्था वाढेल. २०२४ मध्ये अमेरिकेत होणाऱ्या ४० टक्क्यांपेक्षा जास्त आयात चीन, मेक्सिको आणि कॅनडा येथून येणाऱ्या वस्तूंमधून होईल. कमी दरांमुळे अमेरिकेला व्यापार तूट येत आहे.

२०२३ मध्ये अमेरिकेला चीनसोबत ३०.२ टक्के मेक्सिकोसोबत १९ टक्के आणि कॅनडासोबत १४.५ टक्के व्यापार तूट सहन करावी लागेल. एकूणच हे तिन्ही देश २०२३ मध्ये अमेरिकेच्या ६७० अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ४० लाख कोटी रुपयांच्या व्यापार तूटसाठी जबाबदार आहेत. ट्रम्प प्रशासनाला ही तूट कमी करायची आहे. म्हणून, मेक्सिको आणि कॅनडावर ४ मार्चपासून २५ टक्के कर लागू होईल. चीनवर अतिरिक्त १० टक्के कर देखील लादण्यात आला आहे. २ एप्रिलपासून भारतावर परस्पर शुल्क लादले जाणार आहे.

# चांदी सोन्यालाही मागे टाकणार का?

## आतापर्यंत ११ टक्के परतावा

**सोन्याकडे** गुंतवणुकीचा सर्वांत सुरक्षित आणि चांगला परतावा देणारा पर्याय म्हणून आजही पाहिले जाते. गेल्या वर्षभरात सोन्याने शेअर मार्केटप्रमाणे बंपर परतावा दिला आहे. त्यामुळेच सोन्यातील गुंतवणूक दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. मात्र, यात आता चांदीदेखील मागे राहिलेली नाही. पांढऱ्या धातूने यावर्षी आतापर्यंत सुमारे ११ टक्के परतावा दिला आहे. परताव्याच्या बाबतीत चांदीची कामगिरी पुढील दोन-तीन वर्षांत चांगली राहण्याची अपेक्षा आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे.



अलिकडच्या काळात चांदीने चांगला परतावा दिला आहे. पण, सोन्यापेक्षा चांदी अधिक अस्थिर असल्याचेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कारण, या धातूचा वापर गुंतवणूक मालमत्ता म्हणून तसेच उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. पण, सोन्यापेक्षा ते अधिक परवडणारे असल्याने छोट्या गुंतवणूकदारांना खरेदी करणे सोपे जाते.

### शेअर मार्केटमध्येही चांदीचा दबदबा

देशातील चांदीच्या फ्युचर्स किमतीत गेल्या वर्षी १७.५० टक्क्यांनी वाढ झाली असून, हे १० वर्षांच्या सरासरी ९.५६ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. गेल्या दोन वर्षांत चांदीने दमदार कामगिरी दाखवली आहे. यावर्षीही त्यात आतापर्यंत ११ टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या, चांदी जागतिक आर्थिक संकटाच्या काळात २५ एप्रिल २०११ रोजी सेट केलेल्या त्याच्या विक्रमी ५० प्रति डॉलर औंसपेक्षा सुमारे ३५ टक्क्यांनी खाली व्यापार करीत आहे. बाजारातील वाढीची अपेक्षा करणाऱ्यांसाठी ही किंमत पातळी गुंतवणुकीसाठी प्रवेश बिंदूचे संकेत असू शकते.

# 'ईव्ही' विक्रीचा धडाका फेब्रुवारीत कायम



**सरलेल्या** फेब्रुवारीमध्ये देशातील एकदंर प्रवासी वाहनांची मागणी ७ टक्क्यांनी घसरली असली तरी, विद्युत शक्तीवरील प्रवासी वाहनांच्या (ईव्ही) किरकोळ विक्रीत मात्र याच महिन्यांत १९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एकंदर ८,९६८ ईव्ही या महिन्यात विकल्या गेल्या असून, टाटा मोटर्सने या विभागात तिचे अव्वल स्थान कायम राखले आहे.

गेल्या वर्षी याच महिन्यात एकूण ईव्ही विक्रीचे प्रमाण ७,५३९ असे होते, असे 'फाडा' या वाहन वितरकांच्या संघटनेने शुक्रवारी जाहीर केले. फेब्रुवारीत टाटा मोटर्सच्या ३,८२५ ईव्ही विकल्या गेल्या, तर त्या खालोखाल एमजी मोटर इंडियाने ३,२७० वाहने विकली. आता एकूण प्रवासी वाहनांच्या बाजारपेठेत 'ईव्हीं'नी ३ टक्के वाटा गाठला आहे.

गेल्या महिन्यात इलेक्ट्रिक दुचाकींच्या विक्री ७६,०८६ अशी म्हणजेच फेब्रुवारी २०२४ मध्ये विक्री झालेल्या ८२,७४५ दुचाकींच्या तुलनेत ८ टक्क्यांनी घटली आहे. गेल्या महिन्यात २१,३८९ इलेक्ट्रिक दुचाकींच्या विक्रीसह बजाज ऑटोने या विभागात आघाडी घेतली. फेब्रुवारीमध्ये इलेक्ट्रिक तीन चाकी वाहनांच्या किरकोळ विक्रीत वार्षिक तुलनेत ५ टक्क्यांची वाढ होऊन ती ५३,११६ वर पोहोचली आहे.

# चित्रपट वार्ता

### 'उरी' फेम अभिनेत्रीने मिळवली पीएच. डी.



**मुंबई** : 'उरी-द सर्जिकल स्ट्राईक' चित्रपट प्रदर्शित होऊन सात वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. त्यात बालकलाकार म्हणून झळकलेली रिवा अरोरा आता मोठी झाली आहे. चित्रपटात तिने विकी कौशलच्या भाचीची भूमिका साकारली होती. रिवाला आता पाहिल्यावर कोणीही ओळखू शकणार नाही. अवघ्या १९ व्या वर्षी तिने डॉक्टरेट मिळवली आहे. 'डिजिटल एन्फ्लुएन्स ॲण्ड वुमन एम्पॉवरमेंटर' या विषयावर तिने प्रबंध सादर केला होता. आदिशंकर वैदिक विद्यापीठातून तिला पीएच. डी. पदवी मिळाली आहे. स्वप्न पूर्ण झाल्याचा अभिमान वाटतो आहे, असे तिने फोटोसोबत लिहिले आहे.

### अभिषेकने आईकडून शिकली दोन घड्याळे घालण्याची फॅशन



**मुंबई** : अलिकडेच अभिषेक बच्चनचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो दोन्ही हातात घड्याळ घातलेला दिसत आहे. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर अनेक युजर्स त्याला ट्रोलही करत आहेत. पण, अभिषेकचा एक जुना व्हिडीओही समोर आला आहे, ज्यामध्ये त्याने दोन्ही हातात घड्याळ घालण्याचे कारण सांगितले आहे. त्याला त्याच्या आई जया बच्चनकडून हातात दोन घड्याळे घालण्याची सवय लागली. जेव्हा तो युरोपमधील बोर्डिंग स्कूलमध्ये होता, तेव्हा त्याची आई (जया) दोन्ही हातांमध्ये घड्याळे घालायची. जया बच्चन असे का करायच्या हेही त्याने सांगितले. अभिषेक म्हणाला होता, आई दोन्ही हातात दोन घड्याळ घालायची जेणेकरून तिला दोन्ही ठिकाणांचे, म्हणजे भारत आणि युरोपचे टाइम झोन कळतील. मग काही काळानंतर, पप्पांनीही (अमिताभ) दोन्ही हातांवर घड्याळे घालायला सुरुवात केली, जेणेकरून आईप्रमाणे त्यांनाही दोन्ही ठिकाणांचे टाइम झोन कळू शकतील आणि ते त्यानुसार माझ्याशी बोलत असत. पण, आता अमिताभ बच्चनने त्याच्या चित्रपटांमध्ये ही एक फॅशन बनवली आहे.

### हनी सिंगच्या कॉन्सर्टचे एक कोटीचे साहित्य जप्त



**इंदूर** : गायक-रॅपर यो यो हनीसिंगचा (हिरदेशसिंग) इंदूरमधील संगीत कार्यक्रम महानगरपालिकेसाठी महागडा ठरला. एकीकडे शो अवघ्या दीड तासात संपल्याने चाहते संतप्त झाले होते, तर दुसरीकडे, महापालिकेला लाखो रुपयांचे कराचे नुकसान सहन करावे लागले. प्रत्यक्षात इंदूर महानगरपालिकेने संगीत कार्यक्रमाच्या आयोजकांकडून ५० लाख रुपयांचा कर मागितला होता. तथापि, त्यांनी महानगरपालिकेला फक्त ७.७५ लाख रुपये दिले. अशा परिस्थितीत, रविवारी महानगरपालिकेचे पथक कार्यक्रमस्थळी पोहोचले आणि त्यांनी संपूर्ण साऊंड सिस्टिम जप्त केली. त्याची किंमत सुमारे एक कोटी रुपये आहे. महानगरपालिकेने यो यो हनीसिंगच्या 'मिलियनेअर इंडिया टूर' कॉन्सर्टच्या आयोजकांना मनोरंजन कर वसूल करण्यासाठी नोटीस बजावली होती.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# हटवादाला बळच मिळणार!

अमेरिकेच्या भरवशावर राजकारण करणाऱ्या आणि धोरण ठरवणाऱ्या देशाला कसे तोंडघशी पडावे लागते, याचे युक्रेन हे ज्वलंत उदाहरण ठरत आहे. रशियाविरुद्धच्या युद्धात अमेरिकेसह अवघे जग युक्रेनच्या पाठीशी उभे राहिले. मात्र, अमेरिकेत सत्तांतर झाल्यानंतर ट्रम्प यांनी युक्रेनच्या अध्यक्षांचा माध्यमांसमोर पाणउतारा केला, हे जगाने पाहिले. अमेरिकेची सत्ता एका विक्षिप्त, एककल्ली आणि हेकेखोर व्यक्तीकडे आल्याची फळे जग भोगते आहे. अमेरिकेत आठ वर्षांपूर्वीच्या निवडणुकीत हिलरी क्लिंटन यांचा पराभव करण्यासाठी रशियाने केलेली मदत डोनाल्ड ट्रम्प विसरलेले नाहीत. रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतिन आणि ट्रम्प हे दोघेही युद्धपिपासू वृत्तीचे आहेत. त्यांचा शेजारच्या देशांवर डोळा आहे. रशियाने क्रिमियाचा घास घेतला. आता युक्रेनचे लचके तोडायचे असतील तर ट्रम्प यांना पनामा कालव्याची मालकी हवी आहे. कॅनडा आणि मेक्सिकोवर त्यांचा डोळा आहे. 'समान शीले व्यसने सुसख्यम' असे म्हटले जाते. पुतिन आणि ट्रम्प यांना या न्यायाने एकत्र आणले आहे. जागतिक फौजदारी करणारी अमेरिका आपल्या सोयीची भूमिका घेत असते. तिला दक्षिण आशियामध्ये चीनला शह देण्यासाठी भारताची गरज लागते. त्याचबरोबर शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांची झोळी भरण्यासाठी हा देश पाकिस्तानलाही मदत करत असतो. अमेरिकेच्या 'ओव्हल ऑफिस'मध्ये ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांच्यामध्ये झालेली जोरदार वादावादी अलिकडेच जागतिक चर्चेचा विषय बनली. असे असले, तरी पुतिन यांनी याबाबत एखादे वक्तव्यही केले नाही. ट्रम्प यांची भूमिका रशियाच्या हिताची असल्यामुळे पुतिन यांची जणू चांदीच झाली आहे. त्यांना काहीही बोलण्याची गरज राहिलेली नाही. पुतिन आतापर्यंत युक्रेनबाबत आक्रमक भूमिका घेत होते, ती भूमिका आता ट्रम्प घेत आहेत. ट्रम्प आधीच युक्रेनच्या अध्यक्षांना फटकारण्याचा विचार करत होते. झेलेन्स्कीसोबतची आपली भेट जगभरात चर्चेचा विषय ठरेल, असे ते म्हणाले होते. त्यामागेही खनिज व्यवहार हेच कारण होते. खनिज व्यवहाराबाबत युक्रेन आपली पावले मागे घेत आहे. अमेरिकेशी खनिज करार केल्याच्या बदल्यात त्यांना रशियन हल्ल्यांपासून सुरक्षिततेची हमी हवी होती.

कोणताही देश तेवढी अपेक्षा बाळगणारच; परंतु अमेरिकेला युक्रेनचा खनिज साठाही हवा आहे आणि पुतिन यांना आवरही घालायचा नाही. त्यामुळे झेलेन्स्की यांची भूमिका चुकीची नाही. संयुक्त राष्ट्र संघात अमेरिकेने रशियाच्या विरोधात भूमिका घेण्याचे टाळले, तेव्हाच ट्रम्प यांच्या पुढील धोरणाची दिशा काय असेल, हे स्पष्ट झाले होते. ट्रम्प म्हणतात की, अमेरिकेने युक्रेनसाठी आतापर्यंत जे काही केले आहे, त्याची किंमत खनिज पदार्थांच्या व्यवहारांमधून चुकवावी लागेल. रशियाचे माजी अध्यक्ष आणि सध्याचे सुरक्षा परिषदेचे उपप्रमुख दिमित्री मेदवेदेव यांनी सांगितले की, झेलेन्स्की यांना 'ओव्हल हाऊस'मध्ये थापड मारण्यात आली. अमेरिकेने कठोर कारवाई करून युक्रेनला पूर्णपणे मदत करणे बंद करावे, असे ते म्हणाले. अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प हे पुतिन यांच्याशी अतिशय सौम्यपणे वागत आहेत. या दोघांची सौदी अरेबियात भेट होऊ शकते, अशी चर्चा आहे. त्यांच्यात अनेक वेळा फोनवरूनही बोलणे झाले असून दोन्ही नेत्यांनी एकत्र काम करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. आर्थिक सहकार्याबाबत दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी भेटीगाठी सुरू केल्या आहेत. याशिवाय रशियानेही अमेरिकेला एक नवी ऑफर दिली आहे. झेलेन्स्की आणि ट्रम्प यांच्यातील वादावादीनंतर अमेरिका रशियाची ऑफर स्वीकारू शकते. युक्रेनमध्ये खनिजे मुबलक प्रमाणात असलेल्या काही जागा रशियाच्या ताब्यात असल्याचे रशियाचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेने रशियाला पाठिंबा देऊन युक्रेनला सहकार्य करणे सोडले, तर अमेरिकेला त्या ठिकाणी खाणकामाचे अधिकार दिले जाऊ शकतात आणि रशिया स्वतः खाणकाम करून अमेरिकेला फायदा देऊ शकतो. ट्रम्प अध्यक्ष झाल्यापासून रशियाचा असा विश्वास आहे की आता या युद्धात त्यांचा वरचष्मा आहे. येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की, 'ओव्हल हाऊस'मध्ये ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यातील चर्चेदरम्यान ट्रम्प यांनी वारंवार ते सध्या करार करण्याच्या स्थितीत नाहीत, या मुद्द्यावर जोर दिला. अमेरिकेतील घटनेवर भाष्य करण्याऐवजी पुतिन आता शांत राहून वारे कोणत्या दिशेने वाहतात, हे पाहतील. संपूर्ण जगातील माध्यमांसमोर अमेरिकेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी झेलेन्स्की यांचा अपमान केला. झेलेन्स्की हे त्याच देशाचे अध्यक्ष आहेत, ज्यावर पुतिन यांनी तीन वर्षांपूर्वी हल्ला केला होता. हे युद्ध अजूनही चालू आहे. वॉशिंग्टनमध्ये झालेल्या या बैठकीवर आणि त्यादरम्यान झालेल्या जोरदार चर्चेवर पुतिन यांनी लगेचच कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही; मात्र काही रशियन अधिकाऱ्यांनी याबाबत भाष्य केले आहे. एकीकडे अमेरिका-युक्रेन संबंध बिघडण्याचा धोका आहे, तर दुसरीकडे अमेरिका-रशिया संबंधांच्या बाबतीत परिस्थिती पूर्णपणे उलट आहे. ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात बाचाबाची झाल्यानंतर युरोपियन महासंघाने मात्र युक्रेनला पाठिंबा जाहीर केला आणि झेलेन्स्की यांच्या समर्थनार्थ सोशल मीडियावर अनेक पोस्टदेखील केल्या. रशिया-युक्रेन युद्धातून अमेरिकेने माघार घेतल्यास युक्रेन वाचवण्याची जबाबदारी युरोपच्या खांद्यावर येईल. ट्रम्प यांनी कोणतेही युद्ध झाले, तर अमेरिका त्यापासून दूर राहील, असे स्पष्ट केले आहे. आता युक्रेन रशियाशी युद्ध करू शकणार नसेल, तर युरोपीय देश रशियाशी थेट युद्ध लढतील का, हा प्रश्न समोर उभा आहे. झेलेन्स्की यांना भेटण्यापूर्वी ट्रम्प यांनी युरोपचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आलेले ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टार्मर यांचीही भेट घेतली होती. ट्रम्प म्हणाले होते की, संपूर्ण युरोप रशियाशी युद्ध करणार आहे आणि युक्रेन त्याचा केंद्रबिंदू बनेल. यापूर्वी त्यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांचीही भेट घेतली होती. अमेरिकेने युद्धातून माघार घेतल्यानंतर झेलेन्स्की एकटे पडले. अशा परिस्थितीमध्ये युरोपीय संघातील देशांना एकत्र यावे लागेल. यासाठी सर्वप्रथम त्यांना युक्रेनच्या सुरक्षेची हमी द्यावी लागेल. तथापि, रशियाने युक्रेनला सुरक्षेची हमी देण्यास सहमती दिल्यास युरोपियन देशांवर हल्ले केले जाण्याची शक्यता आहे. आता मोठा प्रश्न निर्माण होत आहे की एकट्या रशियाशी लढण्याची क्षमता युरोपमधील देशांमध्ये आहे का? याबाबत आकडे वेगळीच कथा सांगतात. रशिया युरोपियन महासंघातील देशांपेक्षा अनेक बाबतीत खूप पुढे आहे. युरोपियन महासंघाकडे १४ लाख नियमित सैनिक आहेत, तर रशियाकडे १५ लाख आहेत. युरोपियन महासंघाकडे १७ लाख राखीव सैनिक आहेत तर रशियाकडे २५ लाख राखीव सैनिक आहेत. अण्वस्त्रांच्या बाबतीत रशियाशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही.

युरोप आणि रशिया यांच्या क्षमता जगजाहीर असताना अमेरिका आणि रशियात संबंध पूर्ववत करण्यासाठी आणि संभाव्य आर्थिक सहकार्यावर चर्चा करण्यासाठी दोन्ही बाजूंच्या खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये चर्चा सुरू झाली. अध्यक्ष पुतिन यांनी अमेरिकेला दुर्मिळ खनिजे आणि ॲल्युमिनियम उत्पादनांशी संबंधित आकर्षक संयुक्त प्रकल्पांचे आमिष दाखवले आहे. अमेरिकेच्या युक्रेनबरोबरच्या संबंधांमध्ये बिघाडाचे परिणाम युक्रेनसाठी गंभीर असले, तरी रशियासाठी सकारात्मक ठरणार आहेत. अमेरिकेने युक्रेनला शस्त्रे देणे बंद केल्यास युक्रेनला रशियन सैन्याच्या हल्ल्यापासून स्वतःचे संरक्षण करणे कठीण होईल. युक्रेनला युरोपीय नेत्यांचा भक्कम पाठिंबा आहे; परंतु असे असूनही रशियन सैन्याने युक्रेनच्या अनेक भागांवर कब्जा केला आहे. युक्रेनशी सुरू असलेल्या युद्धात आपली बाजू वरचढ असल्याचा रशियाचा दावा आहे. 'ओव्हल ऑफिस'मध्ये ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात झालेल्या वादामुळे त्यांच्या या हटवादाला आणखी बळ मिळाले असल्यास आश्चर्य नाही.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# आर्थिक विकासाचा दर वाढला!

देशाच्या आर्थिक विकास आघाडीवर काही सकारात्मक संकेत आहेत. भारत सरकारने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीत देशाचा जीडीपी म्हणजे सकल घरेलू उत्पादनाचा दर ६.२ टक्के झाला. त्यापूर्वीच्या तिमाहीत हा दर ५.६ टक्के होता.

आर्थिक आघाडीवर ही एक चांगली बाब मानली जात असली तरी वर्षभरापूर्वी हा दर ९.५ टक्के होता. म्हणजे वर्षभरापूर्वीच्या तुलनेत आजही हा दर कमी आहे. मात्र, ५.६ टक्के हा नीचांक आता मागे पडला असून, जीडीपीने ६.२ टक्के हा आकडा गाठला आहे.

जीएसटीचे संकलन, वीज उत्पादन, सरकारी खर्चात झालेली वाढ या मानकांवरून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

**निर्यात वाढ :** २०२४ च्या शेवटच्या तिमाहीत निर्यात १०.४ टक्क्यांनी वाढली. त्यापूर्वीच्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ ३ टक्के अधिक आहे. आयात १.१ टक्के घटली. डॉलरच्या तुलनेत रुपया घसरला असल्याने ही घट झाली असावी असे तज्ज्ञांना वाटते. मात्र सरकारला चिंता वाटावी अशी बाब म्हणजे विदेशी गुंतवणुकीत झालेली घट.

जीडीपी वाढण्याचा दर आगामी काळातही कायम राहील व तो ७.५ टक्के यावर पोहोचेल असे सरकारला वाटत आहे.

**दास यांची नियुक्ती :** रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर शक्तिकांता दास यांना पंतप्रधानांचे मुख्य सचिव नियुक्त करण्यात आले आहे. सरकारमध्ये महत्त्वाची कामगिरी मिळणारे ते दुसरे गव्हर्नर असतील. यापूर्वी डॉ. मनमोहनसिंग यांना प्रथम अर्थमंत्री व नंतर देशाचे पंतप्रधान म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. या पृष्ठभूमीवर दास यांच्या नियुक्तीला महत्त्वाचे मानले जात आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठीच त्यांची ही नियुक्त करण्यात आल्याचे मानले जाते. दास यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून देशाची अर्थव्यवस्था सांभाळण्यात यशस्वी भूमिका बजावली आहे. आता त्यांना अधिक मोठी भूमिका बजावण्याची संधी देण्यात आली आहे. अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती, घसरता रुपया व डोनाल्ड ट्रम्प यांच्या काही निर्णयांचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारा संभाव्य परिणाम हे सारे हाताळण्याची कामगिरी दास यांना पार पाडावी लागणार आहे. यातही रुपया सावरण्यासाठी ठोस उपाययोजना दास यांच्याकडून अपेक्षित आहे. डॉलर ९० रुपयापर्यंत जाऊ नये असे सरकारला वाटते. मात्र तो आताच ८८ रुपयांच्या उंबरठ्यावर आहे. रुपयाची ही घसरण रोखण्यासाठी दास हे सरकारला मार्गदर्शन करतील असे समजते.

**शेअर बाजार :** मागील काही काळापासून शेअर बाजारात बरीच उलथापालथ होत आहे. अमेरिकेत घडणाऱ्या घटनांचा परिणाम भारताच्या शेअर बाजारावर होणे अपरिहार्य असल्याचे मानले जाते. शेअर बाजारात स्थिरता आणण्यासाठीही दास यांच्याकडून काही उपाययोजना अपेक्षित आहेत.

**केजरीवाल राज्यसभेत? :** दिल्लीचे मुख्यमंत्रिपद व आमदारकी- दोन्ही



गमावल्यानंतर आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल राज्यसभेचा दरवाजा ठोठावतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती, ती आता खरी ठरण्याचे संकेत आहेत. पंजाबमधील आपच्या एका आमदाराचे निधन झाल्याने लुधियाना पश्चिम मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे आणि त्यासाठी आपने आपले राज्यसभा खासदार संजीव अरोरा यांची उमेदवारी घोषित केली आहे. अरोरा निवडून आल्यानंतर त्यांना मंत्री केले जाईल व त्यांच्या रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागी केजरीवाल यांना पाठविले जाईल असे समजते. पंजाबमधून आपचे सात खासदार राज्यसभेवर निवडून गेले आहेत व केजरीवाल यांच्यासाठी कोणताही खासदार आपली जागा रिक्त करण्यात तयार असेल असे सूचक विधान अरोरा यांनी केले आहे. याचा अर्थ अरोरा यांनी स्वत: याच कारणासाठी राज्यसभा सोडण्याचा निर्णय घेतला असे मानले जाते. अरोरा २०२२ मध्ये राज्यसभेवर निवडून गेले होते. त्यांचा कार्यकाळ २०२८ पर्यंत होता. याचा अर्थ केजरीवाल यांनी २०२८ पर्यंतची तरी आपली सोय केली आहे. मात्र मधल्या काळात होणाऱ्या राज्यसभा द्विवार्षिक निवडणुकीत ते पुन्हा सहा वर्षांसाठी राज्यसभेवर जातील असा कयास आम आदमी पक्षात नोंदविला जात आहे.

**राज्यसभेतही गरळ? :** केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभेत सारी मर्यादा-शालीनता बाजूला ठेवीत पंतप्रधानांच्या विरोधात जे गरळ ओकणे सुरू केले होते, तेच ते राज्यसभेत करतील असे मानले जाते. केजरीवाल यांची एकूणच भाषा असभ्य मानली जाते. दिल्ली विधानसभेत त्यांच्या भाषणांना मर्यादित प्रसिद्धी मिळत होती, ते राज्यसभेत आल्यावर काय काय होणार याचा केवळ कयास व्यक्त केला जात आहे. मधल्या काळात आपचे राज्यसभा खासदार फुटणार अशी चर्चा केली जात आहे. केजरीवाल राज्यसभेत येताच त्यांच्या पक्षाचे काही खासदार वेगळा गट स्थापन करू शकतात. केजरीवाल यांचे एक नातेवाईक व राज्यसभा खासदार स्वाती मालिवाल यांनी यापूर्वीच केजरीवाल यांच्या विरोधात आघाडी उघडली आहे. केजरीवाल यांचे समर्थक व विश्वासू राघव चड्ढा हेही केजरीवाल यांच्या कार्यशैलीवर नाराज असून त्यांचे विदेशातील वाढते वास्तव्य पाहता ते अनिवासी भारतीय तर झाले नाहीत ना असा प्रश्न आम आदमी पक्षातच विचारला जात आहे. केवळ मालिवाल वा चड्ढाच नाही तर आणखी काही खासदार केजरीवाल यांच्या विरोधात बंडखोरी करू शकतात असे मानले जाते. केजरीवाल राज्यसभेत जाण्यापूर्वी राज्यसभेतील त्यांचे खासदार फुटतात की नंतर एवढाच काय तो प्रश्न बाकी असल्याचे आप नेत्यांना वाटते.

**आमदारही फुटणार? :** दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे २२ आमदार निवडून आले आहेत. यातील ६ ते ८ आमदार फुटण्याची शक्यता आहे. केजरीवाल व आम आदमी पक्षाला आता कोणतेही भवितव्य नसल्याची भावना या पक्षात तयार होत आहे आणि त्याचा हा परिणाम असण्याची शक्यता आहे.

**कायदेशीर अडचणी :** केजरीवाल यांच्यासमोर केवळ राजकीय आव्हान नाही तर त्यांच्या कायदेशीर अडचणीही वाढण्याची शक्यता आहे. केजरीवाल मुख्यमंत्री असताना देशातील नामवंत वकील त्यांची बाजू मांडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात उभे राहात होते. आता ते चित्रही दिसणार नाही असे काही नेत्यांना वाटते.

**काँग्रेससोबत राहणार? :** दिल्ली निवडणुकीत काँग्रेसशी समझोता न झाल्याने १२ मतदारसंघात आपचे उमेदवार पराभूत झाले. दिल्लीत काँग्रेस व आप एकत्र लढले असते तर कदाचित दिल्लीचे निकाल वेगळे राहिले असते. दिल्लीत स्वबळावर लढण्याचा निर्णय केजरीवाल यांनी स्वत:च घेतला होता. दिल्लीत त्यांना स्वबळाची प्रचीती आली. त्यामुळे या पराभवासाठी त्यांना काँग्रेसला जबाबदार ठरविता आले नाही. त्याचप्रमाणे येणाऱ्या काळात आपण स्वबळावर लढू शकत नाही याची कल्पना केजरीवाल यांनाही आली आहे. त्यामुळे त्यांनी काँग्रेसवर टीका केलेली नाही. अन्यथा त्यांनी काँग्रेसवर तोफा डागणे सुरू केले असते.

केजरीवाल यांच्यासमोर आपले राजकीय अस्तित्व टिकविण्याचा फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे राज्यसभेत जाणे. त्यांनी सध्या तरी हा मार्ग निवडण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यसभा हे ज्येष्ठांचे सभागृह. अशा सभागृहात केजरीवाल आरोपांच्या फैरी झाडताना कनिष्ठतेची कोणती पातळी गाठतात हे दिसणार आहे.

## वेध

**हेमंत सालोडकर**

# नागपुरातील ऑटोचालकांचा अभिनव स्वयंशिस्त उपक्रम

जसा राजा तशी प्रजा असते असे म्हणतात. आपले लोकप्रतिनिधी कसे आहेत, यावरून लोकांची, समाजाची वागणूक ठरते. लोकप्रतिनिधी कसे आहेत, ते किती जागरूक आहेत तसाच विचार समाज, संस्था करतात. प्रत्येक काम सरकार करेल ही प्रवृत्ती पूर्वी होती. पण मागील काही काळापासून समाजात सकारात्मक बदल दिसून येत आहे. याचे कारण म्हणजे आपले राज्यकर्ते कसे आहेत याचाही विचार लोक करतात. राज्यकर्ते नाकर्ते असले म्हणजे लोक कोणतीही गोष्ट फार गांभीर्याने घेत नाहीत. राज्यकर्तेच निष्क्रिय आहेत, मग मला काय करायचे या विचाराने ते वागत असतात. पण मागील दहा वर्षांपासून केंद्रात आणि तीन वर्षांपासून राज्यात महायुतीचे सरकार असताना समाजात, प्रशासकीय रचनेत लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक लोकहिताचे काम सरकार करेल, अशी प्रवृत्ती पहिले दिसत होती. पण आपले लोकप्रतिनिधी लोकहिताची कामे करत असताना सामाजिक संघटना, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक संघटना पुढाकार घेत असून, विविध उपक्रम राबवून सरकारचा ताण कमी करीत आहे. त्यातलाच एक उपक्रम म्हणजे वाहतूक पोलिसांचा ताण कमी व्हावा आणि स्वयंशासन म्हणून नागपुरातील ऑटोचालकांनी आमचे शहर, आमचा ऑटोरिक्षा, सुरक्षेची जबाबदारीही आमचीच हा होय. साधारणत: अत्यंत बेशिस्त वाहनचालक म्हणून



ऑटोरिक्षाचालकांची सर्वत्र ओळख आहे. ग्राहकांशी वाद घालणे, मुजोरी करणे, आवश्यकतेपेक्षा अधिक प्रवासी भरणे, रस्त्यावर बेफाम ऑटो चालवणे, नियमांचे सर्रास उल्लंघन करणे अशा घटना वारंवार करणे आणि आमचेच खरे या आविर्भावात वावरणारे म्हणजे ऑटोचालक अशी त्यांची ओळख. पण ही ओळख पुसण्यासाठी आणि समाजातील स्वत:ची प्रतिमा सुधारण्यासाठी ऑटोचालकांनीच पुढाकार घेतला आहे. आतापर्यंत आपण बेछूट वागलो याची जाणीव त्यांना झाली आणि स्वयंशिस्तीसाठी त्यांनी स्वत:च पुढाकार घेतला हे बरे झाले. नागपुरातील ऑटोरिक्षा चालक संघटनेने ऑटोचालकांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी त्यांनी पत्रकेही वाटली. पहिल्याच दिवशी या उपक्रमाला चालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. पण शिस्त किती दिवस टिकेल हाही प्रश्नच आहे. कारण पैसे कमावण्याच्या नादात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरणे, बेफाम ऑटो चालवणे, रस्त्यावरच्या पायी चालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला 'कुठे चलायचं आहे' असे विचारणारे, त्यामुळे मागून येणाऱ्याचा अपघात होईल, याची किंचितही तमा न बाळगणारे, आपल्या व्यवसायाशी स्पर्धा नको असलेले ऑटोचालक आता शिस्तीसाठी प्रत्येक चौकात तीन तास देणार आहेत.

ऑटोचालकांमध्ये बदल झाल्यास अपघातांची संख्या निश्चितच कमी होईल. त्यामुळे ऑटोचालक आणि इतरही लोक सुरक्षित राहतील. खरे तर ही जाणीव यापूर्वीच होणे गरजेचे होते. समाजातील प्रत्येक घटक शिस्तीने वागला तर अपघातच होणार नाहीत. पण हल्ली रॉंग साईड तेही बेफाम वाहन चालवणे ही नित्याचीच बाब झाली आहे. ऑटोचालकांविषयी तर बोलायलाच नको. त्यांना काही म्हटले तर तेच हमरीतुमरीवर येतात. कायद्याचा धाक नाही. एका ऑटोचालकाशी वाद घातला तर इतरही अंगावर येतात. मग कोण त्यांच्याशी वाद घालणार असे म्हणून लोक मुकाट्याने पुढे जातात. याचाच फायदा ऑटोचालक घेतात आणि कसेही वागतात. संपूर्ण रस्ता आमचाच आहे, या आविर्भावात ते असतात. वाहतुकीचे आम्ही पालन करणार नाही अशी त्यांनी प्रतिज्ञा केली असते. पोलिसही त्यांना अडवत नाही म्हणून आम्हीच रस्त्यावरचे राजे आहोत, अशी ऑटोचालकांची वागणूक असते. इतरांशी आपण स्पर्धा करायची नाही आणि इतर कोणी आपल्याशी करीत असेल तर त्यांची अडवणूक करायची, इतर कोणी चांगली सेवा देणाऱ्यांचा विरोध करायचा अशी संकुचित प्रवृत्ती बळावल्यामुळेच ऑटोचालकांविषयी समाजात एकप्रकारचा नकारात्मक भाव निर्माण झाला आहे. हा नकारात्मक भाव मिटविण्यासाठी ऑटोचालकांमधीलच काही सुज्ञ लोक समोर आले हे चांगले झाले. सोनारानेच कान टोचल्यामुळे त्यांच्यात बदल घडेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. त्यांचा उपक्रम फलदायी ठरो, त्यांच्यात सकारात्मक बदल होवो, त्यांच्यात आत्मचिंतनाची प्रक्रिया अशीच सुरू राहावी, त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य चांगले राहील, अशी अपेक्षा आहे.

९८५०७५३२८१

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# निकोप दृष्टिकोन हवा

नुकताच जागतिक महिला दिवस सर्वत्र साजरा करण्यात आला. अनादी काळापासून भारताला कर्तृत्ववान महिलांची एक मोठी परंपरा लाभलेली आहे.

प्राचीन काळापासून महान विदुषी गार्गी, याज्ञवल्क्य ऋषींची पत्नी मैत्रेयी, रामायणामध्ये ज्यांचा विशेष उल्लेख आला आहे अशा राम पत्नी सीता, वालीची पत्नी तारा आणि रावणाची पत्नी मंदोदरी, त्याचप्रमाणे महाभारतामध्ये ज्यांचा विशेष उल्लेख आला आहे अशी द्रौपदी, आपल्या पुत्रांना म्हणजे पांडवांना योग्य उपदेश करणारी कुंती, छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणारी जिजामाता, राणी चन्नम्मा राणी दुर्गावती, 'मेरी झांसी नहीं दूंगी' म्हणणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई, कुशल प्रशासक अहल्यादेवी होळकर, आझाद हिंद फौजेमध्ये महिलांचे नेतृत्व करणाऱ्या कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये आपले योगदान देणाऱ्या प्रीतिलता वड्डेदार, शांती घोष, दुर्गा भाभी आणि भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारताचे नेतृत्व करणाऱ्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, सुषमा स्वराज आणि आता सद्य:स्थितीत भारताचा आर्थिक डोलारा सांभाळणाऱ्या निर्मला सीतारामन्? अशी कितीतरी नावे घेता येतील. पतीला भारतीय सैन्यामध्ये लढताना वीरमरण आलेले असताना स्वतः भारतीय सैन्याचे कठोर प्रशिक्षण घेऊन सैन्यामध्ये प्रवेश करणाऱ्या अनेक रणरागिणी सुद्धा आहेत. कोरोनाच्या काळामध्ये पतीचे निधन झाल्यानंतर आपल्या कुटुंबाचा डोलारा सांभाळणाऱ्या अनेक सावित्री सुद्धा समाजामध्ये आहेत. नोकरी आणि घर अशी तारेवरची कसरत करून आपल्या जबाबदारींना न्याय देणाऱ्या सुद्धा लाखो महिला आहेत. अशा सर्वांच्या कर्तृत्वाला प्रणामच केला पाहिजे.

असे असताना सुद्धा भारतामध्ये कम्युनिस्टांची वर्गसंघर्षाची नीती अमलात आणणारे अनेक गट स्त्री विरुद्ध पुरुष असा संघर्ष निर्माण करताना आपल्याला दिसतात. वृत्तपत्रांतून, समाज माध्यमांतून असे अनेक भरकटलेले विचारवंत हा संघर्ष जोपासताना दिसतात. स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांना अतिरंजक स्वरूप देऊन संपूर्ण पुरुष समाजालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणारे लोक सुद्धा आहेत. यावेळेस याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले जाते की करोडो लोकांच्या पुरुष समाजामध्ये असे अत्याचार करणारे केवळ काहीच आहेत. अत्याचार करणाऱ्या लोकांना चौकामध्ये बदडणारे सुद्धा पुरुषच असतात. प्राचीन काळामध्ये एका सीतेसाठी रामायण झालेले आहे. एका द्रौपदीसाठी महाभारत घडलेले आहे. परंतु असे असताना सुद्धा काही लोकांना आपल्या पत्नीसाठी रावणाच्या विशालकाय सैन्याशी लढा देणारा व रावणासारख्या बलाढ्य शत्रूला यमसदनी पाठविणारा राम प्रेरक वाटत नाही तर त्यांना सीतेला स्पर्श न करणारा रावण विनयशील वाटतो. समाज माध्यमांवर, काही ठिकाणी वृत्तपत्रांमध्ये सुद्धा अशा पद्धतीचे लेख वाचण्यात येतात. त्यावेळेस हे सर्व लोक समाजाला भ्रमिष्ट करण्याचा प्रयत्न करणारे आहेत, समाजासमोर खोटे आदर्श प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारे आहेत, खलनायकांना नायक सिद्ध करण्याचा खटाटोप करणारे आहेत असे वाटते.

रावणाने सीतेला स्पर्श का केला नाही याचे कारण रावणाने स्वतःच युद्धकांडामध्ये दिलेले आहे. त्यात तो म्हणतो की, फार पूर्वी पुंजीकस्थला नावाची एक अप्सरा होती. ती माझ्या भयाने लपून-छपून जात असताना मी तिला पकडले व तिच्या इच्छेविरुद्ध वर्तन केले यामुळे ब्रह्मदेवाने मला शाप दिला. यापुढे जर मी कुठल्याही स्त्रीचा तिच्या इच्छेविरुद्ध उपभोग घेतला असता माझ्या डोक्याचे शंभर तुकडे होतील. त्याचप्रमाणे कुशध्वज नावाच्या ऋषींची मुलगी वेदवती ही विष्णूसाठी तपश्चर्या करीत असताना रावणाने तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला असता तिने सुद्धा रावणाला शाप दिला ती कुठल्याही स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तू बळजबरी करण्याचा प्रयत्न केलास तर तू अग्नीमध्ये भस्म होशील. रावणाने नलकुबेराची पत्नी रंभा हिच्यावर सुद्धा अतिप्रसंग केला होता. त्यावेळेस नलकुबेराने त्याला शाप दिला की, तू कुठल्याही स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी बळजबरी केल्यास तुझ्या मस्तकाचे तुकडे होऊन तू मरण पावशील. असे सर्व दाखले रामायणामध्ये आलेले आहेत.

पूर्वी अशा पद्धतीचा शाप म्हणजे त्या व्यक्तीवर घातले गेलेले बंधन असे. आता असे बंधन कायद्याचे आहे. कायदे कठोर असणे व त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. आपल्या समाजामध्ये कायदा व त्याची अंमलबजावणी याच्यामध्ये बरेचदा तफावत आढळते. अनेकदा गुन्हेगार पुराव्याअभावी सुटतात. महिला अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये अनेक वेळा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा अभाव, पोलिसांकडून प्रभावीपणे न झालेला तपास, न्यायालयांमध्ये वर्षानुवर्ष चालणारे खटले यामुळे सुद्धा न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये वेळ लागत असतो. काळ थांबत नाही. एखाद्या अल्पवयीन किंवा तरुण मुलीवर झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये पीडितेचे वय वाढत असते. त्यांचे लग्न, सांसारिक जबाबदाऱ्या या सर्व प्रकरणांमध्ये त्यांची मानसिकता गुन्हेगाराला शिक्षा होण्यासाठी कायम राहणे हेही महत्त्वाचे असते.

धर्मामध्ये प्रकृती, विकृती आणि संस्कृती सांगितली गेलेली आहे. माझ्याजवळ एक पोळी आहे. मला भूक लागलेली आहे. अशा वेळेस मी एक पोळी खाणे ही प्रकृती आहे. त्याच वेळेस कोणी भुकेला माणूस आल्यास त्याला त्यातली अर्धी पोळी देणे ही संस्कृती आहे व मला आणखी एक पोळी पाहिजे म्हणून दुसऱ्या जवळची एक पोळी हिसकावून घेणे ही विकृती आहे. काही वर्षांपूर्वी दिल्लीमध्ये झालेले निर्भया कांड ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना होती. समाजामध्ये सर्व स्तरातून याचा निषेध करण्यात आला. महिलांबरोबरच पुरुषही याच्या विरोधात रस्त्यावर उतरले होते. काही वर्षांपूर्वी हैदराबाद येथे डॉक्टर प्रियांका रेड्डी या तरुणीवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला होता. त्याही वेळेस समाज क्षुब्ध झाला होता. पोलिसांनी असे करणाऱ्या आरोपींना गोळ्या घातल्या. त्यानंतर तेथे जमलेल्या समाजाने असे करणाऱ्या पोलिसांवर पुष्पवृष्टी केली होती. स्त्री विरुद्ध पुरुष अशा पद्धतीचा संघर्ष निर्माण करणे ही भारतीय संस्कृती नाही. महिला सक्षमीकरणासाठी, महिलांना अधिकाधिक संधी मिळण्यासाठी, स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटना थांबविण्यासाठी पुरुषांची अधिकाधिक मदत घेणे त्यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालयांमधून सुद्धा विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणे व त्यांना चांगल्या कामांमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. समाजाच्या भल्यासाठी स्त्री आणि पुरुष हे एकमेकांना पूरकच असले पाहिजे, विरोधी नव्हे. महिला दिनाच्या निमित्ताने याही पैलूचा विचार होणे आवश्यक आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### शापित क्रिकेटपटू

प्रत्येक खेळाडूची आपल्याला देशाकडून खेळायला मिळावे हीच एकमेव इच्छा असते. त्याकरिता तो खूप परिश्रम करतो. पद्माकर शिवलकर यांच्या नशिबात मात्र तो योग कधीही आला नाही. इतका उत्कृष्ट डावखुरा फिरकी गोलंदाज असूनही बिसेनसिंग बेदी, चंद्रशेखर, प्रसन्ना त्याच काळात भारतीय क्रिकेट संघात असल्याने भारतीय संघाकडून एकही कसोटी खेळू शकला नाही याचे खूप वाईट वाटते. पद्माकर शिवलकर यांना संधी मिळाली असती तर त्यांनी त्याचे सोने केले असते. देशांतर्गत झालेल्या सर्व क्रिकेट सामन्यांत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली होती. बेदी व ते दोघेही समकालीन डावखुरे फिरकी गोलंदाज होते. एक काळ असा होता की भारतीय क्रिकेट संघात अर्ध्यापेक्षा जास्त खेळाडू हे मुंबईचे असायचे, पण शिवलकर यांना कधीही संधी मिळाली नाही. आता क्रिकेट सामने ५ दिवसीय कसोटी बरोबरच ५०-५०, २०-२० षटकांचे खेळले जातात. त्यांच्या वेळी ते असते तर त्यांना भारताकडून खेळण्याची संधी मिळाली असती. नकतेच या शापित क्रिकेटपटने या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

**मोहन पांडे**/नागपूर

●● ●●

### होळी पारंपरिक सण

होळी म्हणजे शिमगा या सणाला हिंदू धर्मातील इतर सणांप्रमाणे अत्यंत महत्त्व आहे. हा सण फाल्गुन महिन्यात येत असून साधारणपणे तो पाच दिवस साजरा केला जातो. विविध प्रकारच्या हिंदू संस्कृतीने नटलेल्या संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या काही भागांमध्ये हा सण मोठ्या उत्साहाने दरवर्षी साजरा करण्यात येतो. या सणाला रंग, प्रेम आणि वसंत ऋतूतला अत्यंत महत्त्वाचा सण म्हणून महत्त्व प्राप्त झाले आहे. या सणाचे महत्त्व म्हणजे राधा आणि कृष्ण या देवतांचे शाश्वत आणि दैवी प्रेम साजरे करणे होय. याशिवाय होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. हे वसंत ऋतू कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. होळी हा रंगाचा सण असल्या कारणाने या सणाला होलिकोत्सव. होलिका दहन याशिवाय इतर अनेक नावे आहेत.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळली जातात आणि पेटलेल्या होळीभोवती बोंबा मारत लोकप्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात हिंदू धर्मातील लोक होळीच्या दिवशी पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात व होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदन साजरी करतात. तसेच होळीनंतर पाच दिवसांनी रंगपंचमी साजरी केली जाते. धूलिवंदनाला धूळवड देखील म्हटले जाते. त्या दिवशी होळीची राख अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळत घेतली जाते. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांना एकत्र आणणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पाहिले जाते. कोकणात तर हा सण अतिशय मोठा सण म्हणून साजरा केला जातो. प्रामुख्याने होळी सणाला गाणी सुद्धा म्हटली जातात. आदिवासी जमातीतील स्त्री-परुष हा दिवस गलाल उधळून, टीमक्या ढोल वाजून, नृत्य करून उत्साहाने साजरा करतात. या दिवशी लोक भोजनामध्ये गोड पुरी, मासळी व गोड भात या पदार्थांचा समावेश करतात. होळीच्या सणाची परंपरा ही १२ व्या शतकापासून सुरू असल्याचे दिसून येते.

**प्रा. प्रशांत पंत**/मूर्तिजापूर

●● ●●

### तिन्ही सांजेला दिवा लावण्याचे महत्त्व!

सूर्यास्ताच्या वेळी वातावरणात बदल होतात. या काळात मोठ्या प्रमाणात ऊर्जेची गरज असते. यावेळी वातावरणातील नकारात्मक शक्तींचे प्राबल्य कमी करण्यासाठी आणि जीवजंतूंची वाढ नियंत्रित करण्यासाठी प्रकाशाची आवश्यकता असते. म्हणून दिवे लावावे. इलेक्ट्रीक दिव्यांपेक्षा तेल किंवा तुपाच्या दिव्यांच्या लहरी प्रभावी ठरतात. दिवा लावण्याचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे.

सायंकाळी देवाजवळ आणि तळशीजवळ दिवा लावावा. दिव्याच्या वातीवरील काजळी रोज काढून टाकावी. शक्य असल्यास देवासमोर २४ तास (अखंड) दिवा तेवत ठेवावा. तिन्ही सांजेच्या वेळी दिवा लावण्याचे अनेक लाभ आहेत. त्यामुळे घराभोवती सात्त्विक लहरींचे संरक्षक कवच निर्माण होते. तसेच नकारात्मक शक्तींच्या प्रभावापासून संरक्षण मिळते. अपघात, नकारात्मक घटना, भीती व त्रास कमी होतो. बदलत्या ऋतूनुसार सूर्यास्तानंतर देवघरात आणि तुळशीपाशी दिवा लावावा. पहाटे अंघोळ करून देवघरात दिवा लावावा.

दिवा म्हणजे प्रकाशाची पूजा, जो देवतांचा प्रतीकात्मक स्वरूप आहे. त्यामुळे सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तानंतर दिवा लावणे आवश्यक आहे. तिन्ही सांजेच्या वेळी घरात राहून पूजा, शुभम करोति, स्तोत्रपठन आणि नामजप करावा.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### प्रबुद्ध भारत मंडळाच्यावतीने महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर येथे आज सकाळी प्रबुद्ध भारत तरुण मंडळचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो महिलांच्या उपस्थितीत जागतिक महिला दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रारंभी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाई व राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतीमेस महिला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ऍड. स्वाती मस्के, पतसंस्थेच्या संचालिका शोभा कापुरे, कर्मचारी पौर्णिमा वाघमोडे, दीपा गनचेरी, रेखा लाड, बीना लालबेगी, अनिता कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे , माजी नगरसेवक गणेश पुजारी, श्रीमंत जाधव आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी आरोग्य निरीक्षक बसवराज जमादार, आरोग्य निरीक्षक धीरज वाघमोडे, आरोग्य निरीक्षक नरसिंग बच्चू,आरोग्य निरीक्षक पंकज क्षीरसागर, पी.बी ग्रुप चे जेष्ठ कार्यकर्ते भारत बाबरे, पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष आदित्य चंदनशिवे, ॲड. विशाल मस्के,चंद्रकांत सोनवणे, गौतम इंगळे, धोंडीबा कापुरे, प्रकाश माने, सुरज वाघमोडे, शरद सोनवणे, गौतम शिंदे, लखन चंदनशिवे, संतोष वाघमारे, रोहन तळभंडारे, अशांना सांगे, सिकंदर शेख, राजू जाधव, आप्पा दोडमनी उपस्थित होते.



### बहुजन शिक्षक महासंघाच्यावतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त कर्तुत्वान महिला शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर हे होते. यावेळी महासंघाचे राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश शिंदे व रमेश लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी नामदेवराव बंडूजी भालशंकर यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रिया कदम, निर्मला मौळे, कविता कदम, पृथ्वी शिंदे, डॉ. श्रुतिका उडाणशिव, फरीदा बेलीफ, अजिमुलिस्सा सुभेदार, महानंदा शिंदे यांच्यासह इतर महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याच समारंभात दाऊत आतार यांची पुणे जिल्हा संपर्क प्रमुखपदी निवड तसेच नीलकंठ अय्यर यांच्या वाढदिवसानिमित्त व कल्पना टेकाळे यांची सरपंचपदी निवड झाल्या निमित्त सत्कार करण्यात आला.यावेळी उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष मुख्याध्यापक नितीन गायकवाड, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष दत्तात्रय शिंदे, मंगळवेढा तालुकाध्यक्ष विठ्ठल एकमल्ली, सिद्धेश्वर भुरले, आगतराव बनसोडे, रोहित गायकवाड, विठ्ठल मोरे, अभिजीत भंडारे, सुनील स्वामी, नागेश सातपुते, सचिन राजगुरू, नागनाथ गायकवाड, इरफान शेख, महिबूब तांबोळी यांच्यासह संघटनेतील इतर पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. प्रास्ताविक रवी देवकर यांनी केले. सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष प्रा. युवराज भोसले यांनी केले तर डॉ. राजदत्त रासोलगीकर यांनी आभार मानले.



### छत्रपती शिवाजी महाराजांना भारतीय जैन संघटनेच्यावतीने अभिवादन

**सोलापूर, दि.९ मार्च ,**

स्वराज्य संस्थापक स्वराज्य रक्षक छत्रपती शिवाजी महाराजांना भारतीय जैन संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमास संभाजी आरमारचे सर्वेसर्वा श्रीकांत डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे, जैन कासार समाजाचे सागरशेट्टी, आस्था रोटी बँकेचे विजयकुमार चंचुरे, संघटनेचे हद्दवाढ विभागाचे अशोक भालेराव जिल्हा सदस्य विक्रांत बशेट्टी अजिंक्य बालस्वरूप यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी श्रीकांत डांगे, श्याम पाटील व अभिनंदन विभूते यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहास जागविला.

Classifieds

**भाड्याने देणे**

युनिक हॉस्पिटलजवळ सलग २ गाळे ऑफिस, कुरिअर, डॉक्टर, वकील, थेरपीसेंटर, एजन्सी, गोडाऊन वगैरेसाठी भाड्याने देणे. विष्णू पंपटवार-९८८१२४३६९०

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# बौद्ध संस्कृतीचे आदर्श दर्शन घडविण्याचा संकल्प



### बौद्ध साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अण्णासाहेब भालशंकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भेटीने क्रांतीप्रवण झालेल्या सोलापूर नगरीमध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या बौद्ध साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अण्णासाहेब भालशंकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यावेळी कार्यकारणी तसेच इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली.

सोलापूर शहरात येत्या मे महिन्यात बौद्ध साहित्य संमेलन आयोजित येणार आहे. या संमेलनाची रूपरेषा ठरविण्यासाठी सोलापुरातील शिक्षक सोसायटीमधील वेळूवन बुद्ध विहारात दुसरी नियोजन बैठक निवृत्त कार्यकारी अभियंता प्रभाकर भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी विविध सूचना केल्या. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांनी संमेलनाची रूपरेषा स्पष्ट केली. या बैठकीत स्वागताध्यक्ष, कार्यकारणी सदस्य व इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. पुढील बैठकांमध्ये टप्प्याटप्प्याने इतर विषय समित्यांच्या निवडी करण्यात येणार आहेत.

याप्रसंगी सामाजिक न्याय विभागाचे निवृत्त सचिव रमेश उबाळे, अंगध मुके, अभियंता शेखर शिवशरण, प्रदीप ताकपेरे , डॉ. धम्मपाल माशाळकर, व्ही. डी. गायकवाड, अरुण गायकवाड, निवृत्त मुख्याध्यापिका आशा शिवशरण, निर्मला कांबळे , विनोद जाधव आदींसह मान्यवरांनी आपल्या सूचना मांडल्या. यावेळी नागसेन माने, संग्राम सोनकांबळे, आगतराव बनसोडे, दत्तात्रय शिंदे , रोहित गायकवाड, डी. वाय. पांडगळे , चंद्रकांत बनसोडे , मारुती बेलभंडारे , अशोक इंगळे, लक्ष्मण बनसोडे आदींसह साहित्यिक, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी , सामाजिक कार्यकर्ते तसेच धम्म चळवळीतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### आदर्शवत असे संमेलन करण्याचा प्रयत्न : भालशंकर

बौद्ध साहित्य हे प्राचीन, आदर्शवादी विचारांचे प्रेरणा स्तोत्र आहे. धम्माचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे. बौद्ध साहित्य जगण्याची ऊर्जा देते. यामुळे सोलापुरातील बौद्ध साहित्य संमेलन सर्वांच्या सहभागातून शिस्तबद्ध पद्धतीने यशस्वी करूया. आदर्शवत असे संमेलन पार पाडण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असा मानस नूतन स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी व्यक्त केला.

#### नूतन पदाधिकारी व कार्यकारणी अशी

स्वागताध्यक्ष - महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, कार्यवाह - मनपा कर्मचारी पतसंस्थेचे माजी चेअरमन भालचंद्र साखरे, प्रा. वशिष्ठ सोनकांबळे. कार्यकारणी सदस्य - प्रा. डॉ. संघप्रकाश दुड्डे , प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, कामगार नेते चांगदेव सोनवणे, चित्रकार विठ्ठल मोरे, व्ही. ए. गायकवाड, बी.डी. भोसले, सुमित्रा जाधव, धम्मरक्षिता कांबळे, शारदा गजभिये आदींची निवड करण्यात आली.

# महिलेचा गळा दाबुन खुन; तरुणाची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

रजनीकांत ऊर्फ राजु चंद्रकांत शंके वय ३५ वर्षे, रा. न्यु लक्ष्मी चाळ देगांव रोड सोलापूर या तरुणाची, एका महिलेचा गळा दाबुन खुन केल्याप्रकरणी येथील सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

यात हकीकत कि, यातील आरोपी रजनीकांत हा सदर महिलेच्या घरालगतच्या भागात राहण्यास होता, सदर महिलेवर तो एकतर्फी प्रेम करत होता, दि. ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी सदर महिला ही दवाखान्यात जाण्यासाठी बाहेर पडली असता सदर आरोपी रजनीकांत याने, तिला यश नगर भागात नेऊन, गळा दाबुन तिचा खुन केला अशा आशयाची फिर्याद मयताचे वडिलांनी फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती. त्यावर गुन्हा नोंद होऊन आरोपीस ०७ नोव्हेंबर रोजी अटक झाली होती. त्यामध्ये पोलीस निरिक्षक एस.डी. माने यांनी तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर खटल्याची सुनावणीत सरकार पक्षाने एकुण १४ साक्षीदार तपासले. त्यामध्ये मयताचे नातेवाईक, पंच, डॉक्टर, पोलीस अधिकारी, लॉज व्यवस्थापक इत्यादींच्या महत्वपुर्ण साक्षी झाल्या. त्यामध्ये सरकार पक्षाने युक्तीवाद केला कि प्रकरणात आरोपीने खुनाचा गुन्हा केल्याबद्दल भक्कम पुरावा आला असल्याने आरोपीला दोषी ठरविण्यात यावे अशी सरकार पक्षाने मागणी केली. याउलट आरोपीचे वकिल ॲड. शशी कुलकर्णी यांनी युक्तीवाद करताना कोर्टाचे निदर्शनास आणून दिले की, आरोपी व मयत यांच्यामध्ये कोणतेही भांडण, वितुष्ट नव्हते, त्यामुळे त्या महिलेस जिवे मारण्याचा आरोपीचा हेतू असु शकत नाही, प्रत्यक्ष घटना पाहणारा कोणीही साक्षीदार नाही, स्वतंत्र साक्षीदार कोणीही घटनेबाबत सांगत नाही, जे पुरावे उपलब्ध आहेत असे सरकार पक्षाचे म्हणणे आहे, ते पुरावे भक्कम व फक्त आरोपीनेच गुन्हा केल्याचा निष्कर्ष काढणे इतपत पुरेसा नाही, साक्षीदारांच्या साक्षीमध्ये प्रचंड विसंगती असून ती विसंगती आरोपाबद्दल संशय निर्माण करते, त्यामुळे आरोपीने गुन्हा केला असे म्हणता येत नाही, अशा प्रकारचा युक्तीवाद केला. तसेच सदरची केस परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारित असल्याने, सदर केसमध्ये ''शरद सारडा विरुध्द सरकार'' या सर्वोच्च न्यायालयाचे एका केसमधील उल्लेख केलेली पाच तत्वे (पंचशील) यामध्येही सदर खटला सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीत होऊ शकत नाही, त्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करावे असा युक्तीवाद केला. सदरचा युक्तीवाद विचारात घेऊन सत्र न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. स्वप्निल सरवदे, ॲड. पौर्णिमा शंके, ॲड. विनित गायकवाड, ॲड. प्रणव उपाध्ये, ॲड. आदित्य आदोने यांनी काम पाहिले तर सरकारतर्फे ॲड. प्रदिपसिंह रजपुत (जिल्हा सरकारी वकिल) यांनी काम पाहिले.

# न्यायालयीन प्रक्रियेस अडथळा; मोहोळ पोलिसांविरुद्ध कारवाईबद्दल न्यायालयात अर्ज

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

न्यायालयीन कामकाजासाठी न्यायालयात आलेल्या आरोपीला न्यायालयाच्या आवारातून न्यायाधीशांच्या परवानगीशिवाय अटक केल्याने न्यायालयीन प्रक्रियेस अडथळा आणल्याबद्दल मोहोळ पोलीस स्टेशनचे सब इन्स्पेक्टर अजय केसरकर, पोलीस ढवळे, पोलीस राठोड व सोलापूर न्यायालयातील मोहोळ पोलीस स्टेशनचे कोर्ट ऑर्डरली पवार यांचे विरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी, असा अर्ज आरोपीतर्फे न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

सरकार पक्षाने दिनांक १२ मार्च रोजी सदर अर्जावर म्हणणे सादर करण्याचे आदेश ॲडिशनल सेशन्स जज्ज श्री योगेश राणे यांनी दिले आहेत. मोहोळ तालुक्यातील पाटकुल येथील सुनील घोडके खून खटल्याची सुनावणी सत्र न्यायाधीश श्री योगेश राणे यांच्या न्यायालयात सुरू आहे. सदर खटल्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आले आहे. दि. १२.०२.२०२५ रोजी न्यायालयाने कलम ३१३ अन्वये आरोपींचा जबाब नोंदविण्यासाठी तारीख नेमलेली होती. सदर तारखेस जामिनावर असणारे आरोपी रोहन एडके व अक्षय एडके न्यायालयात हजर होते. न्यायालयाचे आवारात ते हजर असताना मोहोळ पोलीस स्टेशनच्या वरील पोलीस अधिकाऱ्यांनी या दोन्हीही आरोपींना न्यायालयाची परवानगी न घेता अटक केली. मोहोळ पोलीस स्टेशनच्या या पोलीस अधिकाऱ्यांच्या सदरच्या बेकायदेशीर कृत्यामुळे त्या दिवशी आरोपींचा न्यायालयात जबाब घेता आला नाही त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेस अडथळा निर्माण झाला. मोहोळ पोलीस स्टेशनच्या या पोलिस अधिकाऱ्यांच्या बेकायदेशीर कृत्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याचा अर्ज वरील दोन्ही आरोपींतर्फे न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

# कवी नायगावकरांच्या मिश्किली व गप्पात महिला दिन

**सोलापूर, दि. ९ मार्च-**



महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर च्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ हास्य कवी अशोक नायगावकर यांचा मिश्किली आणि गप्पा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यानगर येथे शनिवारी ८ मार्च रोजी हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ज्येष्ठ हास्य कवी अशोक नायगावकर यांनी महिलांवरील विविध कवितांचे सादरीकरण केले. स्वयंपाक घरातील गृहिणी ते विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असलेली महिला अशा सर्वच स्तरावर आधारित कवितांचे सादरीकरण करून नायगावकरांनी हास्याचे फवारे उडवले, त्याला उपस्थित महिलांनीही मोठी दाद दिली. प्रारंभी महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागावकर यांनी प्रास्ताविक केले. महिला दिन साजरा करताना महिलांसाठी कवितांचा कार्यक्रम करण्यामागचा हेतू आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या कार्याचा आढावा त्यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मसापच्या पृथा हलसगीकर यांनी केले, तर आभार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महिलांची मोठी गर्दी होती.



## जाहीर प्रकटन

क वर्गातील सहकारी संसथांच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम

क वर्गातील खालील संस्थांचा सन २०२५-२६ ते २०२३-३१ या कालावधीच्या संचालक मंडळ निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूकनिर्णय अधिकारी यांचे नाव |
|---|---|---|
| १ | उपविभागीय मृदुसंधारण सेवकांची सह. पतसंस्था, मर्या. अक्कलकोट | श्री.एस.व्ही. कुंभार |
| २ | अक्कलकोट महाविद्यालय सेवक सह. पतसंस्था, मर्या. अक्कलकोट | श्री.एस.व्ही. कुंभार |
| ३ | अक्कलकोट तालुका माध्य. शाळा सेवक सह. पतसंस्था, मर्या. अक्कलकोट | श्री.एस.व्ही. कुंभार |
| ४ | श्री. काशिविश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सह. पत. मर्या. जेऊर | श्री.के.बी.जमादार |
| ५ | हिंगुलांबिका ग्राहक सह. संस्था, मर्या. अक्कलकोट | श्री.के.बी.जमादार |
| ६ | अक्कलकोट ता. म्युन्सीपल एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. अक्कलकोट | श्री.के.बी. जमादार |
| ७ | मंगरुळे प्रशाला सेवकांची पतसंस्था मर्या. अक्कलकोट, | सो.सी.आर.नाटकर |
| ८ | अक्कलकोट तालुका सह. गटसचिवांची पतसंस्था, मर्या, अक्कलकोट | सो.सी. आर. नाटकर |
| ९ | महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्था कर्मचारी सह. पतसंस्था, मर्या. अक्कलकोट | सो.सी.आर. नाटकर |
| १० | जनवात्सल्य महिला ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. केगांव बु. | श्री.एस.एस. जुजगार |
| ११ | स्वामी विवेकानंद तालुका माध्य. व उच्च. माध्य सेवक सह. पतसंस्था, मर्या. अक्कलकोट | श्री.एस.एस. जुजगार |

### अनुसुची

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | | नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी तारीख, वेळ व स्थळ | प्राप्त नामनिर्देशन पत्र प्रसिध्द करण्याची तारीख व वेळ | नामनिर्देशन पत्राच्या छाननीची तारीख, वेळ व स्थळ | विधीग्राह्य नामनिर्देशनाची सुची प्रसिध्द करण्याची तारीख, वेळ व स्थळ | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची तारीख, वेळ व स्थळ | अंतिम विधीग्राह्य नामनिर्देशनाची यादी प्रसिध्दीची व उमेदवारांना निशाणी वाटपाची तारीख, वेळ व स्थळ | आवश्यक असेल तर मतदान ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणीची तारीख वेळ व स्थळ | मतदानाचा निकाल घोषित करण्याची तारीख, वेळ व स्थळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी | ४ | दि. १०/०३/२०२५ ते दि. १७/०३/२०२५ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत मा.स.नि. अक्कलकोट यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर | दि. १०/०३/२०२५ ते १७/०३/२०२५ अखेर जसजसे प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायं. ४.०० नंतर मा.स.नि. अक्कलकोट यांचे कार्यालयात | वरील सर्व संस्थांचे दि. १८/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते संपेपर्यंत मा.स.नि. अक्कलकोट यांचे कार्यालयात | दि. १९/०३/२०२५ सकाळी ११.३० वाजता मा.स.नि. अक्कलकोट यांचे कार्यालयात | दि. १९/०३/२०२५ ते दि.०२/०४/२०२५ ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत मा.स.नि. अक्कलकोट यांचे कार्यालयात | दि. ०३/०४/२०२५ स.१०.३० मा.स.नि. अक्कलकोट यांचे कार्यालयात | दि. १२/०४/२०२५ वेळ स. ८.०० ते सायं ४.०० वाजेपर्यंत ठिकाण : आवश्यक असल्यास प्रसिध्द करण्यात येईल. | दि. १२/०४/२०२५ रोजी मतदान संपल्यानंतर लगेच ठिकाण : आवश्यक असल्यास ठिकाण प्रसिध्द करण्यात येईल. | दि. १२/०४/२०२५ रोजी मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेच ठिकाण : आवश्यक असल्यास ठिकाण प्रसिध्द करण्यात येईल. |
| २ | महिला राखीव | २ | | | | | | | | | |
| ३ | अनुसुचित जाती/जमाती | १ | | | | | | | | | |
| ४ | इतर मागास प्रवर्ग | १ | | | | | | | | | |
| ५ | अ.जा./जमाती/ वि.जा./वि.मा.प्र. | १ | | | | | | | | | |
| ६ | एकूण | १३ | | | | | | | | | |

**टिप - सदर कार्यक्रम सुट्टीचे दिवस वगळून आहे.**

संस्थांचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम व मतदारयादी त्या त्या संस्थेच्या नोटीस बोर्डावर संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अक्कलकोट, ता. अक्कलकोट यांचे कार्यालय, स्वामी समर्थ सहकारी बँक, लि. अक्कलकोट (अवसायनात) ए-वन चौक, स्टेशन रोड, अक्कलकोट, जि. सोलापूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी संबंधीत संस्थांचे सभासदांनी सभासद यादी, सविस्तर निवडणूक कार्यक्रम व अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**स्थळ : अक्कलकोट**
**दिनांक : १०/०३/२०२५**

**सही/-**
**(राहुल ठोंबरे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,**
**तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था. अक्कलकोट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धेला प्रारंभ




गुलमर्ग : 'खेलो इंडिया हिवाळी क्रीडा २०२५ स्पर्धा' रविवारपासून येथे प्रारंभ झाल्या. गुलमर्गच्या बर्फाच्छादित प्रदेशात जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा (केआयडब्ल्यूजी) भारतातील राष्ट्रीय स्तरावरील बहुविद्याशाखीय तळागाळातील हिवाळी खेळ आहेत. स्पर्धेमध्ये स्कीइंग, अल्पाइन स्कीइंग, नॉर्डिक स्कीइंग, स्नो रग्बी, आइस स्टॉक स्पोर्ट, स्नो बेसबॉल, पर्वतारोहण, स्नोशू रनिंग, आइस हॉकी, फिगर स्केटिंग आणि स्पीड स्केटिंग आदी खेळांचा समावेश आहे. खेलो इंडिया युथ गेम्सच्या अनेक आवृत्त्यांच्या यशानंतर २०२० मध्ये पहिले खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. केआयडब्ल्यूजी-२०२५ स्पर्धांच्या पहिल्या टप्प्यात केंद्रशासित प्रदेश लडाखने चार सुवर्णांसह सात पदके जिंकून एकूण आघाडी घेतली. त्यानंतर तामिळनाडूने तीन सुवर्णांसह पाच पदके जिंकली, तर महाराष्ट्राने एकूण १० पदके जिंकली, परंतु केवळ दोन सुवर्णांसह तिसरे स्थान पटकावले.

### मलेशियन गोल्फपटू जेनिथ वोंग विजेती



**दा नांग** : मलेशियाच्या जेनिथ वोंगने महिला हौशी आशिया-पॅसिफिक गोल्फ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या स्पर्धेचे विजेतेपद पटकावणारी ती मलेशियाची पहिली गोल्फपटू ठरली. जेनिथ वोंग दहा वर्षांची असताना ऑस्ट्रेलियाला गेली होती आणि आता अमेरिकेतील पेपरडाइन विद्यापीठात कॉलेज गोल्फमध्ये खेळते. या विजेतेपदामुळे वोंग आता तीन महिला मेजर आणि इतर अनेक प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये खेळू शकते. व्हिएतनाममध्ये आयोजित या स्पर्धेत जेनिथने एकूण १८-अंडर मिळवले आणि कोरियाच्या सुमिन ओह (६६) हिच्यावर एका शॉटने विजय मिळवला. २०२२ मध्ये वोंग १८ व्या स्थानावर राहिली होती. या स्पर्धेत भारताच्या सानवी सोमू टायडने ३८ वे स्थान, १४ वर्षीय गुंतस कौर संधूने ४७ वे स्थान, तर मन्नत ब्रारने ४८ वे स्थान प्राप्त केले.

### पंजाब, मोहम्मेडन एससीचे दमदार शेवट करण्याचे लक्ष्य

**कोलकाता** : इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२५ हंगामात सोमवारी भारती क्रीडांगणावर पंजाब एफसी आणि मोहम्मेडन एससी आपला अखेरचा सामना खेळणार आहे. दोन्ही संघ या सामन्यासह दमदार शेवट करण्यास उत्सुक आहे. पंजाब एफसी आणि मोहम्मेडन एससी हे २०२३-२४ मध्ये प्रक्रिया सुरू झाल्यापासून आयएसएलमध्ये बढती मिळालेले दोन संघ असून २३ सामन्यांत त्यांचे अनुक्रमे २७ आणि १२ गुण आहेत. पॅनॅगियोटिस डिलम्पेरिस-प्रशिक्षित संघाने मोहिमेची चांगली सुरुवात केली आणि नंतर पराभव पत्करावा लागला.

# भारतच 'चॅम्पियन'

**न्यूझिलंडला ४ गडी राखून नमविले**

**कर्णधार रोहित शर्माची दमदार खेळी**






सोलापूर : भारताच्या विजयानंतर क्रिकेटप्रेमींनी फटाके वाजवून जल्लोष केला.

**दुबई, दि. ९ मार्च-**

रोहित शर्माने कर्णधाराला साजेशी खेळी करीत भारताला १२ वर्षानंतर चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवून दिले. अंतिम सामन्यात त्यांनी न्यूझीलंडचा चार गडी राखून पराभव केला. भारताचे हे तिसरे चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद आहे. त्याचबरोबर भारताने न्यूझीलंडचा २५ वर्षांपूर्वीचा बदला या विजयासह घेतला आहे. २००० साली न्यूझीलंडने भारताला नमवत चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती.

न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना किवी संघाचा रथ भारताने २५१ इतक्या धावांवर रोखला. विजयी २५२ धावांचे लक्ष्य भारताने ४९व्या षटकांत गाठले. भारतीय संघ विजयासाठी २५२ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला. रोहित शर्माने एकहाती तुफानी फटकेबाजी केली आणि भारताला सामना जिंकवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. श्रेयस अय्यरनेही ४८धावा केल्या खऱ्या, पण मोक्याच्या क्षणी तो बाद झाला. शुभमन गिल हा फक्त रोहित शर्माची फटकेबाजी पाहण्याचे काम करत होता. कारण रोहित शर्मा एकामागून एक फटके मारत होता. रोहितने आपले अर्धशतक झळकावले आणि तो शतकाच्या दिशेने कूच करायला लागला होता. रोहितला श्रेयस अय्यर चांगली साथ देत होता. पण यावेळी फिरकीपटूंनी या दोघांवर दडपण आणले आणि रोहित शर्मा मोठा फटका मारण्याच्या नादात बाद झाला. रोहितने सात चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ७६ धावांची दमदार खेळी साकारली. रोहित बाद झाल्यावर श्रेयस अय्यरने संघाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आणि तो संघाची धावगती वाढवण्याचा प्रयत्न करत होता. पण या नादात त्याने मोक्याच्या क्षणी आपली विकेट बहाल केली. श्रेयसने ४८ धावा केल्या. श्रेयस बाद झाल्यावर अक्षर पटेल सेट झाला होता. पण त्यानेही मोठा फटका मारत आपली विकेट सोडली, त्याने २९ धावांची भर टाकली. पण त्यानंतर लोकेश राहुल आणि हार्दिक पंड्या यांनी संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

न्यूझीलंडने या सामन्यात चांगली सुरुवात केली होती. पण कुलदीप यादवने राचिन रवींद्र आणि केन विल्यम्सन यांना बाद केले. त्यामुळे भारताला न्यूझीलंडच्या धावांवर अंकुश ठेवता आले. पण डॅरिल मिचेल आणि ब्रेसवेल यांनी अर्धशतक झळकावल्यामुळे न्यूझीलंडला २५१ धावा करता आल्या. भारतीय फिरकीपटूंनी न्यूझीलंडविरुद्ध उत्कृष्ट गोलंदाजी करीत २५१ धावांपर्यंत रोखले. न्यूझीलंडकडून सलामीला आलेले विल यंग आणि रचिन रवींद्र हे दोघेही चांगली फलंदाजी करत होते. रचिन ५० च्या दिशेने पुढे जात होता पण कुलदीपने (२-४०) त्याला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. रचिन फक्त २९ धावा करून बाद झाला. रचिनला सामन्यात दोनदा जीवनदान मिळाले. २३ चेंडूत १५ धावा काढून वरुण चक्रवर्तीच्या (२-४५) गोलंदाजीवर विल यंगला एलबीडब्ल्यू करण्यात आले. न्यूझीलंडला केन विल्यमसनकडून आशा होत्या पण तो ११ धावा करून बाद झाला.

# सलग १२ वेळा नाणेफेक गमावून रोहितची लाराच्या विक्रमाशी बरोबरी




नाणेफेक करताना रोहितक शर्मा व मिचेल सॅण्टनर

**दुबई, ९ मार्च**

रविवारी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्धच्या चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलग १२ वेळा नाणेफेक गमावण्याच्या नकोशा विक्रमाची बरोबरी केली.

सलग १२ व्यांदा नाणेफेकीचा पराभव करून रोहितने वेस्ट इंडीजचा दिग्गज फलंदाज ब्रायन लाराची बरोबरी केली. लाराने ऑक्टोबर १९९८ ते मे १९९९ दरम्यान असाच क्रम अनुभवला होता. नेदरलॅण्डचा पीटर बोरेन हे या यादीत आणखी एक नाव आहे. पीटरने मार्च २०११ ते ऑगस्ट २०१३ दरम्यान ११ नाणेफेक गमावले.

एकंदरीत भारतासाठी हा सलग १५ वा नाणेफेकीचा पराभव होता. रोहितचा नाणेफेकीतील पराभवाची परंपरा २०२३ च्या अहमदाबाद येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय विश्वचषक अंतिम सामन्यात सुरू झाली, यात भारताने सहा गड्यांनी सामना गमावला.

सामन्यात उतरताना न्यूझीलंड २०२५ चॅम्पियन्स चषकाचा अंतिम सामना आपल्या वेगवान गोलंदाज मॅट हेनरीशिवाय खेळेल. त्याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

मॅट हेनरी हा चालू स्पर्धेतील आघाडीचा बळी टिपणारा गोलंदाज आहे. त्याने १० बळी घेतले आहेत, ज्यामध्ये दुबईतील गट अ सामन्यात भारताविरुद्ध ४२ धावांत ५ बळींचा समावेश आहे. परंतु न्यूझीलंडमध्ये हेनरिक क्लासेनचा झेल घेताना त्याच्या उजव्या खांद्याला दुखापत झाली. लाहोरमध्ये दक्षिण आफ्रिकेवर न्यूझीलंडने ५० धावांनी विजय नोंदवला.

त्यानंतर जेतेपदाच्या लढतीपूर्वी हेनरी तंदुरुस्ती चाचणीत अपयशी ठरला. त्यामुळे आता न्यूझीलंडने उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज नॅथन स्मिथला संघात आणले आहे.

भारत तिसरे चॅम्पियन्स चषक विजेतेपदाचा पाठलाग करत आहे, तर न्यूझीलंड २००० मध्ये शेवटचे जिंकल्यानंतर दुसऱ्यांदा रौप्यपदकाच्या शोधात आहे. आतापर्यंत, भारत सध्या या स्पर्धेत अपराजित आहे, तर न्यूझीलंडचा स्पर्धेत एकमेव पराभव २ मार्च रोजी दुबईमध्ये भारताविरुद्ध झाला. (वृत्तसंस्था)


# ओटिस गिब्सन केकेआरच्या सहायक प्रशिक्षकपदी

**कोलकाता, ९ मार्च**

गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सने २०२५ च्या इंडियन प्रीमियर लीग हंगामापूर्वी वेस्ट इंडीजचा माजी वेगवान गोलंदाज ओटिस गिब्सन सहायक प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे.

बार्बाडोसचा माजी वेगवान गोलंदाज ओटिस गिब्सनने ६५० हून अधिक प्रथम श्रेणी बळी टिपले आहेत. ओटिसने १९९५ ते १९९९ पर्यंत कसोटी आणि एकदिवसीय दोन्ही सामन्यांमध्ये वेस्ट इंडीजचे प्रतिनिधित्व केले आणि नंतर प्रशिक्षक म्हणून आपला प्रवास सुरू केला. त्यांच्याकडे व्यापक अनुभव आहे. त्यांनी २००७ ते २०१० व पुन्हा २०१५-१७ पर्यंत इंग्लंड क्रिकेट संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून दोनदा काम केले आहे.


त्यांनी २०१०-१४ पर्यंत वेस्ट इंडीजचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. त्यांच्या कार्यकाळात संघाने २०१२ मध्ये श्रीलंकेत पहिले आयसीसी विश्वचषक टी-२० जेतेपद जिंकले. २०१७-१९ पर्यंत ते दक्षिण आफ्रिकेच्या संघाचे मुख्य प्रशिक्षक झाले आणि त्यानंतर त्यांनी टी-२० फ्रॅन्चायझी सर्किटमध्ये अनेक प्रशिक्षकपदे भूषवली आहेत.



२०२५ च्या हंगामापूर्वी केकेआरने आपल्या संघात आणि प्रशिक्षक चमूमध्ये अनेक बदल केले आहेत. गत वर्षीचा विजेता कर्णधार श्रेयस अय्यर याला मेगा लिलावापूर्वी मुक्त करण्यात आले आणि नंतर पंजाब किंग्जने त्याला ताब्यात घेतले, जिथे त्याला कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याच्या अनुपस्थितीत केकेआरने अजिंक्य रहाणेला कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे, तर व्यंकटेश अय्यर उपकर्णधार म्हणून काम पाहत आहेत.

प्रशिक्षण चमूमध्ये गौतम गंभीर आयपीएल २०२४ नंतर भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी निघून गेल्यामुळे ड्वेन ब्राव्होची संघाच्या मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली. तथापि, उर्वरित प्रक्षिण चमूमध्ये बदल झाला नाही. भरत अरुण, कार्ल क्रो, नाथन लीमन आणि इतरांसह चंद्रकांत पंडित मुख्य प्रशिक्षक म्हणून कायम आहेत.

केकेआर आपल्या आयपीएल २०२५ मोहिमेची सुरुवात २२ मार्च रोजी ईडन गार्डन्सवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्ध करणार आहे. (वृत्तसंस्था)



रविवारी नोएडामध्ये आयोजित कुस्ती स्पर्धेतील एका लढतीत आपले कौशल्य पणाला लावताना दोन कुस्तीगीर

### दुखापतीमुळे मॅट हेनरी अंतिम सामन्यातून बाहेर

**दुबई ९ मार्च**

रविवारी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारत विरुद्ध आयसीसी चॅम्पियन्स चचषकाच्या अंतिम सामन्यापूर्वी न्यूझीलंडला मोठा धक्का बसला.न्यूझीलंड संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज मॅट हेनरीला बुधवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या उपांत्य सामन्यात झेल घेताना दुखापत झाली. त्याच्या खांद्याला दुखापती झाल्यामुळे तो अंतिम सामन्यातून बाहेर झाला. त्याच्या जागी नॅथन स्मिथने अंतिम एकादशमध्ये स्थान मिळविले. उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज मॅटहेन्री सध्या स्पर्धेत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे, त्याने चार सामन्यांमध्ये १६.७० च्या सरासरीने १० बळी घेतले आहेत. (वृत्तसंस्था)

# रिअल काश्मीरचा ऐझॉलवर २-१ ने विजय



विजयाचा आनंद साजरा करताना रिअल काश्मीरचे खेळाडू

**श्रीनगर, ९ मार्च**

रविवारी श्रीनगरमधील टीआरसी टर्फ मैदानावर रेलीगेशनशी झुंजणाऱ्या ऐझॉल एफसीवर २-१ असा संघर्षपूर्ण विजय मिळवून रिअल काश्मीर एफसीने इंडिया लीग (आय-लीग) २०२४-२५ स्पर्धेत विजेतेपदाच्या शर्यतीत आपले आव्हान कायम राखले आहे.

रिअल काश्मीरचा सलग पाचवा व गत पाच सामन्यांमधील चौथ्या विजयामुळे १८ सामन्यांमध्ये त्यांचे गुण ३२ झाले असून ते चर्चिल ब्रदर्स आणि इंटर काशी या दोघांपेक्षा दोन गुणांनी मागे आहेत. केवळ चार सामने शिल्लक असताना जेतेपदाची शर्यत अंतिम टप्प्यात पोहोचणार आहे. दुसरीकडे, ऐझॉलने रेलीगेशन झोनमधून बाहेर पडण्याची संधी गमावली. ऐझॉल १६ गुणांसह ११ व्या स्थानावर राहिले व ते एससी बंगळुरूपेक्षा एका गुणाने मागे आहे.

सेनेगलच्या करीम सांबने रिअल काश्मीरला आघाडी मिळवून दिली व लालरिन्झुआलाने हंगामातील नवव्या गोलसह ऐझॉलला बरोबरीत आणले. बदली खेळाडू म्हणून खेळणाऱ्या ब्राझिलियन पाउलो सेझरने यजमान संघासाठी विजयी गोल केला. सुरुवातीच्या काळात दोन्ही गोलरक्षकांनी आपली जबाबदारी चोखपणे बबजावत काही नियमित बचाव केला. हळूहळू, रिअल काश्मीरने आपला ताबा मिळवला आणि सामन्यात वर्चस्व गाजवले. पाउलो सेझारने ७७ व्या मिनिटाला गोल केला व त्याचा हाच गोल रिअल काश्मीरसाठी विजयी गोल ठरला. (वृत्तसंस्था)

# पाच किलोमीटर धावण्यात सोलापूरची श्रद्धा गुंटूक दुसरी

**स्पोर्ट्स अथोरिटी ऑफ तेलंगणाच्या राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरी**




**सोलापूर, दि. ९ मार्च-**

स्पोर्ट्स अथोरिटी ऑफ तेलंगणाच्या पाच किलोमीटर धावण्याच्या शर्यतीत येथील स्वामी विवेकानंद प्रशालेची श्रद्धा गुंटूक ही दुसरी आली.

हैदराबाद डिस्ट्रिक्ट ॲथलेटिक्स असोसिएशन व उस्मानिया युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन केले होते.ही स्पर्धा अवेअरनेस ऑन स्पोर्ट्स वर आधारित या इंटरनॅशनल स्पर्धेत येथील धावपटू श्रद्धाने खुल्या गटात ही कामगिरी केली. या स्पर्धेत १५०० स्पर्धक सहभागी झाले होते.

ही स्पर्धा हैदराबाद येथील उस्मानिया युनिव्हर्सिटी येथील सिंथेटीक ट्रॅकवर झाली. नॅशनल आर. ॲथलेटिक्स फौंडेशन हैदराबादच्या वतीने श्रद्धाला मेडल, ट्रॉफी व रोख रक्कम रुपये २१हजार देऊन गौरविण्यात आले. श्रद्धा हीस सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह व स्वामी विवेकानंद प्रशालेचे क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी व प्रशालेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# मुंबई इंडियन्ससमोर गुजरात जायण्ट्सचे आव्हान

**मुंबई, ९ मार्च**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आता अंतितम टप्प्यावर आली असून सोमवारी मुंबईत ब्रेबॉर्न स्टेडियमवर मुंबई इंडियन्स व गुजरात जायण्ट्स यांच्यादरम्यान सामना होणार आहे. साखळी फेरीत दोन सामने शिल्लक असताना मुंबई इंडियन्स संधीचा पुरेपूर फायदा उठवून गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे.



**महिला प्रीमियर लीग**



युपी वॉरियर्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर १२ धावांनी विजय मिळवून गतविजेत्या संघाला शनिवारी प्ले-ऑफच्या शर्यतीतून बाहेर काढले. त्यामुळे दिल्ली कॅपिटल्स, मुंबई इंडियन्स आणि गुजरात जायण्ट्सची प्ले-ऑफ फेरीसाठी पात्रता निश्चित झाली. पण गुणतालिकेतेचे अंतिम वर्गीकरण शिल्लक आहे. हरमनप्रीत कौरची मुंबई इंडियन्स तिसऱ्या डब्ल्यूपीएलच्या शेवटच्या टप्प्यासाठी मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर परतणार आहे. या स्टेडियमवर त्यांनी २०२३ मध्ये पहिले संस्करण जिंकले होते व आता ते अव्वल स्थानावर पोहोचण्याचा प्रयत्न करेल.

साखळी फेरीच्या शेवटी गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या संघाला थेट अंतिम फेरीत प्रवेश मिळेल आणि सोमवार आणि मंगळवारी सलग दोन सामने खेळणाऱ्या मुंबई इंडियन्स संघाचे लक्ष्य दिल्ली कॅपिटल्सला मागे टाकण्याचे असेल. दिल्ली सध्या १० गुणांसह आणि ०.३९६ च्या नेट रन रेटसह पहिल्या स्थानावर आहे.

मुंबई इंडियन्सने गुणतालिकेत अव्वल स्थान मिळविल्यास त्यांना एलिमिनेटर टाळण्यास मदत होईल. मुंबई सध्या ८ गुणांसह आणि ०.२६७ च्या नेट रन रेटसह तिसऱ्या स्थानावर आहे. जर त्यांनी गुजरात जायण्ट्स व आरसीबी विरुद्ध हे दोन्ही सामने जिंकले तर ते जास्तीत जास्त १२ गुणांसह अव्वल स्थानावर राहू शकतात.सध्या ८ गुणांसह आणि ०.३३४ च्या नेट रन रेटसह दुसऱ्या स्थानावर असलेल्या गुजरात जायण्ट्सने मुंबई इंडियन्सचा पराभव केल्यास १० गुणांसह सर्वोत्तम स्थान मिळू शकते व त्यामुळे ते दिल्ली कॅपिटल्सच्या बरोबरीने राहतील. अशा परिस्थितीत सरस धावगतीच्या आधारावर संघांना गुणतालिकेत कसे स्थान मिळेल हे ठरवेल.

दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या संघांची गुरुवारी एलिमिनेटरमध्ये गाठ पडेल व शनिवारी अंतिम सामना खेळला जाणार आहे.

परंतु मुंबई इंडियन्ससाठी सुरुवात करणे सोपे काम असणार नाही, कारण गुजरात जायण्ट्सने सलग तीन जोरदार विजय मिळवून अंतिम तीन संघात स्थान मिळवले आहे.

गुजरात जायण्ट्स सध्या एक मजबूत संघ झाला आहे. त्यांचे फलंदाज केवळ एकजुटीने खेळत नाही, तर गोलंदाजांनाही सूर गवसला आहे.

डब्ल्यूपीएल प्ले-ऑफमध्ये पहिल्यांदाच खेळणार असल्यामुळे गुजरात संघाला नक्कीच प्रेरणा मिळेल. गुजरातने सुरुवातीला निराशाजनक कामगिरी केल्यानंतर परिस्थिती बदलली .

दुसरीकडे मुंबई इंडियन्सने आतापर्यंत सहा सामन्यांमध्ये चार विजय आणि दोन पराभव मिळवले आहेत व त्यामुळे त्यांना तिसऱ्या डब्ल्यूपीएल प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्यास मदत झाली आहे.

परदेशी स्टार खेळाडू नॅट स्कीव्हर-ब्रण्ट (३०९ धावा व ८बळी), हेली मॅथ्यूज (१८१ धावा व ९ बळी) आणि ॲमेलिया केर (१० बळी) आघाडीवर आहेत आणि कर्णधार हरमनप्रीत (126 धावा) त्यांच्यासोबत आहे.

गुजरात जायण्ट्ससाठी कर्णधार ॲशले गार्डनर (२३५ धावा, ७ बळी), बेथ मूनी (२२४ धावा) आणि हर्लिन देओल (२०० धावा) या फलंदाजीतील तिघींना त्यांच्या गोलंदाजांकडून भक्कम पाठिंबा मिळाला आहे.

वेस्ट इंडीजची अष्टपैलू डियाण्ड्रा डॉटिन (१३२ धावा, ९बळी) खरोखरच चुकीची ठरली नाही, परंतु या हंगामात भारताची नवोदित खेळाडू काश्वी गौतम (९ बळी) व तनुजा कंवरनेही (७ बळी) चमकदार कामगिरी केली आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सांगोला कडकडीत बंद

## सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध

### सकल मराठा समाजाने दिली होती बंदची हाक




**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ९ मार्च-**

बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. तरी या प्रकरणातील सर्व आरोपींना भर चौकामध्ये फाशीची शिक्षा झाली पाहिजे या मागणीसाठी रविवार दि.९ मार्च रोजी सकल मराठा समाज सांगोला शहर व तालुका यांच्यावतीने सांगोला शहर व तालुका बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला सांगोला शहरासह तालुक्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला.

यावेळी महात्मा फुले चौक ते तहसील कार्यालय सांगोला अशी पदयात्रा मुक मोर्चा काढण्यात आला व सांगोला तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये कै.संतोष अण्णा देशमुख यांच्या मारेकऱ्यांना भर चौकात फाशीचे शिक्षा व्हावी, कै. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्युची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, मस्साजोग येथील खंडणी प्रकरणातील मुख्य सूत्रधारावर कठोरात कठोर कार्यवाही व्हावी, महिलावर वारंवार होणाऱ्या अत्याचाराला न्याय देण्यासाठी तात्काळ वेगळी व्यवस्था करून तात्काळ कारवाई व्हावी, वारंवार महापुरुषांचे अवमान करून समाजात तेड निर्माण करणाऱ्या समाज कंठकावर राष्ट्रद्रोहाचा खटला दाखल करावा, सांगोला पोलिसांनी एसटी स्टँड, शाळा, कॉलेज व रेल्वे स्टेशन आणि सर्व धार्मिक स्थळावर योग्य ती गस्त ठेवून चुकीच काही आढळल्यास त्वरित कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली.



## ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे स्त्री जन्माचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.९ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे स्त्री जन्माचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. प्रसुती झालेल्या मातांचा वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त आपल्या गृह कर्तव्यांबरोबरच आपल्या कामाशी एकनिष्ठ राहून जोखमीचे काम चोखपणे पार पाडणाऱ्या महिला वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, कक्षसेविका, महिला सफाई कर्मचारी आदी महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. रेवता स्वामी, डॉ. योगिता जाधव, डॉ. प्रियांका, अधिपरिचारिका सुवर्णा सरताळे, वैशाली शिंदे, तेजश्री मेटकरी, सोनाली शंकर, स्वाती शिंदे, सारिका कोळेकर, पूजा वागदरकर, फोले ,प्रियंका डोरले, शाहीन तांबोळी, पवार उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त




### विजयालक्ष्मी सखी प्रोड्यूसर कंपनीतर्फे महिला दिन साजरा

**अणदूर, दि. ९ मार्च-**

स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेच्या अंतर्गत आणि एसबीआय फाउंडेशन सपोर्टच्या माध्यमातून विजयालक्ष्मी सखी प्रोड्युसर कंपनीच्या सभासदांचा जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हंगरगा तुळ येथे झालेल्या या कार्यक्रमात तुळजापूर तालुक्यातील १७ गावातून ६० महिला व गावातील महिला उपस्थित होत्या,या कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला तसेच महिलांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात अर्चना देशमुख, कल्पना कदम, रोहिणी ताई, अर्चना कोळी, सुकेशनी धनके, सुवर्णा नन्नवरे, शशिकला देडे आणि शैलजा भोसले यांनी महिला सक्षमीकरण आणि स्वावलंबनाचे महत्त्व स्पष्ट केले. महिलांसाठी संगीत खुर्ची, तळ्यात-मळ्यात आणि उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमधील विजेत्यांना शेतीसाठी उपयुक्त सोलर ट्रॅप आणि स्टीकी ट्रॅप बक्षीस म्हणून प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास विजयालक्ष्मी सखी प्रोड्युसर कंपनीच्या डायरेक्टर गोदावरी क्षीरसागर, कल्पना कदम, सुरेखा कानडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुरेखा कानडे, अर्चना कोळी, सुकेशने धनके, कल्पना कदम ,सुवर्ण नन्नवरे, शशिकला देडे, शैलजा भोसले आदी महिलांनी परिश्रम घेतले.



### बाळासाहेब सरक जिल्हास्तरीय आदर्श क्रीडा पुरस्काराने सन्मानित

**करमाळा दि.९ मार्च -**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षक आणि सेवक सहकरी पतसंस्था यांचे वतीने देण्यात येणारा जिल्हास्तरीय आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार भारत हायस्कूल जेऊर ता . करमाळा येथील बाळासाहेब सरक यांना आज सोलापूर येथील हुतात्मा स्मृति मंदिर येथे पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पतसंस्था चेअरमन राजेंद्र माळी व्हॉईस चेअरमन विद्या पाटील संचालक नवनाथ मोहोळकर आदी मान्यवर उपस्थित होते. बाळासाहेब सरक सर यांना पुरस्कार मिळालेबद्दल बद्दल त्यांचे संस्था अध्यक्ष आमदार नारायण आबा पाटील उपाध्यक्ष राजूशेठ गादिया सरपंच पृथ्वीराज पाटील सचिव अर्जुन सरक सर सर्व संचालक मंडळ भारत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अनंत शिंगाडे हायस्कूल चे प्राचार्य आबासाहेब सरोदे उपप्राचार्य नागेश कांबळे पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे सर भारत प्रायमरी स्कूल चे मुख्याध्यापक दीपक व्यवहारे सर संकुलातील शिक्षक शिक्षेकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.




### कल्याणी लकशेट्टी यांना आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार

**अक्कलकोट, दि. ९ मार्च-**

अक्कलकोट येथील क्रीडा शिक्षक कल्याणी लकशेट्टी यांना चिपळूण येथे राज्यस्तरीय कोकण गौरव आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार कोकण कृषी विद्यापीठ कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून कोकण विद्यापीठ उप कुलगुरू प्रदीप हळदणकर, महाराष्ट्र राज्य कृषी पदवीधर संघाचे अध्यक्ष शशिकांत शेळके, चिपळूणचे उद्योजक डॉ. विजय माटे, डॉ विलास मोरे, सुशील शिंदे, पत्रकार सतीश लोस्टे चिपळूण यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरव आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. अक्कलकोट येथील श्री शारदा माता इंग्लिश मीडियम स्कूल येथील क्रीडा व संस्कृत शिक्षक कल्याणी लकशेट्टी हे गेली ३२ वर्षे शिक्षक म्हणून कार्यरत आहे.

### स्वामी समर्थ आयटीआयच्या व्यवस्थापन समितीवर शिवशंकर स्वामी

**अक्कलकोट, दि. ९ मार्च-**



श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे व्यवस्थापन समितीवर भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस शिवशंकर स्वामी यांची शासकीय सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. श्री स्वामी समर्थ, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट या महाविद्यालयात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या एसटी पास, ज्या त्या महाविद्यालयाकडून जाचक अटी बाबत निवारण, विद्यार्थ्यांचे ॲडमिशन, विद्यार्थ्याकरिता महाविद्यालयातील सोयी सविधा बाबत आवाज उठविणे, समस्या सोडविने, आता शासनाच्या माध्यमातून संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर काम करण्याची संधी मिळाली याचे सर्व विद्यार्थी आणि संस्थेची काही समस्या व विकासाच्या दृष्टीने कार्य करणार असल्याचे शिवशंकर स्वामी सांगितले. त्यांच्या या निवडीबद्दल आ. सचिन कल्याणशेट्टी, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरपालिका पक्षनेते महेश हिंडोळे, भाजपा शहराध्यक्ष शिवशरण जोजन, बालाजी पाटील, अल्पसंख्याक अध्यक्ष नन्नू कोरबू आदींनी शुभेच्छा दिल्या.

### विरभद्रप्पा तोडकरी यांचे निधन



**सोलापूर, दि. ९ मार्च-**

जोडभावी पेठ चाटला चौक येथील रहिवासी विरभद्रप्पा विठ्ठलराव तोडकरी (वय ९०) यांचे ८ मार्च रोजी पहाटे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रुपभवानी येथील रुद्रभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी असा परिवार आहे. संजय ऍडचे संजय तोडकरी यांचे वडील होते



## समर्थांची कृपासावली हे जीवनातील सर्वात मोठे भाग्य

### छावा फेम अभिनेते (रायाजी) संतोष जुवेकर यांचे मत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ मार्च-**

ब्रम्हांडनायक दत्त अवतारी श्री स्वामी समर्थांची कृपासावली हेच आमच्या कुटुंबीयांच्या जीवनाचे सर्वात मोठे भाग्य असल्याचे मनोगत सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या छावा सिनेमात रायाजीची भुमिका साकारलेले मराठमोळे अभिनेते संतोष जुवेकर यांनी व्यक्त केले. त्यांनी येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री.स्वामी समर्थाचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी अभिनेते जुवेकर व त्यांच्या समवेत असलेले माजी जिल्हाधिकारी किशोरराजे निंबाळकर, इंडीयन मॉडेल स्कूलचे प्रमुख सायली जोशी यांचा श्री. स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी छावा फेम अभिनेते (रायाजी) संतोष जुवेकर बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी माझ्या तमाम हिंदू बांधव भगिनीनी छावा सिनेमास भरघोस प्रतिसाद देत असल्याचे पाहून माझ्या मानसिकतेप्रमाणेच हिंदू बांधवांची हिंदू धर्माबद्दल सार्थ अभिमान जागृत होत असल्याची मानसिकता पाहून मन गहिवरले आहे. छावा चित्रपटाच्या शुटींग दरम्यान मी चित्रपटातील कोणत्याही कलाकारांशी जास्त बोललो नसल्याचे स्पष्टीकरण केले. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभुमीवर आता उर्वरीत जीवनात हिंदू धर्मातील सर्व मंदीरांना दर्शनप्रित्यर्थ भेट देण्यास आपण सरसावलो आहोत.

या अनुषंगाने आज येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेतले असल्याचे सांगून श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरकृत महेश इंगळे यांच्या स्वामी भक्ती प्रचार-प्रसार कार्य वाढीस प्रोत्सहान देण्यासाठी आपण कटीबध्द असल्याचे मनोगतही व्यक्त केले. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, दयानंद दणूरे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, स्वामीनाथ लोणारी, प्रसाद पाटील, शिवशरण अचलेर व अन्य उपस्थित होते.

## कवी अशोक नायगावकरांच्या मिश्किली आणि गप्पात महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.९ मार्च -**




महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर च्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ हास्य कवी अशोक नायगावकर यांचा मिश्किली आणि गप्पा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यानगर येथे शनिवारी ८ मार्च रोजी हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ज्येष्ठ हास्य कवी अशोक नायगावकर यांनी महिलांवरील विविध कवितांचे सादरीकरण केले. स्वयंपाक घरातील गृहिणी ते विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असलेली महिला अशा सर्वच स्तरावर आधारित कवितांचे सादरीकरण करून नायगावकरांनी हास्याचे फवारे उडवले, त्याला उपस्थित महिलांनीही मोठी दाद दिली. प्रारंभी महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागावकर यांनी प्रास्ताविक केले. महिला दिन साजरा करताना महिलांसाठी कवितांचा कार्यक्रम करण्यामागचा हेतू आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या कार्याचा आढावा त्यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मसापच्या पृथा हलसगीकर यांनी केले, तर आभार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महिलांची मोठी गर्दी होती. दरम्यान अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या उपनगरीय शाखेचे तिसऱ्यांदा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विजय साळुंखे यांचा कवी अशोक नायगावकरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मसापचे कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, जितेश कुलकर्णी, अमोल धाबळे, विनायक होटकर, वर्षा कत्ते, नसीमा पठाण, आण्णासाहेब कोतली, मोहन सोनी, पद्माकर कुलकर्णी, गिरीश दुनाखे,मारुती कटकधोंड, रसिका बडवे विशाखा कुमठेकर, उर्मिला जोशी,कृपाताई देशमुख, वंदना ताटे,विजय शिंदे,अनुजा पत्की,मृणाल पत्की,आशा जाधव,नीता जेऊरकर,दीपक जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

## टायगर ग्रुपच्यावतीने नारी सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ मार्च -**



जागतिक महिला दिनानिमित्त टायगर ग्रुपतर्फे शक्तीदेवी सभागृहात नारी सन्मान सोहळ्यासह विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मोफत व्यायाम शिबिर घेण्यात आले. वेलनेस कोच वैशाली टोणपे यांनी मार्गदर्शन केले. महिलांचे स्वागत हळदी कुंकू व फेटा बांधून करण्यात आले. यास्मिन शेख (मेकअप आर्टिस्ट) व वैशाली टोणपे यांचा सत्कार अंजली शिरसाट ,विजयालक्ष्मी गवंडी यांनी केला. होम मिनिस्टर खेळ घेण्यात आला. विजेत्या महिलांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी महिला वर्गाने स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल कार्यक्रमाचे आयोजक अंजली अमर शिरसाट व टायगर ग्रुप अक्कलकोट यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. नंदिनी बहीरेवार यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. सुजाता बिराजदार,सौ.जगदेवी भैरेवार,पुजा जेटगे,सुमन शिंदे आदिंनी परिश्रम घेतले

## शिवभक्त प्रतिष्ठानला राज्यस्तरीय तोरणा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मार्च-**



शिवशंभो सामाजिक संघटनेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय तोरणा पुरस्कार यंदा श्री क्षेत्र पंढरपूरातील शिवभक्त प्रतिष्ठानला दिला गेला. हा पुरस्कार शिवभक्त प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीराम गणपुले यांनी स्विकारला.

७ मार्च म्हणजे पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा पहिला प्रचंडगड ताब्यात घेवून स्वराज्याचे पहिले तोरण बांधले व प्रचंडगडाचे नामकरण किल्ले तोरणा गड असे केले व स्वराज्यांचे पहिले तोरण बांधले. या ऐतिहासिक क्षणाचे महत्व सर्वांना समजावे व याच्या स्मृतीचे जतन व्हावे यासाठी हा तोरणा पुरस्कार या नावाने दिला जातो.

या पुरस्कार वितरण समारंभात येसाजी कंक व तानाजी मालुसरे यांचे वंशज यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. आदर्श शिवगौरव पुरस्काराने संबोधित केले.

शिवभक्त प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमामध्ये श्री क्षेत्र किल्ले रायगडावर शिवसमाधी अभिवादन कार्यक्रमात मोलाचा सहभाग असतो, या शिव गौरव कार्याची दखल म्हणून या पुरस्कारासाठी पाचारण करण्यात आले.

शिवपुण्यतिथी श्री क्षेत्र किल्ले रायगडावरती हनुमान जयंती दिवशी ४०० शिवभक्तांसह पंढरपूर ते रायगड अशी वारी निघते, पंढरीतील शिवभक्त शिवसमाधीला नतमस्तक होतात. या शिवगौरव कार्याबद्दल २०१७-२०१८ चा रायगड भुषण पुरस्कार सुध्दा शिवभक्त प्रतिष्ठानला प्राप्त झाला आहे.

दरम्यान हा पुरस्कार शिवभक्त प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीराम गणपुले यांनी स्विकारला. त्याच्या समवेत वैजिनाथ जाधव, नाना निकम, जालिंदर सगर, अंबादास डांगे उपस्थित होते.

## पत्रकारांनी समाजाला जागृत ठेवण्याचे काम करावे

### काशी जगद्गुरु : दक्षिण सोलापूर पत्रकार संघटनेचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ९ मार्च -**

कोणतेही काम भगवंताचे कार्य समजून केलात तर समाज त्याची तुम्हाला फळे देण्यासाठी पुढे येईल. पत्रकार हे समाजाला दिशा देण्याचे काम करतात. तेव्हा पत्रकारांनी समाजाला जागृत ठेवण्याचे काम करावे, असे आवाहन काशी पिठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांनी केले.

मंद्रुप येथे शुक्रवारी दक्षिण सोलापूर तालुका पत्रकार संघटनेचा आदर्श सन्मान पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते पुरस्कार देण्यात आले. या कार्यक्रमास माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, आप्पाराव कोरे, डॉ. चनगोंडा हविनाळे, अशोक देवकते, पिराप्पा म्हेत्रे, वसंत पाटील, बसवेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरपंच अनिता कोरे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे, सुभाष पाटील, संगमेश बगले, चंद्रकांत खुपसंगे, आप्पासाहेब काळे उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश वाघमोडे व अशोक कस्तुरे यांनी केले. तर पत्रकार अमोगसिध्द लांडगे यांनी आभार मानले. यावेळी पत्रकार पत्रकार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### यांचा झाला सन्मान

तहसीलदार किरण जमदाडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक राठोड, समाजसेवक महादेव कोगनुरे, धनेश आचलरे, जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार विजय देशपांडे, विजय साळवे, अजित उंब्रजकर, अनिल कदम आदर्श शिक्षक : निलेश नंदरगी, प्रतिभा दुधगी, फरजाना सय्यद, जनाबाई पवार, आदर्श क्रीडाप्रशिक्षक - शिवराज मुगळे, काशिनाथ भतगुणकी, आदर्श शेतकरी: गंगाधर बिराजदार (निंबर्गी), पंडीत बुळगुंडे (संजवाड), पुष्पा खातेनवरू (नांदणी), व ग्रामसेवक नागेश जोडमोटे व वृक्षमित्र मनोज देवकर

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर यांचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ मार्च -**



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामीभक्तांची वाढत चाललेली गर्दी पाहता सुयोग्य नियोजन करण्यात येत असल्याचे मनोगत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे पुरोहित विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.

याप्रसंगी प्रा. चंद्रकांत पाटील, शंकरराव सुरवसे न्यासाचे सौरभ मोरे, अतिश पवार, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, संभाजीराव पवार, सागर पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, गोविंदराव शिंदे, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, शिव स्वामी, प्रकाश लोंढे, महांतेश स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### रॅगिंगविरोधी कायदा, नियम यासंदर्भात मार्गदर्शन

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित भू.म. पुल्ली कन्या प्रशालेच्या वतीने आयोजित केलेल्या जागतिक महिला दिन कार्यक्रमांतर्गत रॅगिंगविरोधी कायदा, नियम यासंदर्भात विद्यार्थिनी आणि पालकांना म ार्गदर्शन करण्यात आले. ॲड. सुप्रिया पाटील-चिनगुंडे यांनी याबाबतची माहिती विशद केली. प्राचार्या गीता सादूल ह्या अध्यक्षस्थानी होत्या. व्यासपीठावर उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल यांची उपस्थिती होती. प्रा. विमल नामपल्ली यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. सुजाता विन्नू यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सुमित्रा कुडकयाल यांनी आभार मानले. याप्रसंगी विद्यार्थिनी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होत.



### सिव्हिल हॉस्पिटल येथे धनश्री परिवारांकडून अन्नदान वाटप

**सोलापूर, दि. ९ मार्च -**

धनश्री परिवाराचे संस्थापक शिवाजीराव काळुंगे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथे रुग्णांना व नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. जनसेवेसाठी तत्पर असणारे धनश्री व सीताराम परिवार हा नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर राहिला आहे. धनश्री व सिताराम परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अन्नदानाचा उपक्रम हाती घेण्यात आला. यावेळी धनश्री मल्टीस्टेट भंडारकवठे शाखेचे शाखाधिकारी दादासाहेब धसाडे, सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सिद्धेश्वर अडगळ, धुळखेड शाखेचे शाखा अधिकारी रवी अडोळे, तामलवाडी शाखेच्या शाखाधिकारी पोर्णिमा शिंदे, राघवेंद्र पाटील, भगवंत बिराजदार, गजानन स्वामी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



### शिव्यामुक्त समाजनिर्मितीबाबत व्यक्त करण्यात आला संकल्प

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

येथील राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा, देशभक्त भाई छन्नुसिंग माध्यमिक विद्यालय व समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या एका उपक्रमांतर्गत शिव्यामुक्त समाजनिर्मितीचा सकल्प व्यक्त करण्यात आला. जुना विडी घरकुल येथील राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमप्रसंगी विडी कामगारांसह कष्टकरी महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच म हिलांनी आपल्यातील सुप्तकलागुण आणि कौशल्यांना व्यावसायिक रुप करण्याकामी पुढाकार घेण्याचेही यावेळी ठरले.प्रारंभी ॲड. सरिता मोकाशी यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी मंचावर हेमू चंदेले, सरिता चंदेले, प्रा.डॉ. रोझा चंदेले-पाराशर, प्रा. डॉ. मीना गायकवाड, रेश्मा गायकवाड, प्रा.दीपाली अवसेकर, शकुंतला सूर्यवंशी, प्र.प्राचार्य एस.बी. गायकवाड, महादेव तोळनुरे, अमृतदत्त चिन्नी आदींची उपस्थिती होती. सावित्री म हिला संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वमत चाचणी स्पर्धे तील यशस्वी विद्यार्थिनींना पारितोषिके देण्यात आली. इंदिरा गड्डम यांनी गाणी म्हटलो. डॉ. अनुराधा जाधव यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. चंदाराणी गुंड यांनी आभार मानले. यावेळी पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### बेस्ट इंग्लिश टिचर पुरस्कारसाठी आवाहन

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

येथील सारथी संडे इंग्लिश स्पीकर्स कलबच्या वतीने गेली १० वर्षे बेस्ट इंग्लिश टिचर पुरस्काराने विविध शाळा-महाविद्यालयांतील गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. या पुरस्काराचे यंदाचे ११ वे वर्ष असून जून महिन्यात याचे वितरण करण्यात येणार आहे. इच्छुकांनी १५ मार्च २०२५ या तारखेपर्यत ९८९०९२५९९६ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावेत, असे आवाहन प्रा. विठ्ठल वंगा यांनी केले आहे. इंग्रजी अध्यापन करणाऱ्या दोन शिक्षक, प्राध्यापकांचा विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. शासनमान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे कम ीतकमी पाच वर्षे अध्यापन करणारे, विद्यार्थ्यामध्ये इंग्रजी भाषेची गाडी निर्माण केलेले आणि इंग्रजी भाषेचा न्यूनगंड नाहीसा करण्याचा प्रयत्न करणारे शिक्षक, प्राध्यापक अर्ज करण्यास पात्र राहतील, असेही त्यांनी सांगितले.

# स्त्रियांनी समाजाला एक नवीन दिशा दिली : पाटील

**अनुभव प्रतिष्ठानचे यशस्विनी महिला पुरस्कार वितरण : तरुण भारतच्या उपसंपादिका आरती कुसेकर यांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

महिला दिन एक दिवस नसतो ते वर्षभर असतो. स्त्रियांनी समाजाला एक नवीन दिशा दिली आहे. प्रत्येक स्त्री ही माते समान असते. आधुनिक काळात स्त्री ने स्वताचे निर्णय स्वतःच घेतले पाहिजे.महिलांसाठी संस्था नेहमी प्रेरणादायी काम करत आहे. प्रतिष्ठानचे काम उल्लेखनीय कार्य आहे.असे मत स्नेहदीप पब्लिक स्कूलचे संचालिका स्नेहा पाटील यांनी मांडले.

येथील अनुभव प्रतिष्ठानच्या वतीने यशस्विनी महिला पुरस्कार सोहळा नवी पेठ येथील शिवस्मारक सभागृहात पार पडला. त्यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्यासह निवृत्त वरीष्ठ उपअभियंता सिद्धाराम दुधनी, शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. गायत्री देशपांडे, जेष्ठ नागरिक संघ सचिव मन्मथ कोनापुरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश भाईकट्टी, महिला अध्यक्ष श्वेता कालदीप यांच्या प्रमुखउपस्थितीत १० महिलांचा सन्मान करण्यात आला.

सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्काराचे हे पहिले वर्ष आहे. प्रत्येक महिला जबाबदारी



**या महिलांचा झाला सन्मान**

अस्मिता अंबुरे (आर्किटेक्चर), संगीता मुनावळी (शिक्षिका), अंबिका कनबसे (महिला पोलीस ), राणी भंडारे (सरपंच, वलाडी), उज्वला अ.लोखंडे (डॉक्टर), प्रांजली मोहीकर (समाजसेविका), आरती कुसेकर (पत्रकार), ऋतुजा लिमये (कलाक्षेत्र ), पल्लवी वाले (उद्योजिका), माधुरी मोरडे (वकील)

घेऊन काम करत असतात आणि प्रत्येकाने काम करत असताना प्रामाणिक न्याय देण्याचा प्रयत्न करावा. प्रतिष्ठानचे काम पाहत असताना अभिमान वाटतो. या तरुणाचा कौतुक करावे तेवढे कमीच आहे, असे मत सिद्धाराम दुधनी यांनी मांडले. सूत्रसंचालन गणेश येळमेली यांनी केले. कविता येळमेली यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिव्या कालदीप, संगीता नागणसुरे, कोमल लोणी, मीनाक्षी शिवशिंपी, सुनंदा भाईकट्टी अभिषेक दुलंगे, शिवानंद नागणसुरे, गणेश कालदीप, सचिन लोणी, शिवानंद भाईकट्टी, संतोष शिवशिंपी, सोमनाथ कालदीप, हरीश आमणे आर्दीनी परिश्रम घेतले.

# स्व. डॉ. स्वर्णलताताई भिशीकर 'श्रध्दांजली सभा' १६ मार्चला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

'ज्ञान प्रबोधिनी' हराळीच्या प्रमुख विश्वस्त, पुणे 'तरुण भारत'च्या माजी संपादक, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. स्वर्णलताताई भिशीकर यांचे प्रदीर्घ आजाराने सोलापूर येथे सोमवार, दि. ३ मार्च रोजी रात्री निधन झाले. तर मंगळवार, ४ मार्च रोजी मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, सोलापूर येथील ज्ञान प्रबोधिनीमध्ये रविवार, दि. १६ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत स्व. डॉ. स्वर्णलताताई भिसेकर यांच्या श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्ञान प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष गिरीश बापट, कार्यवाह सुवर्णा गोखले, सहकार्यवाह अमोल गांगजी यांनी दिली.



पुणे येथील प्रख्यात संपादक कै.चं.प. तथा बापूसाहेब भिशीकर यांच्या डॉ. लताताई या कन्या होत्या. सोलापूर येथील केळकर दांपत्याने बालविकास मंदिर शाळा, ज्ञान प्रबोधिनीकडे हस्तांतरित केल्यानंतर त्या सोलापूरला स्थायिक झाल्या. पुणे ज्ञान प्रबोधिनी संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब पेंडसे यांची जीवन मूल्ये त्यांनी तरुण वयात आत्मसात केली होती. सोलापूर आणि हराळी येथे भव्य वास्तूंची निर्मिती आणि उत्तम संस्कारसंपन्न तरुण पिढी घडविण्यात त्यांचे योगदान अतुलनीय राहिले आहे. सोलापूरला आल्यावर त्यांनी प्रबोधिनीत सत्संग केंद्राची स्थापना केली. ज्ञानेश्वरी, दासबोध, पतंजली योगसूत्रे याद्वारे त्या साधकांना नेमके मार्गदर्शन करीत असत. पुण्याचे डॉ. माधवराव नगरकर तथा स्वामी माधवानंद यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संग शिबिरे, गुरू पौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात लताताईंचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी लिहिलेली पुस्तके, विविध इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे त्यांच्या विद्वत्तेचे प्रगल्भ दर्शन घडवतात. त्यांच्या जाण्याने आध्यात्मिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. 'राष्ट्राय स्वाहा' असं समर्पित जीवन जगणाऱ्या डॉ. स्वर्णलताताई चंद्रशेखर भिसेकर या अनंतात विलीन झाल्या आहेत. त्यांच्याविषयी आपल्या चित्तरूपी ओंजळीतील स्मृतीरूपी फुले श्रध्देने समर्पित करण्याची इच्छा सर्वांनाच आहे. यासाठी या श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

# प्रवाशांच्या संख्येत घट; एसटी बसेसच्या १९९ फेऱ्या रद्द

**रमजान व परीक्षेमुळे प्रवासी कमी झाल्यामुळे सोलापूर विभागाने घेतला निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असल्याने तसेच १ मार्चपासून रमजान रोजाचे उपवास सुरू झाल्यामुळे सोलापूर विभागातील प्रवाशांच्या संख्येत मोठी घट होत आहे. त्यामुळे एसटीने १४ मार्चपर्यंत सोलापूर विभागातील १९९ फेऱ्या रद्द केल्याची माहिती सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी दिली.

दरम्यान, १ मार्चपासून रमजान महिना सुरू झाला आहे. याच काळात परीक्षाही सुरू आहेत. रोजाचे उपवास सुरू असताना मुस्लिम बांधव प्रवास टाळतात. यामुळे एसटीच्या उत्पन्नात सुमारे चार टक्के घट झाली आहे.



गतवर्षीच्या तुलनेत यंदा १ मार्च ते ६ मार्च या कालावधीतील उत्पन्न १० लाख ७२ हजार रुपयांनी घटले आहे. तसेच आगामी काळातील होळी,धूलिवंदन या सणांचा विचार करून पुढील नुकसान टाळण्यासाठी काही मध्यम पल्ल्याच्या व काही लांब पल्ल्याच्या गाड्या रद्द करणार आल्या आहेत.

यामध्ये पंढरपूर आगाराच्या २८ फेऱ्या अकलूज आगाराच्या १८ फेऱ्या, अक्कलकोट आगाराच्या २६ फेऱ्या, मंगळवेढा आगाराच्या चार फेऱ्या, सोलापूर आगाराच्या २६ फेऱ्या, बार्शी आगाराच्या ३६ फेऱ्या, करमाळा आगाराच्या ३० फेऱ्या तर कुर्दुवाडी आगाराच्या ३१ फेऱ्या अशा एकूण १९९ फेऱ्या शनिवारपर्यंत (दि.१४) मार्च पर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. यामध्ये बहुतांश फेऱ्या लांब व मध्यम पल्ल्याच्या असून स्थानिक फेऱ्यांचाही समावेश आहे.

### इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

**सोलापूर :** गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. ११ एप्रिल रोजी इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे.दिग्दर्शनाची धुरा प्रसाद नामजोशी आणि सागर वंजारी या दिग्दर्शक जोडगोळीने सांभाळली आहे.





### डीसीसी बँकेचे तहसीन शेख यांचा सन्मान

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ व जागतिक माहिला दिवसानिमित्त सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह बँकेच्या वतीने बँकेचे ज्येष्ठ कर्मचारी सौ तहसीन शेख व त्यांचे पती एजाज शेख यांचा यथोचित सन्मान म. रा -सहकारी संस्था महाराष्ट्र राज्यचे अप्पर निबंधक संतोष पाटील, सह निबंधक पुणे योगीराज सुर्वे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शिंदे, प्रशासक कुंदन भोळे यांच्या उपस्थित करण्यात आला.

# शहरात १० ते २२ मार्च दरम्यान सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम

**१ लाख १० हजार लोकसंख्येचे करणार सर्व्हेक्षण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम दि.१० ते २२ मार्च २०२५ या कालावधीत सुरु करण्यात येणार आहे. ही शोध मोहिम अतिजोखीमग्रस्त लोकसंख्या, झोपडपट्टी, विटभट्टी, भटक्या जमाती, स्थलांतरीत लोक, कामगार, बेघर, तुरुंग, वसतीगृहे, मनोरुग्णालये आदी ठिकाणी राबविण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वकांक्षी योजनेनुसार संपूर्ण भारत देशातून सन २०२५ अखेर पर्यंत क्षयरोगाला हददपार करण्याचे उददीष्ट आहे. या सर्वेक्षणा दरम्यान पथकांना शहर क्षयरोग केंद्राने तयार केलेले नाविन्यपूर्ण क्यू आर कोड तसेच टीबी विषयक माहिती

**९ पर्यवेक्षकांसह ४४ पथक नियुक्त**

भारत सरकारच्या राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत महापालिका प्रशासनाच्या वतीने या शोध मोहिमेमध्ये १ लाख १० हजार ६७२ इतक्या लोकसंख्येचे सर्व्हेक्षण करण्यात येणार असून, याकरिता ४४ टीम व ९ पर्यवेक्षकांचे पथक नियुक्त करण्यात आलेले आहे.

पत्रके देऊन क्यू आर कोड प्रत्येक घराला चिटकवण्यात येणार आहेत.यामधून आयईसी साधनसामुग्रीव्दारे टी बी आजाराविषयी जनजागृती होऊन समज गैरसमज दूर होणार आहेत.

या शोधमोहीमेमध्ये नागरिकांनी २ आठवडयांपेक्षा जास्तीचा खोकला, वजनातील लक्षणीय घट, थुंकीव्दारे रक्त पडणे, सायंकाळी बारीक ताप येणे, छातीत दुखणे, भूक मंदावणे व शरीराच्या कोणत्याही भागात गाठ येणे ही लक्षणे आढळल्यास गृह भेटीदरम्यान येणाऱ्या पथकाला सूचित करुन मोफत तपासणी करुन घ्यावी. तरी सोलापूर शहरातील सर्व नागरिकांनी या मोहिमे करीता सहकार्य करावे असे आवाहन सोलापूर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



# बचत गटाच्या उत्पादनासाठी जिल्हास्तरावर लवकरच 'स्वतंत्र दालन'

**महिला बचत गट उत्पादित वस्तू; प्रदर्शनाचे केले उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

बचत गटाच्या उत्पादनासाठी जिल्हा स्तरावर एक स्वतंत्र दालन निर्माण करून त्या ठिकाणावरून सर्व उत्पादनाची विक्री व मार्केटिंग होईल आणि लवकरच याची सुरूवात होईल, अशी ग्वाही जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांनी दिली.

दरम्यान, महिला आर्थिक विकास महामंडळ, सोलापूर अंतर्गत नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत माविम ५० वा वर्धापन दिन व जागतिक महिला दिना निमित्त जिल्हास्तरीय बचत गटाच्या उत्पादन प्रदर्शन व विक्रीचेही त्यांनी यावेळी उद्घाटन केले. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व त्यांच्या पत्नी महिमा कुलकर्णी, पीएसआय सुरेखा शिंदे, जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्डचे नितीन शेळके, सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताच्या संगीता खंदारे, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार माविम, पुणे विभाग सिद्धिराम माशाळे, उद्योगवर्धिनीच्या चंद्रिका चव्हाण आर्दीची उपस्थिती होती.

महिमा कुलकर्णी म्हणाल्या, महिलांबरोबर संवाद साधताना महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत आणि महिला कोणत्याही कामात पुढाकाराने पुढे आल्यास त्या कामात उच्च शिखरावर पोहचतील. पोलिस अधीक्षक कुलकर्णी म्हणाले, पोलीस प्रशासन सदैव महिलांच्या सोबत आहे. कोणत्याही अडचणी असल्यास त्यांनी संपर्क करावा. यावेळी सिद्धिराम माशाळे यांनीही मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वयक अधिकारी सोमनाथ लांमगूंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रशांत गायकवाड यांनी सूत्रसंचालन तर आभार सहायक जिल्हा समन्वय अधिकारी सतीश भारत यांनी केले.

# अक्कमहादेवी महिला विद्यापीठात राष्ट्रीय कार्यशाळा

**राष्ट्र विकासात महिलांचे योगदान महत्त्वाचे : प्रा. धन्यकुमार बिराजदार**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

भारतीय ज्ञान परंपरेतील वेद काळात, वर्धमान महावीरांच्या सम वशरणात, महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंडपात महिलांचे स्थान महत्त्वाचे असून त्यांनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली आहे.

वर्तमान काळात महिला अनेक क्षेत्रात कार्यरत असून त्यांना मान सन्मान देण्यात सर्वांचे हित असल्याचे मत कर्नाटक राज्य अक्कमहादेवी महिला विद्यापीठ, विजयपूर येथे हिंदी साहित्य में स्त्री विमर्श विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय हिंदी कार्यशाळेत हरिभाई देवकरण महाविद्यालयाचे शिक्षक व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. एच. एम. चंद्रशेखर, कुलसचिव व आर्थिक अधिकारी शंकरगौडा सोमनाळ, हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. राजू बागलकोट, डॉ. नामदेव गौडा, डॉ. गुलाब राठोड, डॉ. अम रनाथ प्रजापती यांच्या उपस्थितीत धन्यकुमार बिराजदार यांनी हिंदी, मराठी, कन्नड भाषेतील महिला साहित्यकारांच्या साहित्यावर प्रकाश टाकत समाज व राष्ट्र विकासात स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय महिलांवर प्रकाश टाकत महिलांनी पाश्चात्य संस्कृतीचा अंधानुकरण न करत परंपरा व रूढी यातील फरक ओळखून कौटुंबिक जीवनात घर व राष्ट्रीय अस्मि ता टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावा असे नमूद केले. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. एच. एम. चंद्रशेखर, कुलसचिव व आर्थिक अधिकारी शंकरगौडा सोमनाळ यांनी देखील मनोगत व्यक्त करून महिला सशक्तीकरणात पुरुषांनी सुद्धा योगदान दिले पाहिजे असे नमूद केले. कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. राजू बागलकोट यांनी केले तर अमरनाथ प्रजापति यांनी आभार मानले. यावेळी हिंदी व उर्दू विभागाचे प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : चॅम्पियन ट्रॉफीतील भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यातील अंतिम सामना सुरु झाल्यानंतर रविवारी डफरीन चौकातील रस्त्यावर शुकशुकाट होता.



## संक्षिप्त वृत्त...

### चारित्र्याच्या संशयवरुन छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि.९ मार्च-**




पत्नी सासरी नांदत असताना तिच्या सासरकडील मंडळी यांनी माहेरून पैसे घेऊन ये असे म्हणून वेळोवेळी चारित्र्यावर संशय घेत शिवीगाळ करत मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास देत घरातून हाकलून दिल्याची फिर्याद राधिका तिरूमलेश बाईनी (वय-२७,रा. लक्ष्मी टॉकीज जवळ) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती तिरुमलेश,सासू सुशीला,दीर व्यंकटेश, जाऊ लक्ष्मी (सर्व. रा.गांधीनगर,सोलापूर) व नणंद पद्मा कोडगी व भारती बोल्लू (रा.हैदराबाद) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना १५ ऑगस्ट २०१५ ते ऑक्टोंबर २०२४ रोजी पर्यंत दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

### रेल्वे कॉलनी येथील पार्क केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर, दि.९ मार्च-**



रेल्वे कॉलनी येथील शनी मंदिर जवळ पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.ई.ए.८६३० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३ ते ४ मार्च दरम्यान घडली.याप्रकरणी संदीप बाबुराव सरदार (वय-४०,रा.शनी मंदिर,रेल्वे लाईन) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहेत.



### कामावर का आले नाही असे विचारल्याने मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि.९ मार्च-**

कामावर का आले नाही असे विचारल्याने एकास लाकडी फळी डोक्यात मारून जखमी केल्याची घटना ७ मार्च रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान गुरुदेव दत्त नगर येथे घडली.याप्रकरणी सुनील प्रभुनाथ सहानी (वय-४४,रा.भवानी पेठ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सोविद भारती व त्यांची पत्नी,राधे भारती (सर्व.रा.गुरुदेव दत्त नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे वरील संशयित आरोपी यांच्या घरासमोर जाऊन आज कामावर का आले नाही असे विचारले असता,त्याचा राग येऊन फिर्यादीस वरील संशयित आरोपी यांनी शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी देत हाताने मारहाण केली.तसेच सोविद यांची पत्नी हिने लाकडी फळी डोक्यात मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गावडे हे करीत आहेत.

### हँडल लॉक केलेली दुचाकी लंपास

**सोलापूर, दि.९ मार्च-**




हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच. १३.बीसी. ५१४३ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सागर बार समोर ७ मार्च रोजी रात्री दहा ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी दयानंद प्रभुलिंग हालमंथली (वय-३२,रा.नीलम नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार धुमाळ हे करीत आहेत.

## श्री साई महिला प्रतिष्ठानच्या महिला महोत्सवाचे पारितोषिक वितरण उत्साहात

# अभिनेता 'संतोष जुवेकर'च्या उपस्थितीने जल्लोष





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.९ मार्च-**

श्री साई महिला प्रतिष्ठानतर्फे आयोजित महिला महोत्सव २०२५ अंतर्गत २ मार्च ते ४ मार्च या कालावधीत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि. ९ मार्च रोजी इंडियन मॉडेल स्कूलच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. अभिनेते संतोष जुवेकर यांच्या उपस्थितीने कार्यक्रम मोठ्या जल्लोषात पार पडला.

याप्रसंगी प्रशालेचे संस्थापक प्रा.ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी मॅडम यांनी केली. समस्त महिलांचे कौतुक करण्यासाठी व त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी श्री साई महिला प्रतिष्ठानने महिला महोत्सव २०२५ चे आयोजन केले होते. महिला महोत्सवाचे हे यंदाचे १५ वे वर्ष आहे. प्रत्येक स्पर्धेसाठी भरघोस बक्षिसे देण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या प्रायोजकांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, शीतल म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, आमदार सुभाषबापू देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, पोलिस उपायुक्त बोराडे, अप्पर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर यांची उपस्थिती होती.

या महिला महोत्सवाअंतर्गत 'मॉम ऍन्ड मी', 'सोलो डान्स', 'ग्रुप डान्स' या स्पर्धांचे २ मार्च ते ४ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. वय वर्षे १६ ते ७० वर्षापर्यंतच्या १००० महिला स्पर्धकांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. मॉम ऍन्ड मी स्पर्धेमध्ये प्रियांका राजेश चडचणकर यांनी प्रथम क्रमांक मिळवला, सोलो डान्स स्पर्धेमध्ये अ गटामध्ये भक्ती राहुल कुलकर्णी व ब गटामध्ये आरती अमोल यादव यांनी प्रथम क्रमांक मिळवला तसेच ग्रुप डान्स स्पर्धेमध्ये हिरकणी ग्रुपने प्रथम क्रमांक मिळवला. कर्नाटकमधील पारंपारिक नृत्य 'यक्षगान' यावर सादरीकरण झाले. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात सादर केलेले शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा हे विशेष आकर्षण यावर्षीच्या महिला महोत्सवात होते. प्रशालेलच्या ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. शिवजन्मापासून शिवराज्याभिषेकापर्यंतच्या ऐतिहासिक प्रसंगांचे हुबेहुब सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. छावा चित्रपटातील रायाजी ची भूमिका साकारलेले प्रसिध्द कलाकार संतोष जुवेकर हे विजेत्या महिलांना पारितोषिक देण्यासाठी व त्यांचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होते. प्रकट मुलाखतीतून त्यांचा मालिका व मराठी, हिंदी चित्रपटातील प्रवास जाणून घेतला. याप्रसंगी संतोष जुवेकर यांनी दिलखुलासपणे प्रेक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली व प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, कु. ईशा जोशी,अध्यक्षा ममता बसवंती, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, अदिती कुलकर्णी, सुजाता बुट्टे, मानसी जोशी, रुही काझी, अनिता कुलकर्णी, आरती कुलकर्णी व साई महिला प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेच्या अश्विनी जाधव व दिपाली जोशी यांनी केले.

### विजेत्या महिला :- मॉम अँड मी स्पर्धा

प्रथम प्रियांका चडचणकर, द्वितीय डॉ. अंबिका यावलकर, तृतीय भाग्यश्री कुलकर्णी, उत्तेजनार्थ डॉ. अश्विनी तावसे, दिपीका पाटील, डॉ. संस्कृती वळसंगकर, सारीका क्षिरसागर, पल्लवी पाटील, विशेष पारितोषिक दिपाली कोडमूर, रुपल बिद्री.

### सोलो डान्स स्पर्धा

**गट अ - वय वर्षे १६ ते ३० :** प्रथम भक्ती कुलकर्णी, द्वितीय श्रद्धा बेरंगी, तृतीय प्रतीक्षा गायकवाड, विशेष पारितोषिक नेहा सोनी, भक्ती जाधव

**गट ब - वय वर्षे ३१ ते पासून पुढे :** प्रथम आरती यादव, द्वितीय पूनम टिनमेकर, तृतीय राणी समाणे, विशेष पारितोषिक लीना कसुलवार, विनया ढेकळे, (ग्रुप डान्स) प्रथम हिरकणी ग्रुप, द्वितीय जल्लोष ग्रुप, तृतीय तुफान ग्रुप, चौथे पावन गणपती महिला मंडळ, विशेष पारितोषिक भाग्यलक्ष्मी ग्रुप, आंध्रा रिधम

# शेतीच्या वादातून महिलेचा गळा आवळून खूनाचा प्रयत्न

### सहाजणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ मार्च -**

शेतीच्या वादातून महिलेचा दोरीने गळा आवळून खूनाचा प्रयत्न केल्याची घटना रानमसले (ता. उत्तर सोलापूर) येथे घडली असून याबाबत सहाजणांविरुध्द सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत श्राविका चंद्रकांत पवार (वय ३४, रा. रानमसले) या महिलेच्या फिर्यादीवरुन विनायक महालिंग गरड (वय २६), गणेश महालिंग गरड (वय २८), महादेवी महालिंग गरड (वय ३०), बापूराव दादाराव गरड (वय ३०), लक्ष्मी बापूराव गरड (वय ३०), बापूराव दादाराव गरड (वय ३४, सर्व रा. रानमसले) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी विनायक, गणेश, बापूराव गरड यांना अटक केली आहे.

६ मार्च रोजी दुपारी श्राविका पवार या त्यांच्या शेतात ट्रॅक्टर लावून कुळवणी करीत होत्या. त्यावेळी शेतीच्या वादाच्या कारणावरून विनायक, गणेश, महादेवी, बापूराव, लक्ष्मी यांनी कॅनलच्या शेजारीच श्राविका यांच्या शेतात तिला शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने, हाताने, कमरेच्या पट्ट्याने, चाकूने मारहाण करून त्यांच्याकडील मोबाईल फोन जबरदस्तीने काढून घेतले. तसेच श्राविका यांना जिवानिशी मारूनच टाकतो असे म्हणून नॉयलॉन दोरीने श्राविका यांचा गळा आवळून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. म्हणून सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक कदम पुढील तपास करीत आहेत.

# शासनाचे वाळू धोरण 'जिल्हा प्रशासना'कडे येणार तर कधी?

## जिल्ह्यातील १४ वाळू ठेके अजूनही प्रलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

वाळू उत्खननासाठी राज्य सरकारच्या नवीन धोरणानुसार वाळूमाफियांना चाप बसविणाऱ्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच वाळू उपसा करणाऱ्या कंत्राटदाराला २४ तास सीसीटीव्ही बसविण्याची सक्तीही केली आहे. मात्र वाळूबाबतचे शासकीय धोरण अद्याप जिल्हा प्रशासनाकडे आले नसल्याने १४ वाळू ठेके देण्याचे प्रलंबित असल्याची माहिती महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दै. तरुण भारतशी संवाद साधताना दिली.

राज्यासह सोलापूर जिल्ह्यातही अवैध वाळू उपशाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे डिपीसीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा प्रशासनाला कडक पावले उचलण्याचे निर्देश दिले होते. यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचीही वाळू माफियांवर करडी नजर आहे. मात्र वाळू ठेके देण्याचे शासनाचे धोरणच जाहीर होत नसल्याने वाळू ठेके द्यायचे कसे? असा प्रश्न प्रशासनापुढे आहे. यापूर्वीच्या वाळू उपसा धोरणात त्या-त्या ग्रामपंचायतीने 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले, तरच वाळू उपसा करण्याचे धोरण होते. यासाठी त्या ग्रामपंचायतीला २०-२५ टक्के रक्कमही विकासकामांना मिळणार होती. मात्र पुन्हा महायुती सरकारने यामध्ये अजून काही धोरणात्मक बदल केले आहेत.

यामुळे वाळू उत्खननाच्या ठिकाणी 'सीसीटीव्ही' लावण्याची सक्ती केली आहे. ते कोठे लावायचे, याबाबतीतही नवीन धोरणात सूचना आहे. त्यानुसार वाळू भरण्याचे ठिकाण, वाळू वाहतूकीचा मार्ग या ठिकाणी ते लावण्याची सक्ती आहे. वाळूची वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्याचेही बंधन घातले आहे. इतकेच नाहीतर वाळू उत्खननासाठी पर्यावरणविषयक परवानगी, वाळू उपसा करण्यापूर्वी कंत्राटदाराने तेथे फलक लावणे, उत्खनन सकाळी सहा ते सायंकाळी सहा या कालावधीतच करणे, नदीपात्रात मोठी वाहने नेण्यास बंदी, वाळू वाहतुकीला एकच रस्ता ठेवण्याची सक्ती यासह अन्य अटी घातल्या आहेत. दरम्यान, याबाबतचे नवीन वाळू धोरणच अद्याप आले नसल्याने ते धोरण आल्यावर वाळू ठेके देण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### अवैध वाळू उपशामुळे शासनाचा कोट्यवधींचा बुडतोय महसूल

राज्य शासनाकडून वाळू संदर्भात कोणतेही धोरण जाहीर केले नसल्याने अवैध वाळूची राज्याच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे. यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. इतकेच नाहीतर सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड महाग वाळू विकत घ्यावी लागत आहे. मध्यंतरी महसूलमंत्री बावनकुळे यांना विचारणा केली असता त्यांनी शासनाचे वाळू धोरण २४ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीर होणार असल्याचे सांगितले होते. मात्र आता मार्च महिन्यातील ९ तारीख आली तरी सोलापूर जिल्हा प्रशासनाकडे जाहीर वाळू धोरण आलेच नाही, हेही विशेषच आहे.

### सामान्यांना स्वस्त दराने वाळू मिळणार केव्हा?

राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती मिळण्यासाठी तसेच अनधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित रेती/वाळू धोरण राज्य शासनामार्फत जाहीर करण्यात आले होते. गेल्या वर्षीच या धोरणाची अंमलबजावणी सुरु करण्यात येणार होती. इतकेच नाहीतर मोबाईल अॅपच्या माध्यमातून रेती/वाळू सर्वसामान्यांना एका क्लिकवर मिळणार असल्याची माहिती तत्कालिन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी दिली. मात्र याही धोरणाची अंमलबजावणी झालीच नसल्याने सर्वसामान्य नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. यामुळे अनेक नागरिकांना खडी मशीनवर निर्माण होणारी डस्ट, क्रश सॅन्डमधून बांधकाम करावे लागत आहे.

# 'फार्मर आयडी' साठी जिल्ह्यातून ९ लाखांपैकी ४ लाख शेतकऱ्यांची नोंदणी

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजनांचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून 'अॅग्रीस्टॅक' या डिजीटल उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे. महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना अॅग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे. या फार्मर आयडीसाठी सोलापूर जिल्ह्यातील ८ लाख ९३ हजार ६७७ शेतकऱ्यांपैकी ३ लाख ८१ हजार ७५ जणांनी ४२.६४ टक्के ऑनलाईन नोंदणी झाली आहे.

तालुकानिहाय स्थिती पाहता बार्शी तालुक्यातून ४२ हजार १८६, करमाळा ४० हजार ३७६, दक्षिण सोलापूर २६ हजार ३७६, अक्कलकोट ३२ हजार ७२६, उत्तर सोलापूर १३ हजार ३०८, मंगळवेढा २९६११, पंढरपूर ४१८७७, माळशिरस ४७५८४, माढा ३८ हजार ७४६, मोहोळ २८ हजार ८१६, सांगोला ३९ हजार ४६९ अशी जिल्ह्यातील एकूण ३ लाख ८१ हजार ७५ शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे. आता या शेतकऱ्यांना शासनस्तरावरून शेतकरी ओळखपत्र लवकरच मिळणार आहेत.

### कार्ड नाही काढाल तर शासकीय योजनांना मुकाल

पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, पीक विमा योजना, कृषी विभाग यांत्रिकीकरण योजना, थेट लाभाच्या हस्तांतरण योजना, पीक कर्ज सुलभपणे मिळवण्यासाठीच्या या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलं नाही तर त्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळं नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणं आवश्यक आहे.

**-शुक्राचार्य भोसले,** जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी, सोलापूर

### फार्मर आयडी सर्वांनीच लवकर काढून घ्यावा!

अॅग्रीस्टॅक हे असं डिजीटल फाऊंडेशन असेल ज्याद्वारे डेटा आणि डिजीटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन केलं जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना डिजीटल ओळखपत्र दिलं जाईल. त्यामध्ये त्यांच्या शेतीसंदर्भातील माहितीचा समावेश असेल. यामध्ये प्रामुख्यानं नोंदणीचे तीन संच असतील. यामध्ये शेतकऱ्यांचा आणि त्याच्या शेतांचा आधार संलग्न नोंदणी संच, भूसंदर्भिकृत व्याप्त दर्शवणारा गाव नकाशांचा नोंदणी संच, हंगामी पिकांचा नोंदणी संच असेल. यामुळे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपला फार्मर आयडी काढून घ्यावा.

**- मनिषा कुंभार** (निवासी उपजिल्हाधिकारी)

### फार्मर आयडीसाठी काय लागतात कागदपत्रं?

केंद्र व राज्य सरकारकडून शेतीविषयक योजना चालवल्या जातात. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक आहे. हे ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, सात बारा उतारा, गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणं आवश्यक आहे. फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात तलाठी कार्यालय, कृषी सहाय्यक आणि सीएससी केंद्र चालकांशी संपर्क करून आपला अर्ज ऑनलाईन भरता येतो.

### पीएम किसान सन्मान निधीसाठीही लागणार फार्मर आयडी

शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या आगामी हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल. पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना एका वर्षामध्ये ६००० रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. त्यामुळं आगामी हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळवणं आवश्यक आहे. यामुळे शेतकरी बांधव ई-सेवा केंद्रांवर गर्दी करताना दिसून येत आहे.

### १८ वर्षे वयानंतरच मिळणार किसान क्रेडिट कार्ड

किसान क्रेडिट कार्ड योजनेत शेतकऱ्यांना अर्थिक मदत दिली जाते. या योजनेसाठी अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे लागते. मात्र योजनेमध्ये कमाल वयाची मर्यादा नाही. आता सरकार या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त ५ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार आहे. हे कर्ज पाच वर्षांपर्यंत घेता येते. किसान क्रेडिट कार्डची वैधता देखील पाच वर्षांपर्यंत आहे.

### करोडो शेतकऱ्यांचा होणार फायदा


केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विविध घोषणा केल्या आहेत. यामधील महत्वाची घोषणा म्हणजे किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवण्यात आली आहे. ही मर्यादा ३ लाख रुपयांवरुन ५ लाख रुपये करण्यात आली आहे. शेतकरी आता १ एप्रिल २०२५ पासून ५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी अर्ज करु शकतील. याचा फायदा करोडो शेतकऱ्यांना होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५२

**पर्जन्याचे काळीं वोहळाचे नद ।**
**ओसरतां बुंद न थारेचि ।।**

पात्रता नसतानाही आपण पात्र आहोत, असे भासविणाऱ्यांची संख्या खूप आहे. याउलट पात्र असूनही आपण पात्र आहोत, असे तोंडाने न सांगता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देणारे फार कमी लोक आहेत. पात्र लोकांना फुशारक्या माराव्या वाटत नाहीत. पण अपात्रांना फुशारकीशिवाय जमत नाही. मी असा आहे, मी तसा आहे, मी असे करीन, मी तसे करीन,मी असे केले, मी तसे केले असे व्यर्थ वाचाळ बडबड करणारे लोक प्रत्यक्ष कृतीच्या वेळी कोठे गायब होतात हे कळतही नाही. आपल्या अवती भोवती आपली स्तुती करणारे चार लोक जमा करून इतरांपुढे मोठेपण दाखविले जाते. पण प्रत्यक्ष कृतीची वेळ येते तेव्हा भोवतीचे चार लोक व फुशारकी मारणाराही तेथून पळ काढतो. पावसाच्यावेळी वोहळालाही नदीचे स्वरुप येते आणि पाऊस थांबला म्हणजेच पावसाळा संपला असता अशा ओहळात एक थेंबही राहात नाही. त्याप्रमाणे फुशारक्या मारणारे लोक, त्यांच्या अवती भोवतीचे त्यांचे भाट पाहून बडबडत जातात आणि कृतीच्या वेळी भाटासह हे लोक काढता पाय घेतात. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**पर्जन्याचे काळी वोहळाचे नद। ओसरतां बुंद न थारेचि ।।**

संत म्हणून घेण्याची आपली पात्रता नसतांनाही ढोंगी लोक आपल्या भोवती चार भक्त निर्माण करतात. त्यांच्या मुखातून व स्वमुखातून स्वत:च्या किर्तीचे पाढे वाचतात, लोकांना आकृष्ट करून स्वार्थ साधण्यात यशस्वीही होतात. पण जेव्हा संतत्वाची परीक्षा देण्याची वेळ येते तेव्हा मात्र हे ढोंगी लोक उघडे पडतात. जे खरे संत असतात, ते कधीही स्वत:चे मोठेपण सांगत नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत ते स्थिरत्वापासून ढळत नाहीत. आपण स्थिर आहोत, असे सांगणारे आणि प्रसंगानुरूप स्थिरत्वापासून ढळणारे संत असत नाहीत. ढोंगी लोकांचे साधुपण पावसाळ्यात ओहळाला आलेल्या पुराप्रमाणे व विशिष्ट कालावधीकरिता खळखळाट करणारे असते. ढोंगी लोकांचे साधुपण कालांतराने कोरडे पडले जाते. अशा लोकांकडे स्थिरत्व हा गुण नसतो. ज्याच्याकडे स्थिरत्व, शांती, समत्व हा गुण नाही, तो साधु, संत असू शकत नाही. म्हणून लोकांनी अशा भपक्या, अस्थिर, भेदजन्य वृत्तीच्या आणि व्यवहारात अडकलेल्या ढोंगी लोकांना साधु, संत म्हणून साधु, संत या शब्दाची अवहेलना करू नये. जाहिरात, प्रसिध्दी, भाट आदिच्या माध्यमातून अनेक ढोंगी त्यांच्या ओहळाला मोठेपणाचा पुर आणीत आहेत. या पुराला स्थिरत्वाची, शांतीची नदी समजून त्यात स्नान करण्याचा आपण प्रयत्न करू नये. कारण या ओहळातील पाणी हे स्वार्थ, अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध आदिच्या अग्नीने उकळलेले असते, जे आपणाला भाजून काढू शकते.

**जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. १० मार्च २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**शु. एकादमी (०७.४४)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - पुष्य (२४.५०)**
**योग - शोभन (१३.५५)**
**करण - बव (१९.५५)**

**दिनविशेष - चांगला दिवस, सावित्रीबाई फुले पुण्यदिन, आमलकी एकादशी**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. आपल्याला नवीन संधी मिळतील. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : घाई गडबडीने कोणतेही काम करू नका. मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**सिंह** : पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या** : मुलांचे प्रेम मिळेल.मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : प्रवास सावधानीने करावा. चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : व्यापारिक कामे यशस्वी होतील. सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा, पश्चिम आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर** : कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# लाल मिरचीचा ठसका नाहीच!

## ऐन हंगामात मिरचीचे दर स्थिर

### उत्पादन व आवक कमी; मागणीत उठाव नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च**

यंदाच्या वर्षी लाल मिरचीचा ठसका म्हणावा तसा वाढला नाही. गतवर्षी उत्पादन व आवक जास्त असून देखील मागणी वाढून दरामध्ये वाढ झाली होती. मात्र यंदाच्या वर्षी चित्र नेमके उलटे दिसत आहे. यावर्षी लाल मिरचीचे उत्पादन व आवक कमी असून देखील मिरचीचे दर घसरलेलेच आहेत. बाजारपेठेत १०२१ क्विंटल मिरचीची आवक आहे परंतु म्हणावी, तशी मागणी नसल्याने मिरचीचे दर स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, दरवर्षी लाल आणि काळ तिखट करण्यासाठी ग्राहकांकडून लाल मिरच्यांची मागणी होते. लाल मिरच्यांमध्ये ब्याडगी, तेजा, सी-५, गुंटूर, अशा विविध प्रकारच्या मिरच्यांचा समावेश आहे. सर्वाधिक तेजा प्रकारच्या या मिरचीला ग्राहकांमधून मागणी आसते, त्याच पद्धतीने तिखट नसणारी ब्याडगी या मिरचीला देखील सर्वाधिक मागणी असते. परंतु यंदा मिरच्यांची मागणीच घटली आहे. तसेच आंध्र आणि कर्नाटकमधून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी येणारी गुंटूर आणि ब्याडगी या मिरच्यांना देखील मागणी कमी झाल्याने दरामध्ये वाढ झालेली नाही.



**मिरचीचे प्रकार व घाऊक दर प्रतिकिलो**

| लाल मिरची | प्रती किलो घाऊक दर |
|---|---|
| ब्याडगी | १५० ते १६० |
| तेजा | १४० ते १५० |
| सी - ५ | १०० ते ११० |
| गुंटूर | ११० ते १२० |

शहरातील लक्ष्मी मार्केटसह इतर मार्केटमध्ये विकल्या जाणाऱ्या लाल मिरच्यांच्या किरकोळदरामध्ये हमाली तोलाई धरल्यास दरामध्ये वाढ होते. जवळपास १० ते २० टक्के दरात वाढ जाणवते. परंतु ही वाढ गत वर्षीच्या तुलनेत कमी आहे. गतवर्षी बाजार समितीमध्ये मिरच्यांचा घाऊक दर हा वाढलेला होता. त्यामुळे किरकोळ दरामध्ये देखील वाढ होऊन, मिरच्यांची दरवाढ झाली होती. परंतु यंदाच्या हंगामात लाल मिरच्यांचा ठसका कमीच असल्याचे जाणवत आहे.

**मिरच्यांचे दर कमीच**

सोलापूर जिल्ह्यामध्ये मिरचीचे उत्पादन कमी प्रमाणात आहे. तसेच कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून येणारी लाल मिरची यांचे देखील प्रमाण कमी झाले आहे. मिरचीचे उत्पादन आणि आवक म्हणावे तसे नसले तरी बाजारपेठेत उठाव दिसून येत नाही. गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी मिरचीचे दर घसरलेले आहेत. १०० रुपयांपासून ते २०० रुपयांपर्यंत मिरचीचे घाऊक दर स्थिरावलेले आहेत.

**- सिद्राम नरोने, मिरचीचे व्यापारी**

# सोलापुरात तरुणांच्या तणनाशक औषध व फिनेल प्राशन केल्याच्या दोन घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ मार्च -**

आर्थिक तणावातून सोरेगाव येथील तरुणाने बेंगलोर येथे तणनाशक औषध प्राशन केले. हा प्रकार ३ मार्च रोजी रात्री कर्नाटक राज्यातील बेंगलोर येथील ओमशक्ती मंदिराजवळ घडला.

सुनिल बसप्पा अचलेरी (वय २७, रा. सोरेगाव सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. सुनिल हा आर्थिक अडचणीत असल्याने तो तणावाखाली होता. त्यातून त्याने बेंगलोर येथील ओमशक्ती मंदिराजवळ असताना गवतावर मारण्याचे तणनाशक औषध प्राशन केले. त्यानंतर त्याच्यावर बेंगलोर येथील सरकारी रुग्णालयात उपचार करण्यात आले. तेथील उपचार करून पुढील उपचारासाठी ७ मार्च रोजी रात्री ८.४० वाजता सागर भिमदे यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. दुसऱ्या घटनेत शेजारी राहणा-यासोबत भांडण झाल्याच्या कारणातून तरुणाने फिनेल प्राशन केले. हा प्रकार शनिवारी रात्री साडेबारा वाजता उत्तर सदर बझार भागात घडला. ज्ञानेश्वर अंजनय्या गोन्याल (वय १८) असे तरुणाचे नाव आहे. ज्ञानेश्वर यास त्रास होऊ लागल्याने वडील अंजनय्या यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**विद्युत पोलला दुचाकी धडकून दोघे जखमी**

विदयुत पोलला दुचाकी धडकल्याने दोघे जखमी झाले. प्रकार शनिवारी सकाळी ६ वाजता स्पीड शोरूमसमोरील निलकंठ बँकेसमोर घडला. रोहित सुनील नंदाल (वय २०, रा. जुना विडी घरकुल) व तुकाराम गोवर्धन येमूल (वय २४, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. शनिवारी सकाळी वरील दोघेजण दुचाकीवरून सुनील नगर एमआयडीसी येथून राहत्या घरी जात होते. दरम्यान स्पीड शोरूमसमोरील निलकंठ बँकेसमोरील खांबाला दुचाकी धडकली. यात खाली पडून दोघे जखमी झाले. ज्ञानेश्वर येमूल यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**बोलण्याच्या कारणातून एकास मारहाण**

जेवणाकरीता गेल्यानंतर मध्ये का बोलतो या कारणातून तरुणाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार हगलूर परिसरातील हरियाना ढाब्यावर शुक्रवारी रात्री १२ वाजता घडली.

लिंबाजी बाबुशा बेळळे (वय २८, रा. हगलूर ता. उ. सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री लिंबाजी ढाब्यावर गेला होता. त्यावेळी तेथे निखिल कदम व इतर तीन जणांनी लाकडी टेबल डोक्यात घालून तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यास जखमी केले. भाऊ गणेश याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**ढाब्यावर ऑर्डर देण्याच्या कारणातून मारहाण**

जेवणाची ऑर्डर देण्याच्या कारणातून तरुणाला मारहाण झाली. हा प्रकार शुक्रवारी रात्री १२ च्या सुमारास उत्तर सोलापूर तालुक्यातील हगलूर गावाजवळील हरियाना ढाब्यावर घडला. निखिल बाळासाहेब कदम (वय ३२, रा. जुनी मिल चाळ) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. शुक्रवारी रात्री निखिल हा ढाब्यावर जेवणासाठी गेला होता. त्यावेळी तेथे ऑर्डर देण्याच्या कारणातून त्याची लिंबाजीबरोबर तक्रार झाली. यातून लिंबाजी याने फळीने मारहाण केली. यात जखमी झाल्याने मित्र राम याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**दुचाकींची समोरासमोर धडक; वडवळ येथील एकजण जखमी**

मोहोळ ते कामती या रस्त्यावरून जाताना दुचाकींची समोरासमोर धडक लागल्याने वडवळ येथील एकजण जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजता घडला.

मनोज शंकर आदमाने (वय ३०) असे जखमीचे नाव आहे. मनोज हा कामानिमित्त शुक्रवारी दुपारी दुचाकीवरून कामती रोडवरील गायकवाड हॉस्पीटल समोरील रस्त्यावरून जात होते. त्यावेळी समोरून आलेल्या दुचाकीची त्याच्या दुचाकीला धडक लागली. यात डोक्याला आणि चेह-याला जखम झाली. तर दोन्ही पायाला खरचटल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालय येथे उपचार करून वडील शंकर आदमाने यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद झाली आहे.

**कॅनालजवळ दुचाकी घसरून एकजण जखमी**

हगलूर येथून बक्षीहिप्परगा येथे जाताना कॅनालजवळ दुचाकी घसरून दुभाजकाला धडकल्याने एकजण जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी सायंकाळी सात वाजता घडला.

आकाश अभिमान माळी (वय २५, रा. बक्षीहिप्परगा ता. द. सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास आकाश हा दुचाकीवरून बक्षीहिप्परगा येथे जात होता. दरम्यान कॅनालजवळ आल्यानंतर तो चालवित असलेली दुचाकी घसरल्याने तेथील दुभाजकाला धडकून तो खाली पडला. यात यात डोक्याला मार लागला असून कानातून रक्तस्त्राव होऊ लागल्याने हणमंत माळी यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**विजेच्या खांबावर विदयुत धक्का लागून तरुण जखमी**

स्वत:च्या शेतातील विदयुत पोलवर चढून काम करताना विदयुत धक्का लागल्याने तरुण खाली पडून जखमी झाला. हा प्रकार धाराशिव जिल्ह्यातील खहिप्परगा येथे शुक्रवारी दुपारी चार वाजता घडला.

गणेश भारत जाधव (वय ३८) असे तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी चारच्या सुमारास गणेश हा त्याच्या शेतातील खांबावर चढून विदयुत काम करत होता. त्यास अचानक विदयुत धक्का लागल्याने तो खांबावरून खाली पडला. यामुळे कमरेला मुकामार लागला. तर उजव्या हाताला जखम झाली असून पोटास भाजल्याने सोलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार करून शनिवारी रात्री २.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास भाऊ प्रदिप जाधव याने दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**भांडण सोडविण्यास गेल्याने जमावाकडून मारहाण**

घराशेजारी सुरू असलेले भांडण सोडविणे तरुणाला महागात पडले असून आठ जणांच्या जमावाकडून त्यास मारहाण करण्यात आली. हा प्रकार २ मार्च रोजी रात्री घडला. रमेश सर्जेराव मस्के (वय ३२,रा. माळखांबी ता. माळशिरस) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. २ मार्च रोजी रात्री ९ च्या सुमारास रमेशच्या घराशेजारी भांडण सुरू होते. ते भांडण सोडविण्यासाठी गेल्याने शामराव काळे व इतर सात जणांनी त्यालाच बदडले.लाकडाने मारल्याने डोक्याला जखम झाली. तेसच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने ७ मार्च रोजी रात्री १० वाजता तो स्वत: उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# महिलांनी शिक्षणाचा वारसा पुढे नेणे हे आपले कर्तव्य : फैय्याज शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

महानगरपालिका मुलींची मराठी शाळा क्र. २६ कॅम्प येथे आयोजित जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. महिलांनी शिक्षणाचा वारसा पुढे नेणे हे त्यांचे कर्तव्य असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे म्हणून फैय्याज शेख यांनी केले. त्यांनी मुलांना मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले जिजामाता, फातिमा शेख, इंदिरा गांधी, अहिल्याबाई होळकर इतर कर्तृत्ववान महिलांची माहिती देऊन महिलांचे महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रमात शाळेतील मुलींनी विविध वेशभूषा धारण केले होते. या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. महिला पालकांसाठी वेगवेगळ्या खेळाचे नियोजन करण्यात आले होते व पुरस्कार विजेत्या महिलांना बक्षीस देऊन सत्कार करण्यात आले. सूत्रसंचालन प्रतिभा पाटील यांनी तर प्रास्ताविक मुख्याध्यापिका गजाला शेख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती साळुंके, महादेवी कुंभार, शकुंतला माने, संगीता साळुंखे- घोडके यांनी परिश्रम घेतले. आभार शुभमंगला लोलु यांनी मानले.

# मनोहर सपाटे यांचेसह ६ जणांची निर्दोष मुक्तता

## मतदारांचे लाच प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

येथील मनोहर सपाटे (वय ६०, रा. दमाणी नगर, सोलापूर), ज्ञानेश्वर सपाटे (वय ४०, रा. मुरारजी पेठ, सोलापूर), कृष्णांत शिंदे (वय २५, रा. कासेगाव, सोलापूर), जगदीश भोसले (वय ४१, रा. मुरारजी पेठ, सोलापूर), दत्तात्रय गायकवाड (वय ४०, रा. अभिमानश्री नगर, सोलापूर), उमाकांत निकम (वय ६०, रा. देगाव रोड, सोलापूर) यांनी सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१२ दरम्यान मतदारसंघातील मतदारांना मतदान करण्याकरिता एक हजार रुपये व घड्याळ देण्याचे आमिष दाखविल्याचे गुन्ह्याकामी त्यांची प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती राधिणी जंगम यांनी निर्दोष मुक्तता केली.



यात हकीकत अशी की, सन २०१२ मध्ये सोलापूर महानगरपालिका अंतर्गत सार्वत्रिक निवडणूक जाहीर करण्यात आली होती. त्यावेळी मनोहर सपाटे हे प्रभाग क्रमांक ११ मध्ये राष्ट्रवादी पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवत होते. सदर वेळी आवसे वस्ती येथे मनोहर सपाटे व त्यांचे कार्यकर्ते तेथील लोकांना एक हजार रुपये व त्यांच्या पक्षाचे चिन्ह असलेले घड्याळ वाटप करत असल्याचा फोन शशिकांत साठे यांनी पोलिस नियंत्रण कक्षास केला. त्याप्रमाणे पोलिसांनी सदर ठिकाणी भेट दिली असता त्या ठिकाणी टाटा इंडिगो या गाडीमध्ये एका बॉक्समध्ये लेडीज मनगटी घड्याळ मिळून आले. अशा आशयाची फिर्यादी पोलीस निरीक्षक आप्पासाहेब शिवाजी पवार यांनी माजी महापौर मनोहर सपाटे व इतर पाच जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे दिली.

सदर गुन्ह्याचा तपास होऊन न्यायालयात वर नमुद आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी श्रीमती रागिणी जंगम यांचे कोर्टात झाली. सदरकामी सरकार पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांचे साक्षीतील विसंगती आणि राजकीय विरोधकांनी खोटा गुन्हा दाखल केला, सरकार पक्षाने खटला पुराव्यानिशी शाबित केला नाही असा आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सर्वांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपींतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. सागर पवार, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सिद्धाराम पाटील यांनी काम पाहिले.

# शेतीच्या कारणातून तरुणावर सत्तूरने हल्ला

**सोलापूर :** शेतीच्या कारणातून झालेल्या वादातून मोहोळमध्ये तरुणावर दोघांनी सत्तुरने हल्ला केला. हा प्रकार २ मार्च रोजी दुपारी घडला. सोमनाथ भिमराव चव्हाण (वय ३२, रा. मोहोळ ) असे जखमीचे नाव आहे. शेतीच्या बांधाच्या कारणावरून सोमनाथ आणि आनंद महादेव चव्हाण व शुभम आनंद चव्हाण यांच्यात वाद आहे. त्याच कारणावरून २ मार्च रोजी आनंद आणि शुभम यांनी सोमनाथवर हल्ला केला. या हल्ल्यात सोमनाथच्या डोक्याला जखम झाली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागला. सरकारी रुग्णालय मोहोळ येथे उपचार करून शुक्रवार ७ मार्च रोजी तो स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




# वीरमातांचा सन्मान म्हणजे देशाच्या मातीचा सन्मान : देवेंद्र औटी

**सोलापूर, दि. ९ मार्च-**

वीरमातांचा गौरव करणे म्हणजे त्यागदेवतेचा गौरव करण्यासारखे आहे हे मानवतावादी कार्य सैनिक संघटनेचे अध्यक्ष मा. अरुणकुमार तळीखेडे महिला दिन निमित्ताने करीत आहेत, असे प्रशंसोद्गार प्रमुख अतिथी ज्येष्ठ कविवर्य देवेंद्र औटी यांनी काढले. माजी सैनिक संघटनेचे वतीने माजी सैनिक कार्यालय विजापूर रोड येथे महिला दिनानिमित्त आयोजित वीरमाता, वीरपत्नींचा सन्मान यथोचित भेटवस्तु देऊन करण्यात आला. प्रास्ताविक अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे यांनी केले. यावेळी क्याप्टन पानसे, कर्नल उपेंद्र नायडु, कमांडर अशोककुमार, गुरुप्रीत कौर, वीरपत्नी साजीया शेख, शिवपुत्र घटकांबळे, सुषमा माने, कौशल्या पराशरयांचे सह समस्त माजी सैनिक व भगिनी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (७४) मै नही तू ही

एकदा धर्मयुगच्या संपादकांनी अनेक गणमान्य व्यक्तींना अपने 'जीवन का ध्येय' या विषयावर लिखाण मागितले. कोणी एक पान कोणी दोन तीन चार पाने लिहून पाठवली. पण गुरुजींनी आपल्या जीवनाचे ध्येय लिहिले होते मै नही तू ही यातील तू चा अर्थ आहे, संघ समाज ईश्वर गुरुजी या तिघांना तू मध्ये एकरूप करतच पुढचे पाऊल टाकायचे गुरुजी तिघांची सेवा करत होते. या तू मध्ये विसंगती नव्हती, विरोध नव्हता, एकही साधे सब सधे; या उक्तीप्रमाणे संघाची साधना, संपूर्ण समाज व राष्ट्राची साधना ईश्वरीय कार्य आहे असे ते व्रतधारी होते. गुरुजी म्हणत डॉक्टरांनी एकमात्र संघाच्या वटवृक्षाचे बीज पेरले आहे. आता उत्तम साधना करून सर्वांनी मिळून या वटवृक्षाला पाने-फांद्या- फुल आणि फळ याचा बहर आणू या. 'मै नही तू ही' असे ध्येय ही त्यांची जीवनश्रद्धा होती. भारत मातेची भक्तीमय सेवा, गुरुजींच्या मनात पूर्ण समर्पण भावानी आलोकित होती. ३३ वर्षाचे अखंडित तपस्वी जीवन, मातृभूमीच्या कल्याणासाठी स्वयंसेवक बनून राहण्याची दृढ इच्छा, आणि ही इच्छा परिपूर्ण करण्यासाठी अखंड प्रयास गुरुजी करत होते. श्री गुरुजी एक व्यक्ती नव्हते तर व्यक्तित्व होते. ते मानवतेचा दृष्टिकोन होते. त्यांनी हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हा मूलमंत्र भारतालाच नव्हे तर जगाला दिला. आज प्रत्येकाच्या हृदयात लोकमान्य स्वातंत्र्यवीर नेताजी या उपाधी प्रमाणेच गुरुजी हे नाव विराजमान आहे.

**- क्रमश:**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महिला दिनाचा उत्साह




### प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठान, रावगांव

रावगांव (ता. करमाळा) येथे प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला तीन साजरा करण्यात आला यावेळी राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन जि. प . प्रा. शाळेतील शिक्षिका रोहिणी चव्हाण-बरडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्या प्रियंका कांबळे, प्रतिष्ठानच्या सचिवा शितल कांबळे, रोहिणी चव्हाण-बरडे, विद्या गंभीर-शिंदे, कोमल काळुंखे, पल्लवी पवार, द्रौपदी जाधव, दिपाली कांबळे, शोभा पवार उपस्थित होते.



### फकीरा दल, अक्कलकोट

माणिक पेठ येथे फकीरा दलाच्या वतीने महिलांचा सन्मान व महिला विषयक कायदे बाबत जनजागृती करून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम स्वराज्य जननी जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई, त्यागमूर्ती माता रमाई,फातिमाबी शेख, मुक्ताई साळवे या सर्व महानायीका यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शिका बार असोसिएशनचे अध्यक्ष के. एस. हल्ले यांनी महिला विषयक कायद्यासंदर्भात सविस्तर माहिती देत महिलांचे समुपदेशन केले. यावेळी पार्वती पारखे, अनिता डांगे, सविता कसबे, सुनिता शिंगे, पिराबाई हादिमनी, रत्नाबाई लोखंडे, मापवा शिंगे, निवृत्तीजी पारखे, सुरेश सोनकांबळे, अंबादास शिंगे, हर्षवर्धन देडे, आरती पारखे कामिनी कांबळे, शुभांगी वाघमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार आयोजक ज्योतिबा पारखे यांनी मानले.



### लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था, करकंब

लोकमंगल समृद्ध ग्राम अभियाना अंतर्गत लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था शाखा करकंब यांचेवतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या धनश्री नागन्नाथ शेटे अंगणवाडी सेविका, स्नेहल सुनील थोरात आरोग्य मित्र, सोनिया थोरात एसटी कार्यशाळा लिपीक पंढरपूर आगार, वैशाली शिंदे कनिष्ठ सहाय्यक यांना भेट वस्तू व संस्थेचा अहवाल देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था करकंबच्या विविध प्रकारच्या ठेव योजनांबद्दल अंकिता खोटे व भाग्यश्री वायकसकर यांनी माहिती सांगितली. यावेळी करकंब शाखेच्या सल्लागार अनघा कुरुलकर उपस्थित होते.



### तालुका विधीज्ञ संघ, पंचायत समिती, अक्कलकोट

जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण बाबत, हुंडा प्रतिबंधक कायदा बाबत, बालविवाह प्रतिबंधक कायदा बाबत, बेटी बचाव बेटी पढाओ, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण आदी विषय बाबत मार्गदर्शन करून महिलांची विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश एम.एम. कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थिती तालुका विधी सेवा समिती, तालुका विधीज्ञ संघ आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती येथे घेण्यात आला. यावेळी सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती एन.ए.एल. शेख, गट विकास अधिकारी शंकर कवितके, अध्यक्ष, तालुका विधीज्ञ संघ ॲड के.एस. हल्ले, सहाय्यक सरकारी अभियोक्ता सरवदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.आर. कांबळे, तालुका विधीज्ञ संघ सचिव ड.सौ.एस.डी.बाके, तालुका विधीज्ञ संघ सदस्य, ॲड. पी.ए. पाटील आदी मान्यवर मार्गदर्शन केले. यावेळी अक्कलकोट न्यायालयाचे सहा.अधिक्षक श्रीमती पठाण व किशोर रणदिवे तसेच इतर न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते. आभार यांनी तालुका विधीज्ञ संघ सदस्य ॲड. पी.एम. मोरडे (उडचण) यांनी मानले. कार्यक्रमास ॲड. व्ही. बी. पाटील, उपस्थित होते.सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणे कामी पंचायत समितीचे गट विस्तार अधिकारी संजय पाटील, न्यायालयीन कर्मचारी मुळे, किणगी, कुंभार यांचे सहकार्य लाभले.

### जि.प. शाळा वागदरी, अणदूर

महाराष्ट्र पोलीस प्राधिकरण समिती सदस्य उमाकांत मिटकर यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध पदांवर कार्यरत असलेल्या महिलांचा सत्कार व वयोवृद्ध विधवा महिलांना चादरी व खाऊचे वाटप उमाकांत मिटकरी यांच्यावतीने करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मेरीट विद्यार्थ्यांना ताट, वाटी अशी भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या त्यामधे उमाकांत मिटकर, सरपंच तेजाबाई मिटकर एस.के.गायकवाड, भाजपा तालुका उपाध्यक्ष किशोर सुरवसे.आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जेष्ठ नागरिक शिवाजी राव मिटकर, किशोर सुरवसे,एस.के.गायकवाड, किशोर धुमाळ, रामसिंग परीहार, दत्तात्रय सुरवसे, भालचंद्र यादव उपस्थित होते. सूत्रसंचलन लोहार गुरुजी यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका जत्ते यांनी मानले.

# जळोली येथे पावणे सहा लाखांचा गांजा जप्त

## आरोपी राजेंद्र नरसाळे यास अटक

### करकंब पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ९ मार्च-**

करकंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय बातमीदारांकडून पोलीस हवालदार आर.आर.जाधव व संदेश शिकतोडे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार जळोली ता.पंढरपूर या गावच्या शिवारामध्ये राजेंद्र रामराव नरसाळे रा.जळोली ता.पंढरपूर याने गांज्याचा अवैध बेकायदेशीर साठा केलेला आहे असे समजल्यानंतर करकंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांनी डॉ.अर्जुन भोसले उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर उमाकांत पटवारी नेमणूक श्री.विठ्ठल मंदिर सुरक्षा शाखा पंढरपूर यांचेसोबत पोलीस पथकाने सकाळी छापा टाकून कारवाई केली असता आरोपीकडे एकूण ५,६५,६४० रुपये किमतीचा एकूण २८.२८२ किलोग्रॅम वजनाची गांजा वनस्पतीची पाने,फुले,बोंडे असा मुद्देमाल आरोपी राजेंद्र शामराव नरसाळे याचे राहत्या घरी मिळून आला.सदर प्रकरणी आरोपी राजेंद्र रामराव नरसाळे, रा.जळोली याचेवर गुंगीकारक औषधे द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५चे कलम८(क),२०(ब)३(क) प्रमाणे सरकारतर्फे पोलीस हवालदार आर.आर.जाधव यांनी तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.आरोपीस अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे. मा.पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग डॉ.अर्जुन भोसले यांचे मार्गदर्शनाखाली सदरची कारवाई करण्यात आली.

सदर कारवाईबाबत सपोनी सागर कुंजीर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आर. आर.जाधव यांनी फिर्याद दिली असून सदर कारवाईमध्ये डॉ. अर्जुन भोसले उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर उमाकांत पटवारी नेमणूक श्री.विठ्ठल मंदिर सुरक्षा शाखा पंढरपूर,सपोनी सागर कुंजीर,पोहकाँ जाधव,पोहवा राजकर,पोहवा घोळवे, पोहवा भोसले,पोहवा शिकतोडे, पोहवा सावंत,पोकाँ ननवरे, सपोकाँ गात, सपोहवा ननवरे,सह होम शिंदे यांनी केली आहे.पुढील तपास पोउनि निलेश गायकवाड हे करीत आहेत.




> १५ दिवसांपूर्वीच भोसे येथे दुधामध्ये भेसळ करणाऱ्यांवर पोलीस,अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या संयुक्त कारवाईत एकूण सुमारे १७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमात जप्त केला होता.१५ दिवसातच करकंब पोलीस स्टेशनने मोठ्या किमतीचा गांजा जप्त ही दुसरी मोठी कारवाई केली आहे. दूध भेसळ प्रकरणातील मुख्य आरोपी दत्तात्रेय जाधव फरार असून त्यास लवकरच अटक करण्यात येईल.
>
> **- सपोनि सागर कुंजीर, करकंब पोलीस ठाणे.**

# उमरड जिल्हा परिषद शाळेच्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांची धमाल

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.८ मार्च**

उमरड ता.करमाळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनात विविध गाण्यात विद्यार्थ्यांनी धमाल उडवून दिली.

या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन मकाई कारखान्याचे संचालक बापूराव चोरमले व पोलिस पाटील अंकुश कोठावळे यांनी केले तर रंगमचाचे उदघाटन शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष संजय कोठावळे यांनी केले. रंगमंचावर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सर्व शालेय महिला प्रतिनिधी यांनी केले.या कार्यक्रमासाठी रंगमंचावर शालेय समितीचे उपाध्यक्ष रवींद्र गिरी,सदस्य चांगदेव चौधरी, राहुल बदे,चांगदेव कोठावळे, जनार्दन मरकड, इंद्रजित बदे,उपसरपंच समाधान वलटे,अनिल वलटे,श्रीकांत मारकड, सरपंच प्रमोद बदे, प्रा. नंदकिशोर वलटे, मुख्याध्यापक अमृळे गुरुजी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध विषयांवर झालेल्या गीतांनी उपस्थित ग्रामस्थांची मने जिंकली.यात देशभक्तीपर गीते, गोंधळ गीत,कव्वाली, पोतराज गीत यांनी ग्रामस्थांची मने जिंकली.तर शेतकरी गीताने शेतकऱ्यांची व्यथा मांडली. लावणींनीच्या ठेक्याने सर्व रसिकांना थिरकायला लावले. शेवटच्या विनोदी नाटिकेने सर्वांना खळखळून हसवले.




या स्नेहसमेलनास सदिच्छा भेट देण्यासाठी तालुकास्तरीय शिक्षण विभागाचे अनेक मान्यवर उपस्थित होते. या खास कार्यक्रमाच्या नियोजना बद्दल गावकऱ्यांनी सर्व शिक्षकांनाचा जाहीर सत्कार केला. इयत्ता चौथी पर्यंतच्या या छोटया कलाकारांसाठी गावकऱ्यांनी खूप बक्षिसे दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यादव गुरुजी यांनी केले.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटनांच्यावतीने महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कर्तृत्ववान, गुणवंत महिला, विद्यार्थीनींना सन्मानित करण्यात आले. महिला दिनानिमित्त ठिकठिकाणी विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

### शंकरराव निंबाळकर विद्यालय, बार्शी




शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे आज दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन तसेच संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या पत्नी स्वर्गीय लक्ष्मीबाई जगदाळे यांची जयंती देखील साजरी करण्यात आली. सर्वप्रथम या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपक गुंड व प्रमुख व्याख्याता म्हणून श्रीमती माळी जे.जी. व इतर शिक्षक कर्मचारी यांच्या हस्ते कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच स्वर्गीय लक्ष्मीबाई जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख गायकवाड जे.पी. यांनी केले. यानंतर अध्यापक विद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी अक्षता शिंदे, कुमारी रोहिणी मारडकर व आदित्य देशमुख यांनी या दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व याप्रसंगी सांगितले.

यानंतर प्रमुख व्याख्याता श्रीमती डॉ. माळी यांनी जागतिक महिला दिनानिमित्त अनेक कर्तृत्ववान महिलांचा उल्लेख करुन त्यांच्यापासून आपण प्रेरणा घ्यावी असे सांगितले. त्यांनी ऑलिम्पिक सुवर्ण पदक विजेती मनु भाकर या महिला खेळाडूचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले. आपल्या अध्यक्ष समारोप भाषणात प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी केले. अध्यापक विद्यालयातील मुलीदेखील या स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होत आहेत. आभार वैष्णवी शिराळकर यांनी मांडले व कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. सूत्रसंचालन प्रा. गायकवाड जे.पी. यांनी केले.



### जेऊर ग्रामपंचायत, आ.नारायण पाटील मित्रमंडळ, करमाळा

जागतिक महिला दिनानिमित्त जेऊर ग्रामपंचायत आणि आमदार नारायण आबा पाटील मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात गेले आठवडाभर महिलांसाठी विविध स्पर्धा तसेच आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबीरे आयोजित करण्यात आली होती. विविध स्पर्धामधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योती पाटील होत्या तर यावेळी व्यासपीठावर ग्रामपंचायत सदस्या समीरा दोशी, प्रियांका निर्मळ, सुलभा घाडगे, रोहिणी सुतार, परवीन नदाफ, अनिता जगताप, भोसले, ताहिरा शेख, जनाबाई कांबळे, येवले वहिनी, रत्नमाला बादल, उषा सरक, वैशाली शिंगाडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रियांका पाटील यांनी सुरेल गायन केले तर कृष्णाई मोटे हिने कविता सादर केली. यावेळी ज्योती पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक रोहिणी सुतार यांनी केले तर आभार संयोजिका समृध्दी कुलकर्णी यांनी मानले.





### मौजे उमरगे, अक्कलकोट

बालविवाह पदती रोखली पाहिजे व पतीचे निधना नंतर महिलांना एखाद्या कार्यक्रमात लांब बसवणे कुंकवाचा मान न देणे अश्या अनेक प्रकारे अपमानित करणे टाळा व मुलीचा जन्मदर वाढविण्यासाठी प्रयत्न करा. महिला सुक्षेसाठी उपाययोजना करण्याची प्रतिपादन जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उपशिक्षिका श्रीमती विजयलक्ष्मी माचल यांनी केल्या. मौजे उमरगे येथे ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला उपस्थित सर्व महिला पालकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. याप्रसंगी माचल बोलत होत्या. यावेळी बॉक्स मध्ये चेंडू टाकणे मध्ये सरस्वती संजय बिराजदार प्रथम क्रमांक पटकावल्या. ११० दोरी उडीमध्ये गुरुबाई वागदरी प्रथम क्रमांक पटकावल्या. उमरगे महिला सरपंच निर्मला नगेश बिराजदार यांच्यामार्फत सर्व विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

### लिटल बर्ड स्कूल, करकंब

कोल्हापूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय शालेय योगा स्पर्धेत करकंब ता.पंढरपूर येथील विद्यार्थिनी अमृता सरगुले हिने वैयक्तिक व सांघिक अशा दोन्ही प्रकारांमध्ये राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. सोलापूर जिल्ह्यातून एकाच स्पर्धेत दोन प्रकारची पदके मिळवणारी ती एकमेव विद्यार्थिनी आहे. ५ ते ६ जानेवारी रोजी पार पडलेल्या अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लिग स्पर्धेतही निवडक ३० स्पर्धकांमधून तिने ८ वा क्रमांक प्राप्त केला होता. करकंबसारख्या ग्रामीण भागातून शिक्षण घेत तिने मिळवलेल्या या सुवर्णपदकांबद्दल महिला दिनाच्या निमित्ताने लिटल बर्ड्स स्कूल करकंबच्यावतीने तिचा निलोफर कडगे यांच्या हस्ते तसेच तिचे प्रशिक्षक तथा युगंधर आखाड्याचे संचालक राजू अनवते यांचाही शिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महिला दिनानिमित्त प्राची राजपुरोहित या विद्यार्थिनीने पत्रकारिता अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्याबद्दल लिटल बर्ड स्कूलच्यावतीने तिचा सत्कार करण्यात आला.



### दुधनी जि.प. शाळा

तालुक्यातील दुधनी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळेत महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती कावेरी झळकी हे होती. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला उपस्थित सर्व महिला पालकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण,व दीप प्रज्वलन करुन कार्यक्रम मुलांच्या स्वागत गीतांने कार्यक्रम सुरुवात केली. याप्रसंगी मल्लमा मोडलकर, कोगनूर, अल्लापूर, आळंद, बिल्लाड, सिन्नूर, शेख या आदर्श महिलांच्या सन्मान शाळेच्या वतीने करण्यात आला. यावेळी १९९६-९७ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेला एचपी कंपनीचा प्रिंटर व स्कॅनर भेट दिली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, उपाध्यक्ष हनुमंत कलशेट्टी, शिक्षण तज्ञ तथा रिपाइं सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,समिती सदस्य मिहीदीमियाँ जिडगे, श्रीशैल चिंचोली, शिक्षक सुशांत गद्दी, शंकर कुंभार, चन्नू हावशेट्टी, शिवलिंग झळकी, शिक्षिका अंजली गुंजोटे, सुहास पवार, पोमू राठोड, संजीवकुमार बेंनिसूर, रविकुमार कोरचगाव उपस्थित होते.

### सिद्धनाथ बहुउद्देशीय संस्था, सांगोला

सांगोला तालुक्यातील सिद्धनाथ बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने संस्थेचा पाचवा वर्धापनदिन, जागतिक महिला दिन, मान्यवरांचा सन्मान सोहळा व वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण बाळासाहेब देसाई विद्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. आनंदराव बाबर, सिंधू बाबर, डॉ. वामन चांडवले, शहाजी बाबर, प्रा.के.डी.बाबर, पुनम सावंत, चांदभैय्या शेख, एल.बी.केंगार, सतीशभाऊ सावंत, रविराज शेटे, सीतादेवी पाटील, सुदर्शना बाबर, वंदना डोंगरे, डॉ.प्रतिभा बाबर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ.क्षितिजा डोंगरे, पूनम जवंजाळ, सुनिता बाबर, वनिता बाबर, आप्पासाहेब केंगार, रघुनाथ बाबर, शशिकांत कोळी, सुनील पवार यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमासाठी बाळासाहेब यादव, रामचंद्र केंगार, डॉ. नवनाथ बाबर, अजिततात्या बाबर, बलभीम बाबर, बजरंग बाबर, अनिल चौगुले, लक्ष्मण चौगुले, सिद्धनाथ गुरव, अजित बाबर, राजश्री चांडवले, स्वाती बाबर, पार्वती केंगार, अलका सूर्यवंशी, सविता चौगुले, मनीषा खळगे, सविता बाबर, ताई जावीर, विजया मेखले, उषाताई बंडगर, लक्ष्मी माळी, अर्चना दीक्षित, शोभा बाबर, सुवर्णा पवार, सुमन तोरणे, वैशाली जरग, सीता लाडे उपस्थित होते. सूत्रसंचालन जनार्दन बाबर यांनी केले. दशरथ बाबर यांनी आभार मानले.




> **वक्तृत्व स्पर्धेतील विजेते-**
> लहान गट- प्रथम-श्रावणी पाटील, द्वितीय तेजस्विनी बाबर, तृतीय सृष्टी वराडे, तेजस्विनी बाबर, मोठा गट- प्रथम अमृता बाबर, द्वितीय तृप्ती खरात, तृतीय सिद्धी बाबर.

### पंढरपूर शहर पोलीस ठाणे

येथील पोलीस संकुलात महिला दिनाचे औचित्य साधून खास महिलांसाठी कार्यक्रम आयोजित केला होता त्या अनुशंगाने या कार्यक्रमात महिलांविषयक नवीन कायद्यांची माहिती देण्यात आली तसेच महिला व विदयार्थिनींना सेल्फ डिफेन्सचे प्रात्यक्षिके दाखवून स्वतःचा बचाव कसा करावा याबददल माहिती देण्यात आली. या बरोबरच मावळा ॲकॅडमी व युनिक ॲकेडमी, रणझुंजार ॲकेडमीतील विदयार्थिनींचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन दिले. ३०० ते ३५० महिला, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम सहा. पोलीस अधिक्षक श्रीमती अंजना कृष्णा यांच्या प्रमुख उपस्थितीत व उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन भोसले व वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस ठाणेकडील मपोसई मोनिका खडके पाटील, सुप्रिया रावण, निर्भया पथकाचे सपोनि विभावरी रेळेकर यांनी यशस्वी पार पाडला.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आश्लेषा बागडे यशवंत श्री पुरस्काराने होणार सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.९ मार्च**

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची विद्यार्थिनी आश्लेषा बागडे हिने कुस्ती स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या दृष्टिकोनातून ही अतिशय आनंददायी गोष्ट आहे, आश्लेषा हिस यशवंत श्री पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विद्या विकास मंडळाचे सचिव विलासरावजी घुमरे सर यांच्या संकल्पनेतून यावर्षीपासून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा यशवंत श्री पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह, मानपत्र, ५१,००० रुपये असे आहे.

सदर पुरस्कार वितरण सोहळा १२ मार्च २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी होणार आहे. विलासराव घुमरे सर यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा विजयश्री सभागृहात सकाळी १०.०० वा संपन्न होणार आहे असे विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील यांनी माहिती दिली



## संक्षिप्त वृत्त...



### नादब्रह्म कला फाऊंडेशनतर्फे पाणपोई

**करकंब, दि. ९ मार्च-**

करकंब (ता. पंढरपूर) येथील नादब्रह्म कला फाऊंडेशन व दुधाणे परिवाराच्या वतीने आई-वडीलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. येथील गणेश दुधाणे, ज्ञानेश्वर दुधाणे व परिवारातर्फे दरवर्षी यांच्या वतीने आई कै. पुष्पा दूधाणे व वडील कै. नारायण दुधाणे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पाणपोईची सोय केली जाते. याचे उदघाटन नुकतेच हभप सुदाम महाराज पिसे, शिक्षक दत्तात्रय खंदारे, अनिता बहेनजी, देवकी दुधाणे, गणेश दुधाणे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्ञानेश्वर दुधाणे, राहुल पुरवत, मारुती देशमुख, श्रेणिक शहा, तानाजी नरसाळे, दिलीप व्यवहारे, महेंद्र पवार, देविदास काटवटे, संजय दुधाणे, महादेव दुधाणे, संजय सांगोलकर, विश्वजीत शिंदे, विजय जाधव उपस्थित होते. पाणपोईसाठी सुदर्शन दुधाणे यांचे विशेष सहकार्य लाभले.



### स्वामी दर्शनासह भाविकांनी महेश इंगळेंच्या कार्याचीही प्रेरणा घ्यावी : लक्ष्मणराव ढोबळे

**अक्कलकोट, दि. ९ मार्च-**

मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी जोपासलेल्या परमार्थिक व समर्पित जीवन कार्याची प्रेरणा सर्वांनी घ्यावी असे प्रतिपादन माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी केले. त्यांनी नुकतीच श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट दिली व श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मंदिर समितीच्या वतीने चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी प्रा. ढोबळे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा, देऊन सन्मान केला. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, विपुल जाधव, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी दिलीप चव्हाण, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ उपस्थित होते.



### कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात महिलांसाठी ज्वेलरी मेकिंग कार्यशाळा संपन्न

**पंढरपूर,दि.९ मार्च -**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ॲक्सलरेट द ॲक्शन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. रुसा कंपोनंट आठ अंतर्गत महिला सक्षमीकरण कक्ष आणि लैंगिक छळ प्रतिबंधक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. कार्यशाळेचे उद्घाटन आदर्श विद्यालय, पंढरपूर येथील डॉ. मैत्रेयी केसकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनन्या क्रिएशनच्या अश्विनी डोंबे होत्या. यावेळी डॉ. केसकर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण सौ. डोंबे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील महिला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सफाई कामगार महिलांचा डायरी, पेन आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. तसेच महिलांसाठी ज्वेलरी मेकिंग वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये मोत्याची नथ बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रास्ताविक डॉ. नेहा देसाई यांनी केले. स्वागत व पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल डॉ. विनया पाटील यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे आणि डॉ. भारती सुडके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला सक्षमीकरण कक्ष व लैंगिक छळ प्रतिबंधक समितीने विशेष परिश्रम घेतले. आभार डॉ. शिल्पा पवार यांनी मानले.



### वाघमारे हिची इन्स्पायर अवार्डसाठी निवड

**पिलीव, दि. ९ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाची इयत्ता नववी मधील श्रृती सिध्दीविनायक वाघमारे हिची २०२४-२५ साठी इन्सपायर ॲवार्डसाठी निवड झाली आहे. तिला याबद्दल दहा हजार रुपयाचे पारीतोषिक मिळाले आहे. श्रुती वाघमारेच्या या यशाबददल मुख्याध्यापक शिवाजी कापसे, पर्यवेक्षक मोरे, माळी, विभागप्रमुख अतुल पाटील, एन.व्ही.माने यांनी अभिनंदन केले.

## चक्क स्मशानभूमीत साजरा केला महिला दिन

### अनुराधा उप्पेवाड यांचा वारी परिवाराने केला सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.९ मार्च -**

देशभरात ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात व वेगवेगळ्या उपक्रमाने साजरा होतो. मंगळवेढ्यातील वारी परिवाराने मात्र यंदा रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांना फाटा देत स्मशानभूमीत मृतदेहाची सेवा करणाऱ्या अनुराधा उप्पेवाड यांचा सन्मान चक्क स्मशानभूमीत करत अनोख्या पद्धतीने महिलादिन साजरा केला.

उच्च शिक्षित असूनही मंगळवेढ्याच्या स्मशानभूमीत आपल्या पतीबरोबर तितक्याच धाडसाने संसार करणाऱ्या व अंत्यविधीची सेवा ही इश्वरसेवाच आहे असे मानणाऱ्या अनुराधा शिवराज उप्पेवाड यांचा वारी परिवाराच्या वतीने सुवर्णा मुळीक यांच्या हस्ते साडी, चोळी, फेटा, सन्मानचिन्ह, मिठाई व पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला. सासरे सुभाष उप्पेवाड,पती शिवराज उप्पेवाड, गोरक्ष गायकवाड,विलासराव आवताडे, प्रकाश मुळीक , रामचंद्र दत्तू, बाळासाहेब जाधव, मदन पाटील, पांडुरंग नागणे, रविकिरण जाधव, रतिलाल दत्तू, चंद्रकांत चेळेकर, प्रफुल्ल सोमदळे, अजय आदाटे, स्वप्निल टेकाळे, सिद्धेश्वर डोंगरे, विजय हजारे, अरुण गुंगे, सतिश दत्तू आदी सदस्य उपस्थित होते, प्रकाश मुळीक यांनीही स्त्री शक्तीचा जागर घालीत उप्पेवाड कुटुंबाचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याचे सांगितले. प्रास्तविक प्रा. विनायक कलुबर्मे यांनी केले

यावेळी अनुराधाताईनीं सांगितले की, स्मशानातील अंत्यविधीचे काम सुद्धा एक प्रकारची ईश्वरसेवाच आहे स्मशानात आलेल्या मृतदेहाची भीती वाटत नाही. मोठया बंगल्यातच संसार होतो असे नाही तर स्मशानभूमीत सुद्धा संसाराचा गाडा चालवीता येतो. त्यासाठी एकमेकांना समजून घेणे आवश्यक असते. आत्तापर्यंत असा माझा सन्मान कोणी केला नव्हता उलट आमच्या कामाची दखल घेऊन महिला दिनानिमित्त एका महिलेचा सन्मान तोही स्मशानभूमीत येऊन केल्याबद्दल वारी परिवाराचे त्यांनी आभार मानले. आपल्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहून सेवा करते. स्मशानभूमीची स्वच्छता ठेवण्यात समाधान मानते असेही त्यांनी सांगितले.

आपल्या आजूबाजूला अशा ब-याच महिला आहेत ज्या प्रसिद्धीपासून दूर असतात. मात्र त्यांचे कामा मोठे असते. त्यांच्याकडून शिकण्यासारखं बरच काही असते. हेच ओळखून वारी परिवाराने स्मशानजोगी म्हणून काम करणाऱ्या अनुराधा उप्पेवाड यांचा गौरव करून खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा केला. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी प्रकाश मुळीक यांनीही स्त्री शक्तीचा जागर घालीत उप्पेवाड कुटुंबाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे असे सांगत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी सासरे सुभाष उप्पेवाड,पती शिवराज उप्पेवाड, गोरक्ष गायकवाड,विलासराव आवताडे,रामचंद्र दत्तू,बाळासाहेब जाधव,मदन पाटील,पांडुरंग नागणे,रविकिरण जाधव,रतिलाल दत्तू,चंद्रकांत चेळेकर, प्रफुल्ल सोमदळे, अजय आदाटे, स्वप्निल टेकाळे सिद्धेश्वर डोंगरे,विजय हजारे, अरुण गुंगे,सतिश दत्तू आदी सदस्य उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. विनायक कलुबर्मे यांनी केले.

## आमदार अभिजीत पाटील शब्दाचे पक्के शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळणार

### उसाच्या दरावरून झालेल्या आरोपाला संचालक प्रा. मस्के यांचे प्रत्युत्तर



**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दिनांक ९ मार्च -**

क्षमता नसणाऱ्यांनी आमदार अभिजीत पाटील यांच्या कार्यशैलीवर आरोप करू नये आमदार अभिजीत पाटील शब्दाचे पक्के आहेत. ते शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळणार असे मत विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रा. तुकाराम मस्के यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

शिवसेना तालुकाप्रमुख मुन्ना साठे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति टन ३ हजार ५०० रुपये भाव देतो म्हणून फसवणूक केल्या संदर्भात आ.अभिजीत पाटील यांच्याबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. त्याला प्रा. मस्के यांनी उत्तर दिले आहे.

पुढे ते म्हणाले की विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा बंद पडलेला साखर कारखाना होता. त्याला आमदार अभिजीत पाटील यांनी निवडणुकीच्या माध्यमातून जिंकून पहिल्या वर्षी शेतकऱ्यांना २ हजार ५०० रुपये भाव दिला व दुसऱ्या वर्षी ३ हजार भाव दिला तसेच या आधीच्या संचालक मंडळानी शेतकरी व वाहन धारकाचे जवळपास ३० कोटी रुपये थकवलेले होते ते देखील आमदार पाटील यांनी देऊ केले आहे. यावर्षी देखील आमदार पाटील यांनी जाहीर केल्याप्रमाणे ३१ जानेवारी पर्यंत गाळप झालेल्या ऊसाला २ हजार ८०३ रुपये भाव शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केलेला आहे. तसेच कारखाना फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत चालू होता. त्यावेळेस गाळप झालेल्या उसाचे बील काही प्रमाणात जमा करण्याचे काम चालू आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या परंपरेप्रमाणे जाहीर केलेल्या ऊसदराची रक्कम साधारण चार हप्त्यात जमा होते. त्याप्रमाणे जाहीर केलेली संपूर्ण रक्कम जमा होणार आहे. आमदार पाटील यांच्या कार्यशैलीवर क्षमता नसणाऱ्यांनी उगाच बिनबुडाचे आरोप करून विनोदी भाषा करु नये तसेच चांगल्या होत असलेल्या कामाला खोडा घालण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे. ज्यांनी आरोप केले आहेत त्यांनी आपला ऊस कोणत्या कारखान्याला दिला आहे आणि त्या कारखान्याने त्यांना किती भाव दिला आहे ते तपासून पाहावे म्हणजे त्यांना खरं आणि खोटं यातील फरक जाणवेल असेही सांगितले. या पत्रकार परिषदेला प्रा. तुकाराम मस्के शंभू साठे आबा साठे ऋषिकेश तांबिले आदी जण उपस्थित होते.

### आमसभेवर केलेल्या आरोपाला उत्तर

एवढा नवखा आमदार असताना पहिल्या अधिवेशनात ५० प्रश्न उपस्थित केले. सोलापूर जिल्ह्याच्या दृष्टीक्षेपा मध्ये आमदार अभिजीत पाटील हे नेतृत्व येत असताना परंपरागत प्रस्थापित लोकांना हे नेतृत्व आड येतंय की काय अशा प्रकारची शंका यायला लागल्याने त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत, अकरा तास आमसभा घेऊन रेकॉर्ड ब्रेक केले आहे त्यात सामान्य माणसाचे प्रश्न आले. त्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी अधिकारी व सामान्य जनता यातील दुवा होत असल्याने ती पद्धत त्यांना कदाचित रुजत नसेल म्हणून कुठल्यातरी सुपारी किंगने उठायचं आणि काहीतरी मत व्यक्त करायचं, मत व्यक्त करताना त्यातील सत्यता काय आहे पडताळून न पाहता असे चांगले काम करणाऱ्या वर आरोप करायचे हे योग्य नाही, असेही संचालक मस्के यांनी सांगितले.

## महिलांना सक्षम बनविणारा कुंभारी येथील गणेश स्वयंसहाय्यता समूह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च,**

कुंभारी गावातील शाहीन नदाफ, कल्पना वाडे, सुजाता जडगे, अनिता भोरगुंडे व लक्ष्मी बिराजदार यांनी २०१८ मध्ये गणेश स्वयंसहायता समूह गट नावाने बचत गट सुरू केला. शंभर रुपये बचतीवर सुरू झालेली गटाची उलाढाल वाढल्यानंतर व्यवसायांसाठी भांडवलाची आवश्यकता होती. गटातील महिलांनी मानव संसाधन व्यक्ती तनुजा जवळे व निर्मला जवळे यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामध्ये या गटाची नोंदणी केली. त्यानंतर त्यांनी महिलांना प्रशिक्षण देऊन आत्मविश्वास निर्माण केला.

महिलांनी भाजीपाला, बांगडी विक्री, कापड विक्रीचा व्यवसाय सुरू केला. महिलांचा आत्मविश्वास वाढल्याने सध्या कुंभारी गावात वेफर्स बनविण्याचे मशीन, मिरची कांडप यंत्र, पिठाची गिरणी आदी व्यवसाय करण्यासाठी ३० हजार रुपयाचा फिरता निधी मिळाला . त्यानंतर १ लाख रुपये कर्ज मिळाले. त्यानंतर ३ लाख , ५ लाखाचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. यावेळी दक्षिण तालुका व्यवस्थापक आरती शेख यांचे सहकार्य लाभले. या कर्जाची परतफेड केल्यानंतर दहा लाख रुपये कर्ज मंजूर झाले. बँक सखी सुलक्षणा बिराजदार यांचे त्यांना सहकार्य लाभले. या कर्जातून बचत गटाच्या महिला स्वतःचा व्यवसाय करून स्वयंपूर्ण बनत आहेत.

## मल्लिनाथ साखरे यांना पीएच.डी. पदवी

**अक्कलकोट दि. ९ मार्च-**

होळकर सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन या विद्याशाखेतून मल्लिनाथ शिवानंद साखरे यांनी पी. एच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. ए स्टडी ऑफ असेसमेंट ऑफ रूरल एन्त्रेप्रेनुरशिप थ्रु ग्रो टूरिज्म ईन सोलापुर डिस्ट्रिक्ट या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. प्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन कार्य पूर्ण केले. संगमेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. धनंजय माने, चेअरमन धर्मराज काडादी, सचिव प्रा.ज्योती काडादी, प्राचार्य ऋतुराज बुवा, प्रसाद कुंटे यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## ऐन उन्हाळ्यात मंगळवेढ्यात वीजेचा लपंडाव

### वीजपुरवठा सुरळीत नसल्याने संताप

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ मार्च-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात वीज वितरन कंपनी ग्राहकांना सुरळीत सेवा देण्यात अपयशी ठरत असल्याने वीजे अभावी ऐन उन्हाळ्यात नागरिकांच्या अंगातून घामाचे लोंढे वाहत असल्याने वीज वितरणच्या कारभाराबाबत नागरिकामधून संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान बारामती विभागाच्या अधिकार्यांनी लक्ष घालून येथील नागरिक व शेतीपंपांना सुरळीत वीज पुरवठा द्यावा अशी मागणी होत आहे.

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात आठवड्यातून बुधवारी कामकाजासाठी वीज बंद केली जाते. हा दिवस कामकाजाचा असल्याने नागरिकही वीज वितरण कंपनीला समजून घेत आहेत. मात्र आठवड्यातील इतर दिवशीही सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याने संताप व्यक्त होत आहे. सध्या पंखे,कुलरची नितांत गरज असते. सततच्या गायब होणाऱ्या वीजेचा परिणामही शासकीय कामकाजावर होत असल्याचे दिसून येत आहे. सध्या शासकीय कार्यालयात सर्वत्र संगणकीय कामकाज चालत असल्याने वीज गायब झाल्यानंतर कामकाजच ठप्प होत आहे. वीज वितरणच्या अधिकार्यांनी या सर्व घटनांचा विचार करुन सुरळीत वीजसेवा दयावी अन्यथा नागरिकांनी कार्यालयावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. ग्रामीण भागात शेती उद्योग मोठ्या प्रमाणात आहे. ब्रम्हपुरी ३३ केव्ही केंद्रात सातत्याने वीज गायब होत असल्याने पिकांना पाणी देणेही मुश्किल बनत आहेत. तेथील ऑपरेटर वारंवार मंगळवेढ्यावरुन वीज गेली आहे असा मेसेज टाकून शेतकर्यांची दिशाभूल करीत असल्याच्या शेतकर्यांच्या तक्रारी आहेत. काहीवेळा मंगळवेढ्यात वीज असतानाही चुकीचा मेसेज टाकला जात असल्याचे शेतकर्यांचे म्हणणे आहे.

बारामती विभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांनी मंगळवेढ्यात गांभीर्यपुर्वक लक्ष घालून येथील अधिकार्यांना वीज पुरवठा सुरळीत देण्याच्या सक्त सुचना कराव्यात, अन्यथा कर्तव्यात कुचराई करणार्या अधिकार्यावर निलंबनासारखी कारवाई करुन ग्राहकांना न्याय द्यावा, अशी मागणी पुढे येत आहे.

## कोणतीच भूमिका नसणारी माणसे घातक

### संत साहित्याचे अभ्यासक डॉ. संजय चौधरी

### डॉ. कुंताताई नारायण जगदाळे जीवनगौरव पुरस्काराचे वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मार्च**

सामाजिकस्तरावर अनेक माणसे एक विशिष्ट भूमिका घेऊन निर्भयपणे काम करताना दिसतात, आशा माणसांची दिशा पक्की असते. याउलट कोणतीच भूमिका न घेणारी भोवतालची माणसे ख-याअर्थाने घातक असतात, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. संजय चौधरी यांनी केले.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे बहुउद्देशीय संस्था आयोजित डॉ. कुन्तताई नारायण जगदाळे जीवनगौरव पुरस्काराचे वितरण डॉ. चौधरी यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. बी.वाय. यादव होते. व्यासपीठावर कामगार नेते प्रा. तानाजी ठोंबरे, संस्थेचे सहसचिव अरुण देबडवार, व्ही. एस. पाटील, प्राचार्य डॉ.ए.बी. शेख, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, प्राचार्य डॉ. दीपक गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

बार्शीत चांगले काम करणाऱ्या माणसांची खाण आहे, असे सांगून डॉ. चौधरी म्हणाले, असे चांगले काम करणा-यांना पुरस्कारा देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्याचा मोठेपणा संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे व त्यांच्या सर्व सहका-यांकडे आहे हे कौतुकास्पद आहे. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा उल्लेख केला. अध्यक्षीय भाषणात डॉ. यादव यांनी पुरस्कार विजेत्यांचे कौतुक केले. त्याचबरोबर कर्मवीरांचा विचार वारसा जपत संस्था कशी कार्यरत आहे याचाही आढावा घेतला. कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सुनील शेळके, हेमंतकुमार शिंदे यांच्यासह आदी उपस्थित होते. प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष सुरेश राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल क्षीरसागर यांनी केले, तर सतीश राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शशिकांत गोडगे, ॲड. काकासाहेब गुंड, श्रीपाद भंडारी, भरत खांडेकर, संतोष गुजरे, कल्याण तांबे, निलेश मोहिते, बलभीम माळी आदींनी परिश्रम घेतले.

### यांचा झाला गौरव

विजयकुमार जगदाळे (शैक्षणिक), डॉ. अमित पडवळ (वैद्यकीय), दत्तात्रेय गोसावी (साहित्य), श्रीकांत गणगले ( उद्योजक), मंगेश बागूल (कृषी), विठ्ठल काळे (कला), उमेश काळे (सामाजिक), शाम थोरात (पत्रकारिता), गणेश स्वामी (क्रीडा).

## वैराग पत्रकार संघातर्फे महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ९ मार्च-**

वैराग पत्रकार संघाच्या वतीने जागतिक महिला दिना निमित्त विविध क्षेत्रातील महिलांना आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन साई आयुर्वेद कॉलेज येथे करण्यात आले होते. सवित्रीबाई फुले, जिजाऊ माता व बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमापूजनाने व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. मीरा सूर्यवंशी या होत्या. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती तीर्थ, सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत जगदाळे, डॉ. अमिता कोरके, प्रा. अनिता मोहिते-साळुंके, सरपंच अमर लोखंडे, उपसरपंच पंकज सरकाळे, प्राचार्य खंडेराया घोडके मुख्याध्यापक विकास पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमात वीरपत्नी रोहिणी काकडे व हर्षदा चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले. तर राणी आदमाने (सामाजिक),अर्चना डिसले (शैक्षणिक), अर्चना राऊत (कृषी), सारिका करंडे (उद्योग), सुवर्णा वैद्य (मुख्याध्यापिका), स्वाती कांबळे (महिला बचत गट), उत्कर्षा एखंडे (नूतन प्रशासकीय अधिकारी अन्न व सुरक्षा), करिष्मा गायकवाड (नुतन अधिकारी महसुल सहाय्यक), निर्मला नवले (आदर्श माता) यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह ,सन्मानपत्र शाल देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पुरस्कारप्राप्त महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. बलभीम लोखंडे, उपाध्यक्ष रामदास पवार, सचिव भागवत वाघ, संघटक कालिदास देवकते, खजिनदार राहुल दळवी, प्रसिद्धी प्रमुख अण्णासाहेब कुरुलकर, सहसचिव काशिनाथ क्षिरसागर, सुजित काकडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अण्णासाहेब कुरुलकर व कालिदास देवकते यांनी केले.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महिला दिनानिमित्त नळदुर्ग येथे अंगणवाडीत मुलीच्या जन्माचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ मार्च -**

जगभरात जागतिक महिला दिन विविध उपक्रमाने साजरा होत असताना नळदुर्ग येथिल वसंतनगर मधील अंगणवाडीत मात्र कन्यारत्न जन्माचे स्वागत करून एका अगळ्या वेगळ्या उपक्रमाने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वसंतनगर नळदुर्ग येथील अंगणवाडी क्रमांक ५ व ८ च्या वतीने नागरी विभागाच्या परीवेक्षिका अनिता कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली अंगणवाडी सेविका अशा लक्ष्मण गायकवाड व संगीता सुरेश राठोड यांच्या पुढाकारातुन जागतिक महिला दिना निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करन्यात आले होते.

प्रारंभी छमाबाई राठोड, वंदना वाघमारे, कुंभालकर यांच्या हस्ते क्रांती ज्योती सावित्रीमाई फूले यांच्या प्रतिमेचे पुजन करून आभिवादन करण्यात आले. माता सोनाली लोंढे याना नुकतेच कन्यरत्न झाले आहे. त्या कन्यारत्नाचा अर्थात मुलीच्य जन्माचे महिला मान्यवरांचा हस्ते गुलाब पुष्प देवुन स्वागत करून महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी अंगणवाडी मदतनिस वैजंताबाई लोंढे, शेख नुरजहाँ, रिपाइं (आठवले) चे दुर्वास बनसोडे, बाबासाहेब बनसोडे, एस.के. गायकवाड, महादेव कांबळे, उत्तम झेंडारे, अनिल वाघमारे, किशोर धुमाळ यांच्यासह महिला उपस्थित होत्या.



### संक्षिप्त वृत्त...



### महिला दिनानिमित्त शिक्षिकांचा सत्कार

**धाराशिव, दि.९ मार्च -**

शहरातील तेरणा पब्लिक स्कूलमध्ये (सीबीएसई) दि. ८ मार्च रोजी विज्ञान दिन व जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी महिला शिक्षकांना गुलाबाचे फुल देवून सत्कार केला. प्राचार्य विलास मोरे प्रार्थनेच्या वेळी स्त्री शक्ती विषयी मार्गदर्शन केले. विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी वेगवेगळे प्रोजेक्ट बनवले होते. प्रोजेक्टबद्दल विद्यार्थ्यांनी पदाधिकाऱ्यांना तसेच शिक्षकांना माहिती दिली. याप्रसंगी सी.व्ही. रमन यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सचिव रत्नदिप वाकुरे व मराठी विभागाच्या प्रमुख शिक्षीका सविता वाकुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य विलास मोरे, प्राचार्य विलास बचाटे, विज्ञान विभागाचे प्रमुख शिक्षक रोहीत लंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. सुत्रसंचलन विज्ञान विषय शिक्षिका भाग्यश्री पाटील यांनी केले. आभार विज्ञान विषय शिक्षिका शितल मोरे यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



### लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा संपन्न

**इटकळ, दि.९ मार्च -**


तुळजापूर तालुक्यातील उमरगा चि. येथे ८ मार्च रोजी श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यंदा श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री. भावार्थ रामायणाचे १७ वे वर्ष होते. सायंकाळी ६ वाजता सुरू झालेल्या ग्रंथ वाचन व निरूपण कार्यक्रमात युद्धकांडातील सात अध्यायांचा वाचन व निरूपण बारा तास चालला. या सोहळ्यात तुळजापूर, उमरगा, कळंब, लातूर, सोलापूर, पंढरपूर आणि इतर ठिकाणांहून मोठ्या संख्येने रामभक्त उपस्थित होते. रविवार दि.९ मार्च रोजी सकाळी ६ वाजता सोहळ्याची सांगता करण्यात आली. जय श्रीरामच्या जय घोषाने गाव राममय झाले. महाआरती नंतर प्रसाद वाटप करण्यात आले. श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्याचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध होते, ज्यामुळे गावातील रामभक्तांचे कौतुक होत आहे.



### ॲड. मैना वडणे पुरस्काराने सन्मानित

**मंगरूळ, दि.९ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव येथील संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा २०२५ चा जिल्हास्तरीय आदर्श नारी जीवन गौरव पुरस्कार कुंभारी (ता. तुळजापूर) येथील ॲड. मैना वडणे यांना प्रदान करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजवादी नेते भाई पन्नालाल सुराणा हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा महिला बालविकास अधिकारी किशोर गोरे, बालकल्याण समितीचे अध्यक्ष विजयकुमार माने, जिल्हा परिविक्षा अधिकारी व्यंकट देवकर, ॲड. सुजाता माळी, ॲड. दिपाली जहागिरदार, उद्योजीका अंबिका गावडे, प्रा.डॉ. अश्रुबा कदम, सरपंच मल्लीनाथ गावडे, लक्ष्मण माळी, विठ्ठल वडणे, चाँदसाहेब शेख, विलास वकील, नागनाथ जळकोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष दयानंद काळुंके यांनी तर सुत्रसंचलन डॉ. संतोष पवार यांनी केले तर आभार प्रबोध कांबळे यांनी मानले.



### सुरसंगम बालआनंद मेळावा संपन्न

**जळकोट, दि.९ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील संभाजीनगर भागातील जि.प.प्रा. शाळेच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी सुरसंगम बालआनंद मेळावा हा सांस्कृतिक कार्यक्रम संभाजीनगर भागात तब्बल तीन तास सादर केला. जि.प.प्रा. शाळा संभाजीनगर जळकोट येथे 'सुरसंगम' वार्षिक स्नेहसंमेलन-२०२५ हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत कदम, विकास चुंगे, कृष्णात मोरे, महेश कदम, नागनाथ जट्टे, हरिदास महाबोले, अनिल करदुरे, रेणुका इंगोले, जयश्री भोगे, संजय अंगुले, संजय माने, गिरीश नवगिरे, बालाजी पाठक, सरिता कदम, मेघराज किलजे, सतीश पिसे, सुनील माळगे आदि उपस्थित होते.

### सुरेखा कोलार यांचे निधन

**तुळजापूर, दि.९ मार्च -**

येथील सुरेखा कोलार (वय ६५) यांचे दि. ७ मार्च शुक्रवारी सोलापूर येथील रुग्णालयात उपचार घेत असताना निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

# कडक ऊन, मंडप तुटपुंजा; मंडपाच्या लोखंडी अँगलचे रहस्य गुलदस्त्यात

## ट्रक भरून आणलेले मंडपाचे अँगल मंदिर प्रशासकीय कार्यालयाच्या पाठीमागे अनेक वर्ष धूळखात...







**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.९ मार्च -**

- उन्हाचा पारा ३७/३८ पार! मंडपाचे धुळखात पडलेले अँगल गेले कुठे?...
- दर्शनासाठी अनवाणी पायाने येणाऱ्या भाविकांच्या पायाला चटके...
- मंदिर प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे भाविकांना उन्हाचा तडाखा...

मार्च महिन्याच्या मध्यंतरापर्यंत म्हणजे सध्या उन्हाचा पारा चांगलाच वाढत चालला आहे. मंदिर प्रशासकीय कार्यालयाच्या समोर आणि महाद्वारासमोर सध्या अपुरा मंडप टाकण्यात आला आहे. अपुऱ्या मंडपामुळे भाविकांना उन्हाचे चटके बसत आहेत.

मागील दोन-तीन वर्षांपूर्वी मंदिर प्रशासनाने भवानी रोडवरील गेटपर्यंत भाविकांच्या सोयीसाठी मंडप टाकण्यासाठी भाविकांनी दिलेल्या दानातून लाखो रुपयांचे मंडपाचे अँगल आणले होते. ट्रक भरून आणलेल्या अँगलचे रहस्य गुलदस्त्यात असल्याचे टाकलेल्या मंडप आणि राहिलेल्या अँगलकडे बघितल्यावर निदर्शनास येते. ट्रक भरून आणलेले लोखंडी अँगल सध्या टिचभरच संकेत संख्येत दिसतात. प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागे अनेक वर्ष ते अँगल धूळखात पडले होते.

सध्या अँगल ठेवलेल्या ठिकाणी मंदिर पोलीस चौकीचे बांधकाम झाले असून धुळखात पडलेले मंडपाचे अँगल मात्र तेथून गायब झाल्याचे दिसत आहे. सध्या हे अँगल कुठे आहेत असतील तर त्याचा वापर करून मंदिर महाद्वार पासून भवानी रोडवरील गेटपर्यंत नियोजित असलेला मंडप टाकावा आणि ते अँगल नसतील तर कोठे गेले असा प्रश्न उपस्थित होत आहे.

भाविकांचे उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून आणलेल्या अँगलचा उपयोग आज तागायतपर्यंत भवानी रोडवरील गेटपर्यंत मंडप टाकण्यासाठी करण्यात आलेला नाही. दोन वर्षांपूर्वी प्रशासकीय कार्यालयाच्या पाठीमागे ठेवलेल्या अँगलचा वापर करून सुवर्णेश्वर मंदिरापर्यंत मंडप टाकण्यात आला होता. यावर्षी उन्हाळ्याची चाहूल लागताच गेटपर्यंत मंडप टाकणे अपेक्षित होते पण टाकण्यात आला नाही. दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत असून सध्याचे तापमान ३७ ३८ पर्यंत पोहोचले आहे.

वाढत्या उन्हाच्या चटक्यामुळे दर्शनासाठी येणारे भाविक भक्त उन्हाने होरपळून जात आहेत. लहान मुले आणि वृद्ध भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते सकाळी ८.३० ते ९ वाजल्यापासूनच उन्हाचा पारा चांगला चढत आहे सध्या तुळजापूर मध्ये ३७ अंश सेल्सिअस तापमानाचा पारा असून तज्ञांच्या मते पुढच्या महिन्यात चाळीच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. मंदिर, महाद्वार आणि प्रशासकीय इमारत याच्यासमोरच मंडप टाकण्यात आलेला आहे. पण तोही अपुरा आहे रोडवरून चालत येणाऱ्या भाविकांकडे कायमस्वरूपी दुर्लक्ष होत आहे. भवानी रोडवरील अनेक व्यापाऱ्यांनी आपापल्या दुकानासमोर उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून हिरवा कपडा मारून घेतला आहे. पण तो कपडा रोडवर चालत येणाऱ्या भाविकांसाठी तुटपुंज्या स्वरूपाचा आहे.

गुढीपाडव्यापासून आई तुळजाभवानी मातेची चैत्री यात्रा चालू होणार आहे. चैत्रीयात्रेसाठी लाखोच्या संख्येने भाविक भक्त आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येतात. तसेच बाराही महिने हजारोच्या संख्येने भाविक देवी दर्शनासाठी येतात.

> महाद्वारासमोर मंदिराला पुरातन रूप देण्यासाठी दगडी पायऱ्या आणि रोडला देखील नक्षीदार दगडी बसवले आहेत हे दगड उन्हाने लवकर गरम होतात त्यामुळे वर जरी मंडप असला तरी खाली मॅट हातरणे गरजेचे आहे. तसेच मंदिर प्रशासकीय कार्यालयासमोर उन्हाळ्यासाठी म्हणून तात्पुरत्या स्वरूपाच्या दोन तीन पाणपोई भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय होईल अशा मंदिर प्रशासनाने करावी अशी मागणी देखील भाविकातून होत आहे.
>
> मंदिर प्रशासकीय कार्यालयाच्या पाठीमागे ठेवलेले अँगलचे ढिगारे आणि सध्या कारल्याच्या समोर पडलेले अँगल बघितल्यानंतर असे लक्षात येते की मोठ्या प्रमाणात अँगल गायब आहेत. सध्या प्रशासकीय कार्यालयाच्या समोर ठेवलेले मंडपाचे अँगल किरकोळ प्रमाणातच दिसत आहे. मंदिर संस्थानचे गेटपर्यंत मंडप टाकण्याची नियोजन होते म्हणल्यास सध्या मंडप टाकून उरलेल्या लोखंडी अँगल गेट पर्यंत पुरतील का? असा प्रश्न मंदिर प्रशासकीय कार्यालयाच्या समोर सध्या असणाऱ्या अँगलकडे बघून पडत आहे.

मंदिर प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निष्काळजीपणामुळे भाविक भक्तांना कुठल्याही प्रकारच्या सोयी सुविधा पुरविण्यात मंदिर प्रशासन असमर्थ पडत असल्याची चर्चा शहरात चांगलीच रंगत आहे. भवानी रोडवरील गेटपर्यंत मंडप आणि मॅट टाकणे सध्या गरजेचे आहे. उन्हामुळे भाविकांच्या पायाला चटके बसून ज्या वेदना होतात त्या वेदना मंदिर प्रशासना पर्यंत पोहोचत नाहीत ही दुर्दैवाची बाब आहे.

महाद्वार आणि प्रशासकीय इमारती समोर मंडप जरी टाकला असला तरी मॅट टाकण्यात आलेली नाही. मंडपाचे अँगल गायब झाल्याची चर्चा मात्र मंदिर परिसरात चांगलीच रंगली आहे. अँगल गायब असतील तर भाविकांसाठी गेटपर्यंत मंडप टाकला जाईल का? असा प्रश्न शहर वाशीयांना पडला आहे.

## जि.प. हायस्कूलमध्ये कर्तृत्ववान महिलांचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ मार्च -**

जि.प. हायस्कूल उमरगा येथे ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे आणि प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्याध्यापक पद्माकर मोरे होते.

यावेळी सामाजिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. यात भारत शिक्षण संस्थेच्या लता मोरे, संगीता कडगंचे, शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या शीला मुदगडे, सुमन वरवटे, आणि राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षिका सरिता उपासे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच, इन्स्पायर अवॉर्ड विजेत्या वैष्णवी केदारे, कुलसूम उस्ताद, आणि आदित्य सगर यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विज्ञान शिक्षक विद्यानंद सुत्रावे, सदानंद कुंभार, धनराज तेलंग, संजय रूपाजी, आणि अटल बशीर शेख यांच्या प्रयत्नांनी केले.

## तेर ग्रा. रूग्णालयातील सोनोग्राफी मशिनचे आ. पाटील यांच्या हस्ते लोकार्पण...

# मित्रच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांकडुन सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.९ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामीण रुग्णालयात नव्याने कार्यरत झालेल्या सोनोग्राफी मशिनचे लोकार्पण नवनिर्वाचित मित्र संस्थेचे उपाध्यक्ष व तुळजापुरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते रविवारी दि.९ रोजी करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालय तेर येथे सोनोग्राफी मशिनची पहाणी आ. पाटील यांनी केली.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉरमेशन संसृथेच्या उपाध्यक्ष पदी आ. पाटील यांची निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी सरपंच दिदी काळे, रूग्ण कल्याण समितीचे सदस्य जुनेद मोमीन, सुभाष कुलकर्णी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. गुरूबस शेटे, पद्माकर फंड, नवनाथ नाईकवाडी, बालाजी पांढरे, रवीराज चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. रुग्णांना विविध प्रकारचा विकारावर उपचारासाठी बाहेरगावी जावे लागत होते. त्यापैकी एक गैरसोय आता दूर झाली असून ग्रामीण रुग्णालयात आठवड्यातील दर बुधवारी गरोदर महिलांची तपासणी करण्यात येणार आहे.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत कोंडेकर, नवनाथ पसारे, अजीत कदम, सतीश कदम, सुमेध वाघमारे, भुजंग खांडेकर, प्रवीण साळुंखे, प्रज्योत रसाळ, आरशाद मुलानी, तानाजी बंडे, गणेश फंड, परिचारिका संगिता चव्हाण, दत्तात्रय वाघे यांच्यासह आशा स्वंयसेविका, ग्रामस्थ महिला उपस्थित होत्या.

## नवोदय विद्यालयात महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ मार्च -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांच्या द्वारे शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, अध्यापक वृंद उपस्थित होता. या महिला दिनाचे औचित्य साधून श्रेणिक पोळ, संस्कृती भारती, सृष्टी कांबळे, भाग्यश्री बोडके, कृष्णा मोरे या विद्यार्थ्यांनी जीवनातील महिलांचे महत्त्व या विषयावर भाषण, गीतांच्या माध्यमातून महती सांगितली.



विद्यालयातील एस.एस. माने यांनी प्रत्येक यशस्वी पुरुषामागे महिलांचा हात कसा असतो हे सांगून घरचा मूळ पाया म्हणजे महिला आहे. हे सांगून देखील समाजामध्ये वृद्धाश्रमांची संख्या का वाढत आहे? असा प्रश्न उपस्थित करून महिला व पुरुष या दोघांची भूमिका जीवनामध्ये महत्त्वपूर्ण आहे हे पटवून सांगितले. याप्रसंगी विद्यालया तर्फे २१ महिलांचा शाल, टोपी, गुलाबपुष्प देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

# माळकरंजा जि.प. शाळेत आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ मार्च -**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त तालुक्यातील माळकरंजा येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत यावर्षी प्रथमच एक विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरूळ येथील तज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने तसेच ग्रामपंचायत, शालेय व्यवस्थापन समिती, महिला बचत गट, आशा कार्यकर्ती व अंगणवाडी सेविकांच्या सहयोगाने शाळेत गावातील सर्व महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



शाळेतील शिक्षिका भारती सूर्यवंशी, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी मंजुश्री नारायण कराड, सहशिक्षक हनुमंत घाडगे आणि मकरंद नाडे यांच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन गोविंदपुर बीटच्या शिक्षण विस्तार अधिकारी मैनाबाई मुळे यांनी केले. प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरूळचे मेडिकल ऑफिसर डॉ. धनंजय चाळक आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने शाळेत जवळपास १०० महिलांची विविध तपासण्या करण्यात आली. यामध्ये थायरॉईड, मधुमेह, रक्तदाब, किडणी, लिव्हर, चरबी, एच बी वन सी वन, कॅन्सर चाचण्या करण्यात आल्या. महिलांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमात गावातील महिला बचत गटाच्या सदस्यांनासह शालेय समितीचे अध्यक्ष शरद गालट, उपसरपंच दिपाली गालट यांसह अनेक महिला आणि नागरिक उपस्थित होते.

# रूपामाता उद्योग समूहातर्फे महिला दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ मार्च -**

आपल्या असामान्य कर्तृत्वाने संपूर्ण जग व्यापणार्या करणाऱ्या स्त्रीशक्तीचा गौरव करण्यासाठी आठ मार्च हा 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. पुरुषांच्या खांद्यास खांदा लावून दैनंदिन आयुष्यात विविध भूमिका साकारणाऱ्या नारीशक्तीला सलाम म्हणून रुपामाता उद्योग समूहातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने रूपामाता अर्बन व मल्टीस्टेटच्या मुख्य कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांचा आज सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या संचालिका सुलभा गुंड, महानंदा माने, रूपामाता अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले व रूपामाता मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर यांच्या उपस्थितीत आज महिला दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. रुपामाता सर्व शाखांमधून महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या विविध शाखांमध्ये महिला महत्वाच्या विविध पदावर आपल्या जबाबदारी पार पाडत असून, संस्थेच्या प्रगतीमध्ये मोलाची भूमिका पार पाडत आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत पाडोळी (आ) येथील रुपामाता मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट येथे कार्यरत असणाऱ्या भगिनींचा देखील सत्कार जनरल मॅनेजर बिभीषण माने यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला करण्यात आला.

यावेळी आदिनाथ राजळे, जनरल मॅनेजर उत्पादन, कर्मचारी वृंद सहभागी होते.

# घरकुल योजनेत कसलाही गैरप्रकार होता कामा नये

## आ.संदीप क्षीरसागरांकडून प्रशासनाला कडक निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

सध्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना यांसह शासनाच्या विविध घरकुल योजनेची कामे प्रशासकीय स्तरावर सुरु आहेत. या योजनेतील लाभार्थी हे गरजू आणि वंचित असतात. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्यास कसल्याही प्रकारचा अडथळा होऊ नये, तसेच या योजनांच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर आर्थिक मागणी अथवा इतर कसलाही गैरप्रकार होऊ नये याची पुरेपूर दक्षता घ्या. तसेच पात्र लाभार्थींना तातडीने घरकुल हप्ता वितरीत करा, असे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिका, बीड पंचायत समिती व शिरूर कासार पंचायत समिती व बीड नगरपालिका येथील अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सध्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर सध्या प्रस्ताव दाखल करून घेणे सुरू आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरीचे ऑनलाईन अर्ज दाखल करून घेण्याची प्रक्रिया झाली आहे. रमाई आवास योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावरून दाखल करवून घेऊन पंचायत समितीमार्फत समाजकल्याण विभागाकडे दाखल करण्यात आले आहेत तसेच त्रुटी असलेले प्रस्तावांची पुर्तता करणे सुरू आहे.



बर्याचवेळा या योजनेतील लाभार्थ्यांकडून अधिकारी आर्थिक मागणी करत असल्याच्या तक्रारी येत असतात. जे नागरिक या योजनेचे लाभार्थी आहेत ते सर्व अतिसर्वसामान्य, गरीब आणि वंचित घटकातील असतात. त्यांची अडवणूक करणे, आर्थिक मागणी करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार या योजनेच्या कार्यवाहीत होता कामा नये. तसेच जे लाभार्थी पात्र आहेत त्यांचे हप्ते तातडीने वितरीत करा अशाप्रकारचे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तालुक्याचे गटविकास अधिकारी, बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**बोगसगिरी आणि लाभार्थ्यांची पिळवणूक अजिबात खपवून घेणार नाही**

दरम्यान, घरकूल योजनेचा लाभ घेऊन घर न बांधताच अधिकार्यांच्या संगनमताने रक्कम उचलल्याचे गैरप्रकार जिल्ह्यात समोर आले आहेत. असले प्रकार बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात अजिबात खपवून घेणार नाही. त्यासोबतच लाभार्थ्यांची अधिकार्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूकही सहन केली जाणार नाही. अशी तंबीही आ.संदीप क्षीरसागरांनी अधिकार्यांना दिली आहे.

**बीड तालुक्याने विशेष लक्ष देण्याची गरज, दिरंगाई चालणार नाही**

घरकुलाचा पहिला हप्ता सोडविण्यात बीड तालुका मागे पडला आहे. बीड पंचायत समिती अंतर्गत एकूण २९२९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे बीड पंचायत समितीने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीत दिरंगाई चालणार नाही. यासोबतच घरकूल संदर्भात बीड नगरपालिकेच्याही अनेक तक्रारी नागरिकांमधून होत आहेत. त्याची तातडीने सोडवणू प्रशासनाने करावी. असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

# जिल्ह्यात जलजीवन योजनेचे अडीचशे कोटी रुपये अडकले

## टक्केवारीचे दिलेले पैसे अडकल्याची चर्चा-ॲड.अजित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

-- सरकार कडून शेतकऱ्यांची फसवणूक
-- जिल्ह्यातील विकास योजना टप्प झाल्या
-- कामे मंजुरीसाठी पैसे दिल्याची देखील चर्चा
-- हे पैसे परत मिळवण्याच्या अडचणी वाढल्या
-- सरकार आले मात्र जनतेची फसवणूक झाली

लाडकी बहीण योजना राबवून सरकार परत आणण्याचा प्रयत्न झाला. हा प्रयत्न यशस्वी देखील झाला. मात्र विकास कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली गेली आहेत. त्यामुळे या योजनेच्या नादात सरकार आणून शासनाने जनतेची फसवणूक केल्याचे स्पष्ट दिसते. बीड जिल्ह्यात केवळ जलजीवन योजनेचे जवळपास अडीचशे कोटी रुपये अडकले असून अनेक सुशिक्षित बेकार अभियंते आणि कंत्राटदार व्याज भरत-भरत परेशान आहेत. त्यामुळे ही एक प्रकारची फसवणूक असल्याचा आरोप जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे.

राज्य शासनाने लाडकी बहीण योजना निवडणुका जवळ आल्यानंतर राबवली. योजना राबवणे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र योजनेच्या माध्यमातून सरकार आणून जनतेची फसवणूक करणे, हा अधिकार शासनाला नाही. या योजनेच्या नादात एका-एका महिलेने पंचवीस पंचवीस वेळेला लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले असले, तरी त्यावर कारवाई होत नाही. पुढील निवडणुकीकडे सरकारचा डोळा आहे. योजना राबवण्याचा नादात निकष पाहिले नाहीत. आता दिलेले लाभही कमी होत आहेत.

जिल्ह्यातील विकास कामे पूर्णपणे खुळंबली गेली आहेत. तर दुसरीकडे अनेकांनी अनेक कामात दिलेली टक्केवारी अडकून पडल्याने अनेक जण परेशान असल्याची चर्चा जनतेत आहे. सामान्य लोक यात भरडले गेले आहेत. तरी देखील पुढाऱ्यांना याचे देणे घेणे नाही.

आठ आठ महिन्यापासून अनेक ठिकाणी जलजिवनची कामे अडकून पडलेली आहेत. त्यांना बिल दिले जात नसल्याच्या तक्रारी होत आहेत. सोलापूर जिल्ह्यात एका कॉन्ट्रॅक्टरने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. अशा बाबी गंभीर आहेत. जलजिवनची अनेक कामे थोड्या प्रमाणात चालू आहेत. मात्र यात गुत्तेदारांचा पैसा अडकून पडला आहे. गुत्तेदारांची कामे कशा पद्धतीने आहेत, हा मुद्दा वेगळा आहे. मात्र अशा प्रकारे त्यांची पिळवणूक करणे, हे कुठल्याही शासन नियमात बसत नाही. त्यामुळे गुत्तेदारांनी देखील शासनाच्या विरोधात पाऊल उचलायला हवे. मात्र तसे होत नाही. एकट्या जलजिवन योजनेचे असे झाले आहे, असे नाही. तर सर्वच विकास कामांना खिळ बसलेली आहे. त्यामुळे नवे सरकार आल्यापासून निधी नसल्याचा बहाणा सांगत विकास कामे खोळंबली आहेत. सामान्य जनतेची यात फसवणूक झालेली आहे. त्यामुळे जनतेने जागे होणे आवश्यक आहे, असेही ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्यावतीने ऐरणीवर घाव घालणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**कडा दि.९ मार्च**



भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या वतीने कडा येथील कष्टकरी आणि ऐरणीवर घाव घालणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख हे प्रत्येक वर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने महिला दिन साजरा करतात यापुर्वीही भाजीपाला विकणाऱ्या व बांधकाम मजूर महिलांना सन्मानित करण्यात आले होते. प्रत्येक वर्षी नाविन्यपूर्ण पुर्ण महिला दिन शंकर देशमुख यांच्या वतीने साजरा केला जातो. सौ. गिरीजा देशमुख व सौ. शकुंतला पवळ यांनी सर्व महिलांना हळदीकुंकू लावून तसेच शेला व पुष्पहार देऊन सन्मानित केले. कडा गावातील घिसाडी समाजातील एकुण १५ महिलांचा सन्मान करण्यात आला. शिक्षिका, डॉक्टर, व इतर उच्चशिक्षित महिलांचा सन्मान नेहमी होतो, परंतु देशमुख यांनी पुरुषांबरोबर कष्ट करणाऱ्या व ऐरणीवर घाव घालणाऱ्या आणि मान सन्मानापासुन दुर असणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार केला. कडा येथील भारतीय जनता पार्टी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमास हरिश्चंद्र बोडखे, राजु शिंदे, राजाभाऊ भंडारी, वेदांत देशमुख, महेश कर्डीले, अशोक खंदारे, शास्त्री, सोमनाथ आपरे व इतर उपस्थित होते.

# श्री चिंतेश्वर विद्यालयात जागतिक महिला दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिन संपन्न झाला.याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी, प्रमुख उपस्थिती म्हणून भा.शि.प्र.संस्था उपाध्यक्षा ज्योतीताई ठाकूर,पोलीस उपनिरीक्षक निशिगंधा खुळे, समाजसेविका उमा औटे,स्थानिक सभासद प्रणिता हिटनाळीकर प्राथमिक अभ्यासप्रूक मंडळ प्रमुख संघनी वक्ते ज्येष्ठ शिक्षिका रेखा मोटे यांची उपस्थिती होती.

भा.शि.प्र.संस्था उपाध्यक्षा ज्योतीताई ठाकूर यांनी विद्यार्थ्यांनिनी शालेय जीवनापासून शिस्तबद्ध व स्व-संरक्षक बनावे असे प्रतिपादन केले.आपण समाजाचे काही तरी देणे करी आहोत या भावनेने समाजासाठी आपण आपले जीवन जगत असतांना समाजाभिमुख कार्य करावे असे उमाताई औटे यांनी सांगितले.आपणावरील जबाबदारी महिलांनी पूर्ण निष्ठेने काम करत पूर्ण करावी असे मत पोलीस उपनिरीक्षक निशिगंधाताई खुळे यांनी व्यक्त केले.कुठलेही काम यशस्वी करण्याची हातोटी महिला भगिनींना अवगत असते त्यामुळे आत्मविश्वास व स्वावलंबनाच्या जोरावर कुटुंब व समाजाच्या मागे महिलांनी उभे ठाकले पाहिजे असे मत प्रणिताताई हिटनाळीकर यांनी मांडले.प्रसंगी उपस्थित महिला पालकांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपलापले स्वानुभव कथन केले.अध्यक्षीय समारोपात प्रदीप जोशी यांनी इतिहासातील महिलांच्या कार्याचा उल्लेख करत सर्व महिला भगिनींना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे पद्य गायन विद्या घिगे, प्रास्ताविक रेखा मोटे, सूत्र संचालन सारिका रामदासी तर आभार संघनी वक्ते यांनी मानले.कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ०८ रोजी जागतिक महिला उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील ,संस्थेचे सचिव प्रा.जे.पी. शेळके, प्राचार्य ए.आर. डंबरे, मुख्याध्यापिका श्रीम.कदम एस.डी., प्राचार्या श्रीम आर.डी. लोखंडे, श्रीम.सोनवणे एम.एस.श्रीम. जी.डी. कदम,श्रीम. एस .आर .रसाळ, श्रीम. पी.डी. हिवरेकर श्रीम. मंगल गालफाडे यांची उपस्थिती होती. सुरुवातीला राजमाता जिजाऊ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,इंदिरा गांधी, अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शाळेतील सर्व शिक्षिकाचा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. जगताप एस.सी. यांनी केले. तसेच यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. एल.तिडके यांनी केले तर आभार प्रदर्शन यादव एस.बी. यांनी केले.यावेळी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# स्वतःचे स्त्रीत्व ओळखा व पुढे जा-सौ.संध्याताई कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

जागतिक महिला दिन हा एकच दिवस महिलांचा नाही तर प्रत्येक दिवसच महिलांचा असतो. आपल्या संस्कृतीत महिला व पुरुष वेगळे घटक नाहीत. जेव्हा एक स्त्री घडते तेव्हा पूर्ण कुटुंब घडते. स्त्री ही प्रेमळ, कोमल ,लाजाळू असते .घराचा स्वर्ग बनवते. परंतु जेव्हा अन्याय अत्याचार छळ होतो तेव्हा मात्र ती रणचंडीकेचे रूप धारण करते पूर्वीपासूनच स्त्रियांची गौरवशाली परंपरा आहे .आजच्या स्त्रीने स्वतःमधील सामर्थ्य ओळखून आपले स्वत्व जपावे असे सहकार भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मा. सौ संध्या कुलकर्णी यांनी दीनदयाल शोध संस्थान,कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीड येथे जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाच्या वेळी आपल्या मार्गदर्शनात सांगितले .

तसेच प्रतिकूल परिस्थितीतही संकटाला तोंड देण्याची क्षमता स्त्रीमध्ये असते हे त्यांनी विविध समर्पक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. उद्योजिका सौ सविता जैन, सौ हेमा विभूते यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच जन शिक्षण संस्थानच्या महिला प्रबंध समिती सदस्य, यशोगाथा, प्रशिक्षिका व दीनदयाल शोध संस्थानच्या महिला कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.




आपले मनोगत व्यक्त करताना उद्योजिका साविज ब्युटी शॉपी च्या सवीता जैन यांनी त्यांच्या व्यवसायाबद्दल माहिती सांगितली. व्यवसाय करताना अनेक अडचणी येतात पण न डगमगता धीराने त्यातून वाट काढावी लागते. तसेच जन शिक्षण संस्थान ही एक उद्योजक तयार करण्याची फॅक्टरी आहे असे त्यांनी सांगितले.हिरकणी हुरडा पार्टीच्या सौ हेमा विभूते यांनी सिझनेबल व्यवसायाबाबत माहिती सांगितली .जिद्द ,चिकाटी, मेहनत या गुणांमुळे व्यवसायाची वाढ होते .व्यवसाय वाढीसाठी माऊथ पब्लिसिटी खूप महत्त्वाची आहे असे त्या म्हणाल्या.

स्त्रीची पूजा भारतामध्ये केली जाते आम्ही जसे घडलो तशा आमच्या कन्या घडतील असे वाटते नोकरी व संसार अशी कसरत करणाऱ्या स्त्री शक्तीचा सन्मान म्हणजे आनंदाचा सण आहे असे जन शिक्षण संस्थान बीडच्या प्रबंध समिती सदस्य डॉ.सत्यभामा चोले यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात सांगितले. यावेळी यशोगाथांनी आपले मनोगत व्यक्त करताना जन शिक्षण संस्थानचे आभार मानले.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मा.संचालक श्री गंगाधर जी देशमुख म्हणाले की कौशल्य विकास व उद्योगाला प्रेरणा देण्याचे काम जन शिक्षण संस्थान करते. हिरकणी हुरडा पार्टी एक महिला सक्षम पणे सांभाळते .एक शिक्षिका संस्कार वर्ग चालवते. त्यांच्यातील उद्योजकाचा आज आपण सन्मान केला आहे .

या कार्यक्रमासाठी प्रबंध समिती सदस्य मा.सौ लक्ष्मी बोरा मा.सौ आशा कदम मा. विद्याताई सानप ,श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी ,सौ कमल देशमुख, कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनुरकर,डॉ. अंबिका नरवडे, दीनदयाल शोध संस्थानचे कार्यकर्ते, जन शिक्षण संस्थानचे सर्व कार्यकर्ते ,प्रशिक्षिका व प्रशिक्षार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. महिला दिनानिमित्त महिलांची डॉ. अंबिका नरवडे यांनी आरोग्य तपासणी केली .

सौ स्नेहल केवडकर यांनी गीत व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री धर्मराज जाडकर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले तर सूत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी केले.

कार्यक्रमासाठी बीड तालुक्यासह पाटोदा शिरूर गेवराई माजलगाव धारूर केज अंबाजोगाई इत्यादी तालुक्यातून ३४० प्रशिक्षक प्रशिक्षार्थी, यशोगाथा दीनदयाल शोध संस्थान च्या सर्व महिला कार्यकर्त्या, दीनदयाल शोध संस्थान भिशी गटाच्या महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# केज ते चौफळा झाला जिवघेणा प्रवास

**तभा वृत्तसेवा**
**केजा दि.९ मार्च**

केज तालुक्यातून जीवाचीवाडी येवता लव्हरी कोल्हेवाडी जाणारा रस्ता चि खुप कठीण अवस्था झालेले आहे नागरिकांना करावा लागतो जीवघेणा प्रवास केज विधानसभा आमदार ताई यांचे दुर्लक्ष केज कोल्हेवाडी जिवाची वाडी तुकुचीवाडी येवता लव्हुरी अमदार ताई ला विधानसभा ल खुप मोठ्या मताधिक्याने लिड दिली पण आमदार ताईचे ह्या गावावर खूप दुर्लक्ष पाहायला मिळत आहे केज ते कानडी माळी रस्त्याचे काम मागील सहा महिन्यापासून चालू आहे अजूनही पूर्ण नाही त्या कामावर प्रशासन व राजकीय नेत्याने लक्ष दयावे

कानडी माळी ते चौफळा रस्थाची खुप बिकट अवस्था झालेली आहे तरी अमदार ताई नी लक्ष द्यावे



# बीड जिल्ह्यातील मनरेगा योजने अंतर्गत मधील कुशल देयके लवकरच मिळणार - कुंडलिक खांडे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

मनरेगा योजनेंतर्गत शासनाकडून कामांची संख्या वाढविली जात असताना बीड जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२५ पर्यंतच्या एकूण ९८४ ग्राम पंचायत मधील वैयक्तीक व सार्वजनिक कुशल देयक थकित असून या संदर्भात सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांची भेट घेत सदरील देयके देण्याची विनंती केली. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ या संदर्भात रोहयोचे सचिव यांना आदेशित केले असून मनरेगाचे देयके लवकरच मिळतील असे सरपंच- उपसरपंच संघटनेचे अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी कळवले आहे.

केंद्र शासनाने सुवर्ण जयंती रोजगार हमी योजना बंद करून २००८ पासून महात्मा गांधी राष्टलीय रोजगार हमी योजना सुरू केली. २०१० पासून या योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली.ग्रामीण भागात मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजना तसेच सार्वजनिक मालमत्ता तयार करण्याचा उद्देश समोर ठेऊन ही योजना सुरू करण्यात आली. बीड जिल्ह्यातील एकूण ९८४ ग्राम पंचायत मधील वैयक्तीक व सार्वजनिक कुशल देयक गत ५ वर्षापासून थकित आहेत.त्यामुळे शेतकरी व ९८४ सरपंच अत्यंत अडचणीत आहेत.या संदर्भात सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांची भेट घेवून सदरील देयके लवकरच देण्याची विनंती केली. या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांनी रोजगार हमी योजनेचे सचिव यांना सदरील प्रकरणी त्वरीत कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. सरपंच-उपसरपंच संघटनेचे अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या प्रयत्नांना लवकरच यश येणार असून यामुळे थकित देयकांचा प्रश्न मार्गी लागला आहे.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अरविंद पाटील-निंलगेकर यांच्या वाढदिवसावर भाजयुमोचा विधायक उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.९ मार्च -**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात युवा नेते अरविंद भाऊ पाटील निंलगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजयुमोने विधायक उपक्रम राबवला. यामध्ये ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, पल्स ऑक्सिमिटर आणि थर्मामीटर यांसारखी महत्त्वाची वैद्यकीय सामग्री प्रदान केली गेली.



काळजी घेतलेल्या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा फायदा होणार आहे, विशेषतः कोरोनाच्या चंगळीतून उभा राहिलेल्या रुग्णांना. यावेळी भाजयुमो तालुकाध्यक्ष रामलिंग शेरे यांच्या पुढाकाराने उपक्रम पार पडला.

उपस्थित मान्यवरांनी समाजसेवेचाच वाढदिवस साजरा करण्यावर भर दिला. यावेळी डॉ. मोना सरवदे, दंतराव आणि विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### हिसामनगर ग्रा.पं.मध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**वलांडी, दि.९ मार्च -**

देवणी तालुक्यातील हिसामनगर ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त विशेष महिला सभेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास गटविकास अधिकारी सागर वरंडेकर, सरपंच सपना मुक्के, ग्रामविकास अधिकारी बंडगर एन.यू., रामरेड्डी येडले, विजयकुमार मुक्के तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी मगबुल पठाण, कृष्णकांत पांचाळ, बसवराज उमाटे, माधव बेंजरगे, सागर तावडे यांनीही आपली उपस्थिती दर्शवली. सभेत महिला सशक्तीकरण, हक्क, अधिकार आणि विकास यावर सखोल विचारमंथन करण्यात आले. ग्रा.पं.तर्फे महिलांना कचरा कुंडी वाटप करण्यात आले. तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

### ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत पेन्सलवार यांना विद्यापीठाचा लघु संशोधन प्रकल्प मंजूर

**उदगीर, दि.९ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत बालाजी पेन्सलवार यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने लघु संशोधन प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. 'स्ट्रीमलाइनिंग लायब्ररी ऑपरेशन्स : द इंटिग्रेशन ऑफ आप्लिकेशन सॉफ्टवेअर विथ लायब्ररी सर्विसेस' या अत्यंत नाविन्यपूर्ण विषयावर संशोधन कार्य करण्यासाठी विद्यापीठाने मान्यता दिली आहे.



त्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



### समर्थ विद्यालयात जागतिक महिला दिन

**उदगीर, दि.९ मार्च -**

तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी साहित्यिक रसूल पठाण उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.के.डी. मुडपे, गंगुबाई अंबादास कंजे, पुष्पांजली बालाजी हालगे, अर्चना दिलीप जाधव, सुलोचना श्रावण कांबळे, महानंदा राम शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात रसुल पठाण यांनी आजची महिला आपल्या कामातून, कर्तृत्वाने आपले नेतृत्व सिद्ध करून दाखवत आहे. यामुळे कुटुंबातच नाही तर समाजातही मान सन्मान मिळत आहे. प्रास्ताविक वर्षा कवडगावे यांनी केले. सुत्रसंचालन अनुष्का गडदे हिने केले. तर आभार सोनाक्षी कांबळे हिने मानले.

### डॉ. आरती घोरुडे यांना पुरस्कार प्रदान

**वलांडी, दि.९ मार्च -**

वलांडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आरती घोरुडे यांना त्यांच्या उत्कृष्ट आरोग्य सेवा कार्यासाठी मान्विथा कर्मसिद्धी पुरस्कार प्रदान करण्यात आला. ७ मार्च रोजी, जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पुरस्कार सोहळ्यात जिल्हाधिकारी डॉ. वर्षा ठाकूर-घुगे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान मिळाला.

# देवणी तालुक्यात बापाकडूनच मुलीवर अतिप्रसंगाचा प्रयत्न

### आरोपीला न्यायालयीन कोठडी...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ मार्च -**

देवणी तालुक्यातील इंद्राळ येथे पोटच्या मुलीवरच वाईट हेतूने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या नराधम बापाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली. जागतिक महिला दिनाच्या तोंडावरच बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी ही घटना घडल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

४ मार्च रोजी रात्री इंद्राळ येथे आरोपी धोंडिबा मुरारी कांबळे याने झोपेत असलेल्या आपल्या अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला.

यावेळी मुलीने प्रतिकार करत ओरडल्याने तिची आई जागी झाली. जेव्हा तिने पतीला याबाबत विचारले, तेव्हा त्याने उलट तिला शिवीगाळ केली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

त्यानंतर पीडितेच्या आईने देवणी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली.



तक्रारीनंतर देवणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीविरोधात गुन्हा क्रमांक ५४/२५ नोंदवून कलम ७४, ७५ (बीएनएस) तसेच पोस्को कायद्यातील कलम ८ आणि १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला.

आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. सात मुली आणि एक मुलगा असलेल्या आरोपीने आपल्या कुटुंबावरच ही अमानवीय कृती केल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त केला जात आहे. आरोपीच्या पत्नीचे आरोग्य ठीक नसतानाही त्याने असा घृणास्पद प्रकार केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गौड करीत आहेत.

## मजुरी मागितल्यामुळे गुत्तेदाराची बेदम मारहाण; मिस्त्रीचा उपचारादरम्यान मृत्यू



### उदगीर येथील घटना...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ मार्च -**

मजुरी मागितली म्हणून गुत्तेदाराने बांधकाम मिस्त्रीला अमानुष मारहाण केली, आणि या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उदगीर येथे घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी गुत्तेदार मेहराज पटेल आणि त्याच्या साथीदाराला अटक केली आहे.

सेंट्रींग मिस्त्री म्हणून काम करणारे तानाजी सोनकांबळे आणि त्यांचा भाचा अजय गायकवाड हे बांधकामाच्या ठिकाणी मजुरीसाठी गेले होते. मात्र, गुत्तेदार मेहराज पटेल याने मी तुम्हाला जेवण आणि दारू देईल, पण मजुरी मिळणार नाही. जर मजुरी मागितली, तर मार मिळेल, अशी धमकी दिली.

गुत्तेदाराने तानाजी सोनकांबळे आणि अजय गायकवाड यांना जबरदस्तीने लातूर येथे नेले. तिथे त्यांना लाकडाने बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत गंभीर जखमी झाल्यानंतर अजय गायकवाड मुंबईला पळून गेला, पण तानाजी सोनकांबळे गुत्तेदाराच्या हाती सापडले. त्यांना गाडीत घालून पुन्हा उदगीर येथे आणण्यात आले आणि तेथेच सोडण्यात आले.

गंभीर जखमी झालेल्या तानाजी सोनकांबळे यांना उदगीरच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी जखमांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्याचा सल्ला दिला. लातूरमध्ये उपचार सुरू असतानाच ८ मार्च रोजी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी मोठ्या संख्येने शासकीय रुग्णालयात गर्दी केली. दरम्यान, उदगीर ग्रामीण पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी मेहराज पटेल आणि त्याच्या साथीदाराला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास उदगीर ग्रामीण पोलीस करीत आहेत.

ही घटना कामगारांच्या हक्कांवर गंभीर प्रश्न उपस्थित करत असून, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## महिला सुरक्षा व सक्षमीकरण ही लोकचळवळ होणे गरजेचे : माणिकराव डोके

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.९ मार्च -**



जागतिक महिला दिनानिमित्त देवणी पोलीस स्थानकात विविध कार्यकमांचे आयोजन करण्यात आले. शासकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांनी महिलांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. देवणी पोलीस स्थानकाचे सपोनि माणिकराव डोके यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर भाष्य करतांना सांगितले की, महिला सुरक्षा व सक्षीमिकरण ही एक लोकचळवळ बनली पाहिजे. त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेच्या कार्याचा उल्लेख करत, महिलांना शिक्षणाच्या दारात प्रवेश मिळवून दिल्यामुळे आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत, असे सांगितले. महिला अबला न राहता सबला बनल्या पाहिजे. त्यांना शिक्षण आणि आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, तसेच समाजातील व्यसनाधिन लोकांची संख्या कमी व्हायला हवी, असे डोके यांनी आपल्या भाषणात पुढे सांगितले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सोमनाथ माळी, गटविकास अधिकारी सागर वरंडेकर आणि सरपंच संघटनेचे देवणी तालुकाध्यक्ष सदाशिव पाटील उपस्थित होते. देवणी नगरीच्या नगराध्यक्षा कीर्ती घोरपडे यांनी अध्यक्षतेची भूमिका घेतली. यावेळी महिला बाल कल्याण विभागाच्या माजी सभापती कुशावार्ता बेळे, सरपंच शिरसे, नरसाबाई रणदिवे, प्रगती माणिकराव डोके, मयुरी व्हराडे आणि सुमश्री गौड यांसह अन्य महिलाही कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत मोठेराव यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजित डोईजोडे, नरेश उत्सुर्गे, अनुसया गोपे, पीएसआय. प्रदीप गौड, गोपाळ व्हराडे, फारुख शेख आणि अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मी सर्वसामान्यांचा लोकप्रतिनिधी : आ. संजय बनसोडे

### ८१० कोटीचा उदगीर ते रावी-देगलुर हा राष्ट्रीय महामार्ग मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ मार्च -**

यावर्षीची विधानसभेची निवडणूक ही माझी तिसरी निवडणुक होती. मात्र गेल्या विधानसभेच्या निवडणुकीपेक्षा या वेळेस आपण सर्वांनी प्रचंड मतांनी निवडून देवुन जिल्ह्यात सर्वाधिक मते आपण मला दिली. तब्वल २ लाख मतापैकी १ लाख ५४ हजार मते मला मिळाली व रेकार्डब्रेक अशा ९३ हजार मतांनी मी विजयी झालो असलो तरी साडेतीन लाख सर्वसामान्य नागरिकांचा मी लोकप्रतिनिधी असल्याचे मत माजी क्रीडा मंत्री आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.



उदगीर तालुक्यातील टाकळी येथे आयोजीत अखंड हरिनाम सप्ताह निमित्त दर्शन व नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी धनाजी टाकळीकर, बालाजी भोसले, प्रा.श्याम डावळे, सत्यवान पांडे, सरपंच शुभम केंद्रे, दिगबंर टाकळीकर, गजानन टाकळीकर, सुखानंद बोईनवाड, मनोहर पाटील, कुशालगिर गिरी, पांडु पांचाळ, गणु महाराज जांबळवाड, रामराव मानकोळे, माधव पाटील, बालाजी बोईनवाड, संजु सगर, सीताराम दैठणे, बालाजी एकुंडे, बालाजी निलेवाड, दर्शन बोईनवाड, प्रशांत राठोड, गोविंद बोईनवाड, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. बनसोडे यांनी, गेल्या ५ वर्षाच्या काळात मतदार संघाचा सर्वांगीण विकास केला असुन त्यामध्ये सर्व शासकीय इमारती, शहराला जोडणारे सर्व रस्ते हे राष्ट्रीय महामार्गाने जोडले, पिण्याचा पाण्याचा प्रश्न, विविध समाजाचे भवन, भुमीगत गटार, एम.आय.डी.सी. आदी मंजूर करुन उदगीरच्या विकासात मागील काळात भर टाकली असुन भविष्यात आपला उदगीर तालुका हा जिल्हा करण्याच्या दृष्टीने काम केले आहे. भविष्यात पिकविमा, अपंगाच्या समस्या, कोल्हापुरी बंधारे, शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी प्रयत्न करणार असून त्याही समस्या लवकरच सोडवणार आहे. ८१० कोटींचा उदगीर ते रावी-देगलुर हा राष्ट्रीय महामार्ग मंजूर केला असुन त्याचेही काम लवकरच सुरु होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महिला दिनानिमित्त आ. बनसोडे यांच्या हस्ते ज्येष्ठ माता-भगिनींचा सत्कार करण्यात आला.

## नैसर्गिक शेती करणे काळाची गरज : श्रेयश यादव

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ मार्च -**

उदगीर तालुक्यातील गुडसूर येथे डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत गट सदस्यांना निविष्ठा निर्मिती ड्रमचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय कृषी अधिकारी श्रेयश यादव यांच्या हस्ते झाले. प्रगतीशील शेतकरी मेघराज मुडपे अध्यक्ष होते.

कार्यक्रमात प्राध्यापक डॉ. प्रफुल पाटील यांनी गो वंशाच्या संगोपनावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात मल्लेश्वर, प्रगती, सावली, पांडुरंग, बळीराजा, आणि गुरुकृपा नैसर्गिक शेतकरी गटाचे नोंदणी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमास अनेक शेतकरी, कृषी अधिकारी, आणि मान्यवर उपस्थित होते.

*** धाराशिव, दि.९ मार्च -**

मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी, इंडिया तर्फे संपूर्ण भारतातील महाविद्यालयांमध्ये ताकाच्या नियमित सेवनाबाबत जनजागृतीसाठी अभियान राबवले जात आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, धाराशिव येथे नुकतेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. अरविंद देशमुख यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

## अहमदपूरमध्ये महिला दिन विविध ठिकाणी साजरा




**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.९ मार्च -**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अहमदपूर शहरात विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले.

जानकी महाविद्यालयात जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या उपाध्यक्ष सौ. शितल खोमणे यांनी सांभाळले, तर मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केतन खोमणे उपस्थित होते. कार्यक्रमात शहरातील अनेक सन्माननीय महिलांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी रेखाताई हाके यांनी स्त्रियांच्या हक्कावर भाष्य केले, तसेच महिलांच्या सामाजिक व कौटुंबिक पिळवणुकीवर प्राध्यापिका आकांक्षा जगताप यांनी कविता सादर केली.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख दीक्षा लामतुरे यांच्या नेतृत्वात कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

संत ज्ञानेश्वर विद्यालयात महिला दिनाच्या निमित्ताने सक्षम महिलांचा सन्मान व विद्यार्थ्यांसाठी खरी कमाई विषयक आनंद मेळावा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात प्राचार्या रेखाताई हाके-तरडे यांच्या हस्ते महिला शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांना पैशाची देवाण-घेवाण व व्यवहार ज्ञान मिळवून देण्यासाठी विविध स्टॉल्स लावले गेले होते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना उद्योगधंदा, विक्री कौशल्याची माहिती देण्यात आली.

ब्राह्मण समाज महिला मंडळ कार्यक्रम संत चुडामणी महाराज मंदिरात ब्राह्मण समाज महिला मंडळाने समाजातील विविध क्षेत्रात सक्रिय महिलांचा सत्कार केला. यावेळी २५ महिलांचा गौरव करण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांनी महिला संरक्षणावर माहिती दिली. तसेच, महिलांनी कविता व गीत सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून महिलांच्या योगदानाचे गौरव करण्यात आले आणि समाजात महिलांना मिळालेल्या स्थानाचा आदर व्यक्त करण्यात आला.

## मुलींचा जन्मदर घटला असून पत्रकारांनी जनजागृती करावी : अनिता आलगुले



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.९ मार्च -**

रेणापूर तालुक्यात मुलींचा जन्मदर मुलांच्या तुलनेत कमी झाल्याचे निरीक्षण घेत पत्रकारांनी यावर जनजागृती करावी, असे प्रतिपादन जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा रेणापूर यांच्या वतीने आयोजित सन्मान समारंभात रेणापूर ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. अनिता आलगुले यांनी केले.

शनिवारी, ८ मार्च रोजी पंचायत समिती सभागृह रेणापूर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माजी संचालिका इंदु ईगे होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये रेणापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, गटविकास अधिकारी सुमित जाधव, तहसीलच्या पुरवठा विभागाच्या निरीक्षक प्रतीक्षा लांडगे, तसेच रेणापूर ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. अनिता आलगुले यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये कल्पना लंगोटे (तालुका अभियान व्यवस्थापक, पंचायत समिती रेणापूर), अरुणा सूर्यवंशी (अंगणवाडी पर्यवेक्षिका पोहरेगाव), शोभा बनसोडे (अंगणवाडी पर्यवेक्षिका भोकरंबा), रंजना इंदापूरे (अधीपरिचारिका प्रा.आ. केंद्र पानगाव), सुमन सिरसाट (अंगणवाडी पर्यवेक्षिका बिटरगाव), अन्वरबानू शेख (आशा कार्यकर्ता पानगाव), सुरेखा राठोड (समुदाय आरोग्य अधिकारी कोष्टगाव) आणि अन्य कार्यकर्त्यांचा शाल, पुष्पहार आणि सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

आलगुले यावेळी म्हणाल्या, मुलींचा जन्मदर एक हजार पुरुषांच्या तुलनेत १०० बहात्तर मुलींचा जन्म दर आहे, जो चिंताजनक आहे. पत्रकारांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून याबाबत जनजागृती करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, गटविकास अधिकारी सुमित जाधव, पुरवठा विभाग निरीक्षक प्रतीक्षा लांडगे यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर आणि त्यांच्या कार्यावर मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला पत्रकार संघाचे अध्यक्ष शरद राठोड, उपाध्यक्ष संतोष तुरूप, सचिव अनिल फुलारी, वाल्मिक केंद्रे, वसंत सूर्यवंशी, ईश्वर बद्दर, सतीश जाधव, गोपाळ चित्ताडे, बाळया स्वामी, ॲड. दयानंद राठोड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक शरद राठोड यांनी केले तर आभार अनिल फुलारी यांनी मानले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जननायक संघटनेची नुतन जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** जननायक संघटना ही सामाजिक कार्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून करीत आहेत. या संघटनेची नूतन कार्यकारिणी जननायक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या सुचनेनुसार नुकतीच जाहीर करण्यात आली असून जननायक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी सूर्यकांतराव शेळके यांची तर जिल्हा कार्याध्यक्षपदी बी.टी.कदम यांची वर्णी लागलेली आहे.

जिल्हा उपाध्यक्षपदी प्रतापराव शिंदे, रविंद्र कांबळे, माधवराव पाटील गोंद्रीकर यांची निवड करण्यात आलेली आहे. महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षपदी वनिताताई काळे, शहर उपाध्यक्षपदी ज्योतीताई भोकरे, शहर सरचिटणीसपदी सहारा शेख, तर महिला आघाडीच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी अरुणाताई कांदे यांची निवड करण्यात आलेली आहे. तसेच युवा आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी मारुती सूर्यवंशी, युवा लातूर शहराध्यक्षपदी राजेश पवार व युवा कार्याध्यक्षपदी सचिन जाधव यांनी निवड करण्यात आलेली आहे. त्याच्या या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

लातूर तालुकाध्यक्षपदी निळकंठराव पवार यांची निवड जननायक संघटनेची लातूर तालुका कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली असून जननायक संघटनेच्या लातूर तालुकाध्यक्षपदी निळकंठराव पवार यांची निवड करण्यात आलेली आहे तर लातूर तालुका कार्याध्यक्ष पदी राजाभाऊ मुळे यांची निवड करण्यात आलेली आहे. तर रेणापूर तालुकाध्यक्षपदी अप्पासाहेब पाटील यांची एकमताने निवड करण्यात आलेली आहे व सदस्यामध्ये अनेक पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## न्या. वराळे यांचे लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री प्रसन्न वराळे लातूर दौऱ्यावर आले असता लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने शाल , पुष्पहार घालून संविधान प्रत देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शरद इंगळे,



उपाध्यक्ष ॲड. मनीषा दिवे पाटील, ॲड. आनंद खांडेकर, सचिव ॲड. प्रदिपसिंह गंगणे, ग्रंथालय सचिव ॲड. विजय साबळे, सहसचिव ॲड. तृप्ती इटकरी, ॲड. नरेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष ॲड. रोहित सोमवंशी, ज्येष्ठ विधीज्ञ बळवंत जाधव, ॲड. आशिष बाजपेयी, ॲड. संजय पांडे, ॲड. वैभव बिराजदार, ॲड. नितीन राठोड, ॲड. ऋषिकेश देशपांडे, ॲड. ओम पेन्सलवार आदीची उपस्थिती होती

## सांस्कृतिक कार्य विभागाचा कृषी संस्कृती महोत्सव यंदा लातूरमध्ये

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** लातूर शहर हे महाराष्ट्रात सांस्कृतिक शहर म्हणून पुढं येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने दिनांक १२ ते १४ मार्च, २०२५ दरम्यान दयानंद सभागृह बार्शी रोड, लातूर येथे सांयकाळी ५:०० ते ८:०० या वेळेत सलग तीन दिवस कृषी संस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यात कृषी अर्थात शेती व शेतकऱ्यांच्या जीवणाशी ग्रामीण सांस्कृतिशी निगडीत गीते,नृत्य कविता यांचे सादरीकरण होणार आहे.या महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील नामवंत प्रसिध्द गायक अभिजीत कोसंबी, प्रज्ञा अन्नम, प्रणाली कदम, प्रसेनजीत कोसंबी, श्रावणी महाजन, चैतन्य कुलकर्णी, विनल देशमुख, कुणाल बराळे, संज्योती जगदाळे, अभिषेक नलवडे, अक्षय घाणेकर,आसावरी बोधणकर यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार असुन लातूर येथील रंगभूमी कलामंचच्या कलाकरांचा नृत्य अविष्कार लातूरकरांना यावेळी पाहता येणार आहे.तर स्थानिक कवीच्या कवीतांचे सादरीकरण या प्रसंगी होणार आहे. कृषी महोत्सवाचे आयोजन करण्याची संकल्पना सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांची आहे तर सांस्कृतिक विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.या महोत्सवाला विनामुल्य प्रवेश असणार असून रसिकांनी मोठ्या संख्येने कृषी संस्कृती महोत्सवाला उपस्थित राहाण्याचे आवाहन संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय विभीशन चवरे, समन्वयक बी. एम. घोलप, निमंत्रण शैलेश गोजमगुंडे, अनिल पुरी,मयुर बनसोडे यांनी केले आहे.

## ठेकेदाराकडून बेदम मारहाण; मजुराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** ठेकेदाराकडे केलेल्या कामाचे पैसे मागितल्याचा राग मनात धरून ठेकेदार व त्याच्या सहकाऱ्यांनी मजुरास बेदम मारहाण केल्याने त्यात मजुराचा मृत्यू झाला असून ठेकेदारावर खुनाचा गुन्हा दाखल केल्याशिवाय प्रेत ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने विवेकानंद चौक पोलीस ठाणे परिसरात शनिवारी सायंकाळी उशिरापर्यंत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.उदगीर येथील तानाजी बाबूराव सोनकांबळे (वय ४०) हा उदगीरचा ठेकेदार मेहराज पटेल याच्याकडे काम करत होता. तानाजी याने पटेल याच्याकडे मजुरीचे पैसे मागितले असता, मेहराज पटेल व त्याच्या तीन सहकाऱ्यांनी लातूरच्या गरूड चौकापासून तानाजीला बेदम मारहाण केल्याची घटना बुधवारी घडली. उपचारासाठी त्याला येथील सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान शुक्रवारी त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी गुन्हा नोंद झाला आहे.

# ‘माविम’च्या नवतेजस्विनी महोत्सवाचे थाटात उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** जागतिक महिला दिन आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) ५० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या नवतेजस्विनी महोत्सवाचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या अधिकाऱ्यांनी बचतगटांच्या दालनांमध्ये जावून विविध वस्तूंची खरेदी करत या महोत्सवाचे उद्‌घाटन केले.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख, नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक प्रमोद पाटील, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी एम. एस. पटेल, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी कुटे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

महिलांना सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाने गेल्या ५० वर्षात भरीव कामगिरी केली आहे. बचत गटांच्या चळवळ महिला सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरली असून यामाध्यमातून अनेक महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनल्या आहेत. या महिलांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या बचत गटांची उत्पादने जिल्ह्याबाहेरील बाजारपेठेत पाठविण्यासाठी प्रयत्न करावेत. माविमच्या माध्यमातून याबाबत महिलांना प्रशिक्षण दिले जावे, असे उपजिल्हाधिकारी श्रीमती गाठाळ यावेळी म्हणाल्या.

प्रारंभी माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी एम. एस. पटेल यांनी प्रास्ताविकात नवतेजस्विनी महोत्सव आयोजनाचा हेतू विशद केला. तसेच माविमच्या गेल्या ५० वर्षातील वाटचालीची संक्षिप्त माहिती दिली. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले, दीपक टेकाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी



परमेश्वर इंगळे, हितन कुऱ्हे, किरण तांदळे, अनंत हेरकर, सुजाता तोंडारे, मंगल वाघचौरे, उषा डूमने, सविता पाटील, विजयसिंग इंगळे, मंगेश थोरात, विजय लोंढे, प्रवीण जगताप, वर्षा राउत, दीपक चक्रे, जगदीश केनालवाड व सर्व सहयोगिनी यांनी परिश्रम घेतले.

तीन दिवसीय प्रदर्शनात विविध वस्तूंचे स्टॉल ८ ते १० मार्च या कालावधीत होत असलेल्या नवतेजस्विनी महोत्सवातील प्रदर्शनामध्ये बचत गटातील महिलांनी तयार केलेले घरगुती मसाले, शुद्ध हळद पावडर, विविध प्रकारचे पापड, विविध प्रकारचे लोणचे, शेवया, सांडगे, कुरुडी, लाल व काळे तिखट, हडोळाती चे प्रसिद्ध काळे तिखट, घाण्याचे करडी व सूर्यफूल तेल आदी पदार्थ मिळणार आहेत.

## महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** जागतिक महिला दिनानिमित्त आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनात लातूर महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

मनपा उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांची उपस्थिती होती.उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, कांचन तावडे, रावसाहेब कोलगणे, सहाय्यक आयुक्त निर्मला माने यांचीही यावेळी उपस्थिती होती. यावेळी प्रमुख व्याख्यात्या म्हणून राजर्षी शाहू महाविद्यालयातील डॉ.स्वाती फेरे यांनी मार्गदर्शन केले. महिलांचे आरोग्य या विषयावर त्यांनी विचार मांडले.या यावेळी डॉ. फेरे यांच्या हस्ते उपस्थित महिला कर्मचाऱ्यांचा रोपटे व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास नंदकिशोर तापडे, खदीर शेख,मुख्य लेखा परीक्षक कांचन तावडे, पर्यावरण अधिकारी सन्मती मेस्त्री,पवन सुरवसे आदिंची उपस्थिती होती.

## सिद्धेश्वर यात्रेतील पशुप्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित पशुप्रदर्शनास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.या प्रदर्शनातील विजेत्या पशु पालकांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, बोधनकर डी. यु. श्रीधर शिंदे, नानासाहेब सोनवणे सर्व पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद तसेच देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, सुरेश गोजमगुंडे,व्यंकटेश हालिंगे विशाल झांबरे, राजेंद्र



पतंगे,माधव बन यांच्या प्रमुख उपस्थितीत पशु प्रदर्शनाचे उद्‌घाटन संपन्न झाले.

या प्रदर्शनात एक वर्षावरील देवणी नर वळू गटामधून औसा तालुक्यातील हासेगाववाडी येथील सिद्राम सरवदे यांच्या वळूने प्रथम क्रमांक पटकावला.लाल कंधारी मादी गट (गाभण गाय )या गटातून अहमदपूर तालुक्यातील शेनकुड येथील देविदास नरवटे यांच्या गाईने प्रथम क्रमांक पटकावला.

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. देवणी नर वळू गटासाठी लातूर बाजार समितीच्या वतीने चांदीचा रथ, प्रमाणपत्र,शाल व फेटा देऊन सन्मान करण्यात आला. लाल कंधारी मादी गटातील विजेत्या पशुपालकास देवस्थानच्या वतीने रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सचिव सतिश भोसले, बाळासाहेब पाटील, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे, महादेव बन, शिवानंद कातले यांची प्रमुख उपस्थिती होती.



## आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** येथील राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजला ‘नॅक’चा ‘ब’ दर्जा मिळाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये आणि सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी सत्कार केला.

महाराष्ट्र शिक्षण मंडळ, लातूर संचलित राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजची गेल्या १७ वर्षांपूर्वी स्थापना झाली आहे. तेव्हापासून या महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात आपला एक आगळा वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयाच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात, संस्कारक्षम व दर्जेदार शिक्षण दिले जाते. याची दखल घेत या महाविद्यालयाला नुकताच ‘नॅक’चा ‘ब’ दर्जा मिळाला आहे. याबद्दल छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये आणि सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी प्राचार्य शुभांगी काळे आदी उपस्थित होते.

## महापूर येथील सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** जागतिक महिला दिनानिमित्त विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या पुढाकारातून व विलासराव देशमुख वैद्यकीय शासकीय महाविद्यालय यांच्या सहकार्यातून लातूर तालुक्यातील महापूर येथे शनिवार दि. ८ मार्च रोजी आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. महापूर येथे ट्वेंटीवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या पुढाकारातून सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराचे



आयोजन करण्यात आले.

या शिबिरात महिला डॉक्टरांद्वारे महिलांची स्तन विकाराची आयब्रेस्ट स्कॅन मशीनद्वारे मोफत तपासणी करण्यात आली तसेच १८२ महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषध गोळ्यांचे वाटप करून महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक करण्यात आले आणि त्यांना मोफत तपासणी आणि उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मेघराज चावडा (अध्यक्ष आणि वैद्यकीय समन्वयक) संगीता मोळवणे, डॉ. पूनम राठोड (वैद्यकीय अधिकारी), सई गोरे (अध्यक्ष, दिव्यतेज प्रतिष्ठान), हेमंत लोहारे , डॉ.अनंत सूर्यवंशी, गावचे सरपंच माने, मु.अ. बी.के. भोसले, डी.आर. पवार, संदीप माने, आरोग्य उपकेंद्र महापूरचे कर्मचारी, गजानन बोयणे आणि अन्य कार्यकर्ते, अंगणवाडी मदतनीस, उमेद बचत गटाचे सदस्य यांनी प्रयत्न केले.

## उपायुक्त खानसोळे यांची मनपा शाळेस अचानक भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी शनिवारी (दि. ८)महात्मा बसवेश्वर विद्यालय, मनपा शाळा क्रमांक ०६, बसवेश्वर चौक येथे अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली. शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी आवश्यक त्या सुविधा व प्रयत्नांचा आढावा घेण्यासह शाळेच्या अडचणी जाणून घेण्यासाठी त्यांनी ही भेट दिली.

भेटीदरम्यान ४७ विद्यार्थी पटसंख्या असलेल्या या शाळेमध्ये मुख्याध्यापक महेश तोडकर आणि सहशिक्षक सतिश चव्हाण हे विद्यार्थ्यांना शिकवताना आढळले. विशेष म्हणजे शाळेतील संपूर्ण अध्यापन प्रक्रिया डिजिटल आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय असून शालेय परिसर स्वच्छ व सुसज्ज असल्याचे पाहून उपायुक्त खानसोळे यांनी समाधान व्यक्त केले.



शाळेतील भौतिक सुविधा अधिक कशा वाढवता येतील याबाबत त्यांनी शिक्षकांसोबत चर्चा केली. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारासंदर्भात माहिती विचारली. दररोज दिल्या जाणाऱ्या मेनूबाबत चौकशी करून शालेय पोषण आहार अधिक चविष्ट व पौष्टिक कसा देता येईल ? याबाबत मार्गदर्शन केले.

उपायुक्त खानसोळे यांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधला. त्यांनी मराठीत वाक्य बोलून दाखवली असता विद्यार्थ्यांनी ती तत्परतेने इंग्रजीत अनुवादित करून सादर केली. खासगी इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांनाही लाजवेल अशी इंग्रजी भाषेची प्रगती या शाळेत पाहून समाधान वाटते, असे मत उपायुक्तांनी व्यक्त केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण शाळेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी पुरवलेल्या डिजिटल संचाचा या शाळेत योग्य व परिणामकारक वापर होत असल्याचेही निदर्शनास आले.

डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी लातूर शहर महानगरपालिका उपायुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून महानगरपालिकेच्या शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या प्रयत्नांचे फलितही दिसू लागले असून महानगरपालिका शाळांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण गुणात्मक बदल होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

कार्यक्रमादरम्यान शाळा क्रमांक सहाच्या विद्यार्थ्यांनी पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेत मिळवलेले पुरस्कार उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

उपायुक्तांनी सर्व शिक्षकांना शाळेची अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा कशी साध्य करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. शाळा विकासातील अडचणी दूर करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील,असे आश्वासनही त्यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन करून त्यांनी उपस्थित शिक्षकाना प्रोत्साहित केले.

## राजमाता जिजामाता संकुलात महिलादिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शनिवारी जागतिक महिलादिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा जायेभाये यांनी पर्यवेक्षिका सुनीता जवळे, प्रा. वैशाली पाटील, प्रा. अनिता किसवे, प्रा. भारती झाडके, शिक्षिका कल्पना नवगिरे आदींसह विद्यार्थिनींना पुष्प देऊन महिलादिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह अन्य प्राध्यापक आदिंची उपस्थिती होती.